म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. 403

स्वराज्याचें

मुख्य साधन

# खंडबंदी.

REFBK-0004340

शामराव गोविंदराव देसाई,

आजचें

# स्वराज्याचें मुख्य साधन

# खंडबंदी.

( करबंदी आधीं कीं खंडबंदी ? )

REFBK-0004340

लेखक :—

शामराव गोविंदराव देसाई,

संपादक 'राष्ट्रवीर,' बेळगांव.

प्रथमावृत्ति.

राजशक २५८ ] किंमत ५ आणे [ सन १९३१

८३४०

# हेतु-निवेदन.

'करबंदी आर्धी कीं खंडबंदी आर्धी ?' या मथळ्याखालीं 'राष्ट्रवीर' पत्रांतून प्रसंगानुरूप पण यथावकाश प्रसिद्ध झालेले दहा लेख एकत्रित केलेली ही माला प्रसिद्ध करण्याचा सुयोग जगन्नियंत्रणांत प्राप्त झाला यामुळें आम्हास समाधान वाटत आहे. मात्र याचें श्रेय राष्ट्रवीरांच जनक आणि आश्रयदाते यांना आहे, हें एथें कृतज्ञतापूर्वक उल्लेखिलें पाहिजे. आणि प्रस्तुत माला जितकी काय सुवासिक झाली असेल त्यासहि विद्वद्वर्य, अनुभववृद्ध आणि सन्मान्य **श्रीयुत भास्करराव विठ्ठलराव जाधव. एम. ए., एलएल बी., एम. एल. ए.** यांच्या सरळ, सुबोध प्रस्तावनेची सुसंगती हें कारण होय. म्हणून जाधवरावजींचें आम्ही ऋणी आहों.

लेखांतून वादग्रस्त आणि सकृद्दर्शनीं पक्षपाताची दिसतील अशीं स्थळें बरींच मिळतील. परंतु गेल्या कायदेभंगाच्या चळवळींतील करबंदीमुळें जो परिणाम घडत आहे तो निर्विकार आणि निःपक्षपात दृष्टीनें विचारांत घेतला तर प्रस्तुत लेखमालेंतील विचारसरणी आणि सिद्धांत पटल्याशिवाय राहाणार नाहींत.

उठतील त्या लाटांसरशी हेलकावे खात न राहातां किंवा प्रवाहपतित न होतां स्वतंत्रपणें विचार करण्यास बहुजनसमाजाला विशेषतः शेतकरी वर्गाला साहाय्य व्हावें हा प्रस्तुत कृतीचा मूल हेतु आहे. व तो 'सत्यसंकल्पाचा दाता भगवान्' सफळ करील, अशी दृढ श्रद्धा आहे.

सर्वांचा नम्र

| | |
|---|---|
| बेळगांव. | **शामराव गोविंदराव देसाई** |
| मिति अ. आषाढ | व्यवस्थापक, श्रीशिवाजी प्रिंटिंग प्रेस |
| शुद्ध प्रतिपदा, राजशक २५८ | असोशिएशन. |

# प्रस्तावना.

सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते ।
मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ॥

माझे मित्र रा. रा. शामराव गोविंदराव देसाई, संपादक राष्ट्रवीर, यांनीं आपल्या पत्रांत "करबंदी आधीं कीं खंडबंदी आधीं" या विषयावर दहा लेखांची एक माला गुंफिली. तिमे लेख थोडे थोडे वाचल्यावर राऊंड-टेबल कान्फरन्समध्यें भाग घेण्यासाठीं देशांतरास गेल्यानें पुढील लेख माझ्या वाचनांत आले नाहींत. इत्याइत्यानें येणाऱ्या लेखांचें वाचन फारच वरवर होतें व मागील पुढील संबंध बरोबर लक्ष्यांत येत नाहीं. सबंध लेख पुस्तक रूपानें हातीं आल्यावर त्याचें मनन करण्यास सवड मिळते. ही लेखमाला पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा शिवाजीमंडळाचा उद्देश फार चांगला आहे. अशाच प्रकारची लहान लहान पुस्तकें छापून त्यांचें वाचन आमच्या समाजांत होणें फार जरुरीचें आहे.

आमचा समाज निरक्षर असल्यामुळें बराच अडाणी आहे व म्हणून फार भोळाही आहे. या कारणानें तुमचें हित आम्ही पाहतों, असें सांगणाऱ्यांच्या नादीं आमचे लोक सहज लागतात. त्यांतून परकी सरकारावर त्यांचा भरंवसा न राहिल्यामुळें सरकारच्या विरुद्ध कोणी कांहीं सांगितल्यास तें त्यांना पटतें. यांच्या सांगण्यांत खरेपणा कितपत आहे हें अजमावण्याची ताकद त्यांचेमध्यें नसते. सरकारचे कर देऊं नका व त्यांच्याशीं असहकार्य करा हा उपदेश त्यांना कांहीं कांहीं ठिकाणीं रुचत आहे, असें दिसून आल्यावर लोकांस सावध करून खरा व हिताचा मार्ग दाखविण्याच्या हेतूनें रा. रा. शामराव देसाई यांनीं ही माला गुंफिली आहे. हे सर्व लेख आतां पुस्तक-रूपानें लोकांच्या हातीं पडत आहेत.

—मुद्रक—

शामराव गोविंदराव देसाई,

श्रीशिवाजी प्रिंटिंग प्रेस खडेबाजार बेळगांव.

—प्रकाशक—

शामराव गोविंदराव देसाई, राष्ट्रवीर ऑफिस, २९३२ बेळगांव.

( श्रीशिवाजी प्रिंटिंग प्रेस असोशिएशनकरितां )

पुस्तकासंबंधींचे सर्व हक्क श्रीशिवाजी प्रिंटिंग प्रेस असोशिएशननें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

स. नि. २५/७/३२

# समर्पण.

देवावर

निसर्गावर

हवाला टाकून

दिवसरात्र, ऊन-थंडी, वारा-पाऊस, तहान-भूक, मानापमान

या द्वंद्वांची पर्वा न करितां

हंगाम साधण्यासाठीं घरचें मढें झांकून ठेवून

नफ्यातोट्याच्या हिशेबानें

फळाची अपेक्षा न करितां

संपत्ति उत्पन्न करणारा

भूदेवीचा इमानी पुत्र,

जाणीव नसलेला कर्मयोगी

पण

अनाद्यनंत दरिद्रीनारायण जो शेतकरी

त्या आमच्या

सरळ मनाच्या ईश्वरस्वरूपी दादास

ही माला सद्भावपूर्वक समर्पण करितों.

'श्याम'

# हेतु-निवेदन.

'करबंदी आधीं कीं खंडबंदी आधीं ?' या मथळ्याखालीं 'राष्ट्रवीर' पत्रांतून प्रसंगानुरूप पण यथावकाश प्रसिद्ध झालेले दहा लेख एकत्रित केलेली ही माला प्रसिद्ध करण्याचा सुयोग जगन्नियंत्रणांत प्राप्त झाला यामुळें आह्मास समाधान वाटत आहे. मात्र याचें श्रेय राष्ट्रवीराचे जनक आणि आश्रयदाते यांना आहे, हें एथें कृतज्ञतापूर्वक उल्लेखिलें पाहिजे. आणि प्रस्तुत माला जितकी काय सुवासिक झाली असेल त्यासहि विद्वद्वर्य, अनुभववृद्ध आणि सन्मान्य श्रीयुत **भास्करराव विठ्ठलराव जाधव. एम. ए., एलएल बी., एम. एल. ए.** यांच्या सरळ, सुबोध प्रस्तावनेची सुसंगती हें कारण होय. ह्मणून जाधवरावजींचें आह्मी ऋणी आहों.

लेखांतून वादग्रस्त आणि सकृद्दर्शनीं पक्षपाताची दिसतील अशीं स्थळें बरींच मिळतील. परंतु गेल्या कायदेभंगाच्या चळवळींतील करबंदीमुळें जो परिणाम घडत आहे तो निर्विकार आणि निःपक्षपात दृष्टीनें विचारांत घेतला तर प्रस्तुत लेखमालेंतील विचारसरणी आणि सिद्धांत पटल्याशिवाय राहाणार नाहींत.

उठतील त्या लाटांसरशी हेलकावे खात न राहातां किंवा प्रवाहपतित न होतां स्वतंत्रपणें विचार करण्यास बहुजनसमाजाला विशेषतः शेतकरी वर्गाला साहाय्य व्हावें हा प्रस्तुत कृतीचा मूळ हेतु आहे. व तो 'सत्यसंकल्पाचा दाता भगवान्' सफळ करील, अशी दृढ श्रद्धा आहे.

सर्वांचा नम्र

बेळगांव.<br>
मिति अ. आषाढ<br>
शुद्ध प्रतिपदा, राजशक २५८

शामराव गोविंदराव देसाई<br>
व्यवस्थापक, श्रीशिवाजी प्रिंटिंग प्रेस<br>
असोशिएशन.

# प्रस्तावना.

सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते ।
मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ॥

माझे मित्र रा. रा. शामराव गोविंदराव देसाई, संपादक राष्ट्रवीर, यांनीं आपल्या पत्रांत " करबंदी आधीं कीं खंडबंदी आधीं " या विषयावर दहा लेखांची एक माला गुंफिली. तिचे लेख थोडे थोडे वाचल्यावर राऊंड-टेबल कान्फरन्समध्यें भाग घेण्यासाठीं देशांतरास गेल्यानें पुढील लेख माझ्या वाचनांत आले नाहींत. हप्त्याहप्त्यानें येणाऱ्या लेखांचें वाचन फारच वरवर होतें व मागील पुढील संबंध बरोबर लक्ष्यांत येत नाहीं. सबंध लेख पुस्तक रूपानें हातीं आल्यावर त्याचें मनन करण्यास सवड मिळते. ही लेखमाला पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा शिवाजीमंडळाचा उद्देश फार चांगला आहे. अशाच प्रकारची लहान लहान पुस्तकें छापून त्यांचें वाचन आमच्या समाजांत होणें फार जरुरीचें आहे.

आमचा समाज निरक्षर असल्यामुळें बराच अडाणी आहे व म्हणून फार भोळाही आहे. या कारणानें तुमचें हित आम्ही पाहतों, असें सांगणाऱ्यांच्या नादीं आमचे लोक सहज लागतात. त्यांतून परकी सरकारावर त्यांचा भरंवसा न राहिल्यामुळें सरकारच्या विरुद्ध कोणी कांहीं सांगितल्यास तें त्यांना पटतें. यांच्या सांगण्यांत खरेपणा कितपत आहे हें अजमावण्याची ताकद त्यांचेमध्यें नसते. सरकारचे कर देऊं नका व त्यांच्याशीं असहकार्य करा हा उपदेश त्यांना कांहीं कांहीं ठिकाणीं रुचत आहे, असें दिसून आल्यावर लोकांस सावध करून खरा व हिताचा मार्ग दाखविण्याच्या हेतूनें रा. रा. शामराव देसाई यांनीं ही माला गुंफिली आहे. हे सर्व लेख आतां पुस्तक-रूपानें लोकांच्या हातीं पडत आहेत.

हिंदुस्थानाला स्वराज्य पाहिजे हें सर्वांचेंच मागणें आहे. पण तें स्वराज्य कोणीं चालवावें याविषयीं मतभेद आढळतो. कांग्रेस आज ४५ वर्षे भरत आहे. पण तिचीं सूत्रें बहुजनसमाजांतील लोकांच्या हातीं नाहींत. कांग्रेसचा आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर तिचीं सूत्रें भांडवलवाल्यांच्या व पुढारलेल्या वर्गाच्याच हातीं आहेत असें दिसून येतें. कांग्रेसच्या कामास आजपर्यंत जें द्रव्यसाहाय्य मिळालें आहे तें बहुतांशीं व्यापारी वर्गाकडूनच मिळालें आहे. व तें त्यांनीं केवळ परोपकार बुद्धीनें दिलें नाहीं. टिळकफंडासारखे मोठे फंड त्यांनींच दिले व त्यांनींच त्याचा फन्नाहि पाडला. यामुळें कांग्रेसचीं सूत्रें बहुत करून याच वर्गाच्या हातीं आहेत.

ठिकठिकाणच्या कांग्रेस कमिट्यांकडे पाहिलें तरी काय दिसून येतें? व्यापारी लोकांबरोबरच पुढारलेल्या वर्गांतील लोकांचे हात त्या सूत्राला खेचीत आहेत असें आपण पाहतों. या कारणानें कांग्रेसचा ह्मणून जो कार्यक्रम देशांतील सर्व पुढाऱ्यांपुढें ठेविला जातो तो बहुजनसमाजाच्या हिताचा कितपत आहे हें तपासण्याची जबाबदारी बहुजनसमाजांतील पुढाऱ्यांवर येते. रा. रा. देसाई हे एका प्रमुख व जबाबदार पत्राचे संपादक आहेत व बहुजनसमाजाचें कल्याण साधणें हें या पत्राचें ध्येय आहे. त्या ध्येयावर नजर ठेवून रा. देसाई यांनीं हे लेख बहुजनसमाजाचे डोळे उघडण्याकरितां लिहिले आहेत.

कांग्रेसनें निर्भेळ स्वातंत्र्याचें ध्येय पुकारलें व तें ध्येय साधण्यासाठीं कायदेभंगाची चळवळ सुरू केली. प्रथमतः मिठाचा कायदा मोडण्याचा उपक्रम जारीनें सर्वत्र अवलंबिण्यांत आला. पण त्या योगानें सरकार वठणीवर येईल अशीं चिन्हें मुळींच दिसेनात. खाऱ्या पाण्यापासून अग्निसाह्यानें मीठ तयार करणें ह्मणजे चार आण्यांचीं लांकडें जाळून दोन पैसे किंमतीचेंही मीठ तयार होण्याची मारामार. आपोआप तयार झालेलें मीठ प्रकृतीस

अपायकारक, जंगलचा कायदेभंग राष्ट्रास घातक. अशा अडचणींमुळें हीं कायदेभंगाची चळवळ अपेशी ठरणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां सरकारास चिमटा बसावा अशा चळवळीची योजना विचारांत घेतां उत्पन्नांसच चाट बसेल तरच सरकारवर परिणाम होईल असें दिसून आलें. तेव्हां कर देणें बंद करावें अशी चळवळ सुरू करण्यांत आली.

हिंदुस्थान सरकारचें मुख्य उत्पन्न कस्टम्स, मीठ, प्रांतावरील कर या बाबींचेंच मुख्यत्वें आहे. यांतील मिठाच्या करासंबंधींची चळवळ निष्फळ ठरली. कस्टम्सचा कर बंद करणें शक्य नाहीं. तो दिल्याशिवाय आयात माल व्यापारी वर्गाचे हातींच येत नाहीं. इनकमटॅक्स हा कर नोकरवर्गाखेरीज व्यापारी सावकार वगैरेंकडून मागील सालच्या उत्पन्नावर प्रत्यक्ष वसूल केला जातो. ह्मणून तो देणें नाकारण्याचें काम या व्यापारी सावकार वर्गांतील कोणासहि करतां येण्यासारखें आहे. हा वर्ग सुशिक्षित आहे, विचारी आहे, ह्मणून करबंदीसारखें काम हातीं घेण्यास लायक आहे.

प्रांतिक सरकारकडे ज्या करांचें उत्पन्न येतें त्यांत जमीन महसूल मुख्य आहे. दुसऱ्या उत्पन्नाच्या बाबी जंगल, अबकारी, स्टांप, रेजिस्ट्रेशन, करमणुकीवरील कर इत्यादि आहेत. यांतील करबंदीला हात घालण्यासारखा कर जमीन महसूल हाच आहे.

करबंदीची चळवळ कशी राष्ट्रघातकी आहे याचें विवेचन पहिल्या-लेखांत चांगले रीतीनें केलें आहे. कर वसूल वेळींच झाला नाहीं तरी जरूर तो खर्च चालू ठेवावाच लागतो व शिवाय कर वसूल करण्यासही जादा खर्च करावा लागतो. अशा रीतीनें उत्पन्नांत तूट व खर्चांत वाढ झाल्यानें कर्जाचा बोजाही देशावर जास्त पडत जातो यासंबंधीं केलेला विचार मनन करण्यासारखा आहे. विकारवश होऊन केलेल्या गोष्टी बरेचवेळां नुकसानीस कारण कशा होतात याचें हें एक उदाहरण आहे. अनुत्पादक कर्जाचा बोजा वाढणें राष्ट्र-घाताचें आहे. राष्ट्रहितासाठीं ह्मणून चालविलेल्या कोणत्याहि चळवळीचा

परिणाम असलें कर्ज वाढविणें हा हेतु असेल तर ती चळवळ कोठें तरी चुकत आहे असें समजण्यास हरकत नाहीं.

सध्याची राष्ट्रीय चळवळ पुढारलेला वर्ग व व्यापारी वर्ग यांच्या नेतृत्वाखालीं चाललेली आहे. ही चळवळ आतां बहुजनसमाजापर्यंत पोचली आहे. तथापि बिचाऱ्या अशिक्षित समाजाचे हे नेते आपल्या पदरास खार लाऊन न घेतां गरीब भोळ्या रयतेसच कसे बळी देत आहेत हें त्या रयतेस अझून पुरें समजलेलें नाहीं. तो समाज जागा करण्याचें कठीण काम अवश्य झालें पाहिजे. राष्ट्रवीरांतील लेख तें काम करण्याच्या उद्देशानें लिहिले आहेत.

कोणत्याही राष्ट्रांत भांडवलवाले व मजूर असे दोन वर्ग असतात. एक दुसऱ्यावर चरण्यास पाहातो. पाश्चिमात्य देशांतील मजूर आपले संघ करून स्वसंरक्षणाची काळजी घेत आहेत. पण आमच्या हिंदुस्थानांत पुढारलेला व मागसलेला असे दोन वर्ग दिसत आहेत. पहिल्यांत शिक्षणांत पुढें गेलेला समाज आहे. या वर्गातील लोक वकिली, न्यायाधिशी, माजिस्ट्रेटी, मोठ्या पगाराची सरकारी नोकरी करीत आहेत. याच वर्गातील लोक व्यापारही करतात व कारखाने चालवितात. म्हणजे भांडवलवाले लोकांशीं या वर्गाचें अगदीं जिव्हाळ्याचें नातें असून उभयतांचें हित बहुतेक एकत्र निगडलें गेलें आहे.

दुसऱ्या वर्गांत गरीब शेतकरी, मजूर, कारागीर वगैरे फार मोठा समाज आहे. पहिला समाज सावलींत काम करतो, सुग्रास अन्न भरपूर खातो व एकंदरींत याची शरीरकांति सुखावलेली दिसते. दुसऱ्या वर्गास बहुधा उन्हांत काम करावें लागतें, जाडय़ा भरडय़ा अशा अपुऱ्या अन्नावर त्याला गुजराण करावी लागते व शरीरयष्टि बहुतेक रोडावलेली पण श्रम व कष्ट यांनीं कसलेली असते.

यांचें हितसंबंध याप्रमाणें बरेच वेळां एकमेकांविरुद्ध असतात. दुसरा वर्ग श्रम करून संपत्ति उत्पन्न करणारा आहे. पहिला वर्ग या दुसऱ्या वर्गावर पोसला जात आहे. याप्रमाणें या उभय वर्गाचा परस्पर संबंध असल्यानें

पहिल्या वर्गानें चालविलेल्या चळवळी दुसऱ्या वर्गाच्या हिताच्याच असतील असा नियम नाहीं. यासाठीं दुसऱ्या वर्गाचे जे खरे पुढारी आहेत त्यांनीं या चळवळीचें योग्य निरीक्षण करून त्या योगानें या मागसलेल्या वर्गाचें हिताहित कसें काय साधेल हें ठरविलें पाहिजे. हें कर्तव्य शामराव देसाई यांनीं चांगल्या प्रकारें बजाविलें आहे असें आमचें मत आहे.

सध्याच्या काळीं स्वराज्याच्या प्रश्नाकडे सर्व देशाचें लक्ष्य लागलें आहे. सर्वांसच स्वराज्य पाहिजे आहे. पण स्वराज्य ह्मणजे काय याविषयीं मात्र एकमत नाहीं. हें स्वराज्य मिळाल्यावर त्याचा उपभोग कोण घेणार हा प्रश्न उभा राहतो. याचें उत्तर देणें आजपर्यंतच्या अनुभवावरून कठीण आहे असें नाहीं. आज जी चळवळ कायदेभंगाच्या नांवाखालीं चालू आहे तींतही पुढारलेला वर्ग आपली कांतडी कशी बचावीत आहे हेंहि पहिल्या लेखांत उत्तम प्रकारें दाखविलें आहे.

पोलीस शिपाई बिचारा हुकमाचा ताबेदार. तो लाठी चालवून चळवळयास हाकून लावतो ह्मणून त्यांचेवर जे शिव्याशापांचा वर्षाव करतात व देशद्रोही ह्मणून दोप लावतात तेच लोक सरकारी नोकरींत मोठमोठ्या हुद्यावर असलेल्या आपल्या जातभाईस कांहीं बोलत नाहींत. यांचेमध्यें माजिस्ट्रेट, जज्ज, पोलीस सुपरिंटेंडेंट, डेप्युटी सुपरिंटेंडेंट वगैरे मोठमोठे आफिसर आहेत. त्यांनीं दिलेले हुकूम गरीब बिचारे पोलीस अमलांत आणतात. असे हुकूम देणारास पुढारलेले वर्ग दोप लावीत नाहींत. कारण ते त्यांच्या रक्तामांसाचे. हे हुकूम अमलांत आणणारा पोलीस मात्र देशद्रोही. आपला तो बाब्या व दुसऱ्याचा तो कार्टा या न्यायाचें पुढारलेल्या वर्गाचें हें आचरण एक उदाहरण आहे.

मामलेदार, मुनसफ, फडणीस, भाग कारकून वगैरे वरचे सर्व अधिकारी पुढारलेल्या वर्गांतील. यांनीं नोकरी सोडावी असें फारसें कोणी बोलतच नाहीं. कोणी बोलला तरी त्याचा परिणाम कांहींच होत नाहीं व त्याबद्दल या वरिष्ठ सरकारी नोकरांस कोणी त्रासही देत नाहीं. पण गांवच्या पाटलासारखे

मागसलेल्या वर्गांतील नोकरांना नोकरी सोडण्याचा उपदेश—हा नेहमीं धमकीच्या स्वरूपांत असतो—करण्यास जो तो पुढें येत आहे. त्या उपदेशाप्रमाणें कोणी न वागल्यास त्यावर बहिष्कार घालून त्याचा छळ करण्याचा उपदेश इटकून व्हावयाचाच. विद्येंत पुढारलेल्या वर्गाचें वर्तन मागसलेल्या वर्गाशीं याप्रमाणें आजही कावेबाजीचें आहे.

त्यांचाच जोडीदार व्यापारीवर्ग. तोही आपली कातडी बचावण्यास उत्सुक. या वर्गांतूनच प्राप्तीवरील कराचा बहुतेक भरणा होतो. पण करबंदीचा उपदेश करतेवेळीं प्राप्तीवरील कर देऊं नका व अशा रीतीनें सरकारी खजिन्यास खळगा पाडा असा उपदेश करण्यास व्यापारी वर्गापैकीं कोणी पुढें येत नाहींच; पण पुढारलेल्या वर्गापैकींही कोणी तसें सांगत नाहीं. दोन्हीही वर्गाचे वक्ते शेतकरी लोकांस सारा देऊं नका असा अट्टाहासानें उपदेश करतात. तो केवळ शेतकऱ्यांच्याच हिताच्या दृष्टीनें नव्हे तर एकंदर देशाच्या हिताच्या दृष्टीनें किती घातक आहे हें या लेखांत दाखविलें आहे. या चळवळीनें शेतकरी वर्गाचें सर्वस्वी नुकसान होणार आहे. इतकेंच नव्हे तर कर देण्याचें टाळल्यास जमिनी सरकारजमा होऊन विक्रीस निघाल्यावर त्यांची मालकी पैसेवाल्या व पुढारलेल्या वर्गाकडे कशी जाईल व आजपर्यंतचा मिरासदार स्वतंत्र शेतकरी उपरी होऊन भांडवलवाल्यांचा गुलाम कसा बनेल हेंहि या पहिल्या लेखांत प्रतिपादन केलें आहे.

दुसरा लेखही असाच महत्त्वाचा आहे. महात्मा गांधीसारखे निःस्वार्थी पुढारी बहुजनसमाजाच्या उद्धाराकरितांच झटत आहेत ह्मणून त्यांचेवर विश्वास ठेवून दुसऱ्या वर्गाची वाट न पाहातां स्वातंत्र्यसंग्रामांत उडी घेतली पाहिजे असा मुद्दा पुढें आणला जातो, त्याला उत्तर या लेखांत चांगल्या प्रकारें दिलें आहे.

पुढारलेला वर्ग कायदेभंगाची चळवळ करीत आहे तेव्हां मागसलेल्या वर्गानें करबंदीची चळवळ करावी व अशा रीतीनें दोन्ही बाजूनें सरकारवर

हल्ला चढऊन त्याचा पाडाव करावा असें कोणी ह्मणेल. परंतु कायदेभंग आणि करबंदी यांतील स्वार्थत्यागाचें प्रमाण सारखें नाहीं असें सिद्ध करून पुढारलेल्या वर्गाची लबाडी उघडी पाडली आहे. गुजराथेंतील ज्या पाटलांनीं राजीनामे दिले त्याच्या दहाव्या हिश्शानेंहि तलाठ्यांनीं दिले नाहींत. इतकेंच नव्हे तर हा पुढारलेला "चाणक्यवर्ग कुलकर्णीकीप्रमाणें पाटीलकीही आपल्या मांडीखालीं घेण्याचें कारस्थान" करण्यास चुकणार नाहीं. शेतकऱ्याकडून करबंदी सुरू झाल्यास सावकार आपलें व्याज सोडणार नाहीं, डाक्टर त्यांना फुकट औषध देणार नाहींत व यासाठीं या पुढारलेल्या वर्गांतील लोक झीज सोसण्यास तयार नाहींत हें स्पष्ट आहे. "उलट लिलावाला निघालेल्या जमिनी गिळंकृत करण्यास चळवळींतले बहुरूपी पुढें येतील" अशी रा. रा. देसाई यांस पडलेली भीति खरी नाहीं असें ह्मणण्याचें धाष्टर्य किती लोक करतील?

श्रीशिवाजी महाराजांचे काळीं स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं मावळ्यांनीं इतरांची वाट न पाहतां आपल्या सर्वस्वावर पाणी सोडलें. त्याचप्रमाणें आज स्वराज्यप्राप्तीसाठीं म. गांधींच्या पुढारीपणाखालीं शेतकऱ्यांनीं करबंदीची चळवळ करून आपल्या सर्वस्वावर पाणी सोडण्यास तयार झालें पाहिजे. तसें न केल्यास तो आत्मघात आहे अशा आक्षेपास तिसऱ्या लेखांत उत्तर दिलें आहे.

शिवाजी महाराज व म. गांधी यांत काल, मार्ग, उपाययोजना, साधनसामुग्री वगैरे सर्वच बाबतींत भिन्नपणा आहे. महात्माजी सर्वाधिकारी नाहींत. त्यांच्या चळवळीचा फायदा भांडवलवाले व बुद्धिजीवी लोक घेत असतां त्यांचें कांहीं चालत नाहीं. स्वराज्यप्राप्तीच्या हेतूसिद्धीसाठीं लोक महात्माजीस मानतात, पण महात्माजींनीं उपदेशिलेली अस्पृश्यतानिवारणाची चळवळ किंवा हिंदु-मुसलमान ऐक्य या कामीं महात्माजींना सच्चे अनुयायी थोडेच मिळतात.

मागसलेल्या वर्गांतील नोकरांना नोकरी सोडण्याचा उपदेश—हा बहुधा धमकीच्या स्वरूपांत असतो—करण्यास जो तो पुढें येत आहे. त्या उपदेशाप्रमाणें कोणी न वागल्यास त्यावर बहिष्कार घालून त्याचा छळ करण्याचा उपदेश इटकून व्हावयाचाच. विशेषत पुढारलेल्या वर्गांचें वर्तन मागसलेल्या वर्गाशीं त्याप्रमाणें आजही कायदेबाजांचें आहे.

त्यांचाच जोडीदार व्यापारीवर्ग. तोही आपली कातडी बचावण्यास उत्सुक. या वर्गांतूनच प्राप्तीवरील कराचा बहुतेक भरणा होतो. पण करबंदीचा उपदेश करतेवेळीं प्राप्तीवरील कर देऊं नका व अशा रीतीनें सरकारी खजिन्यास खळगा पाडा असा उपदेश करण्यास व्यापारी वर्गापैकीं कोणी पुढें येत नाहींच; पण पुढारलेल्या वर्गापैकींही कोणी तसें सांगत नाहीं. दोन्हीही वर्गांचे वक्ते शेतकरी लोकांस सारा देऊं नका असा अट्टाहासानें उपदेश करतात. तो केवळ शेतकऱ्यांच्याच हिताच्या दृष्टीनें नव्हे तर एकंदर देशाच्या हिताच्या दृष्टीनें किती घातक आहे हें या लेखांत दाखविलें आहे. या चळवळीनें शेतकरी वर्गांचें सर्वस्वी नुकसान होणार आहे. इतकेंच नव्हे तर कर देण्याचें टाळल्यास जमिनी सरकारजमा होऊन विक्रीस निघाल्यावर त्यांची मालकी पैसेवाल्या व पुढारलेल्या वर्गाकडे कशी जाईल व आजपर्यंतचा मिरासदार स्वतंत्र शेतकरी उपरी होऊन भांडवलवाल्यांचा गुलाम कसा बनेल हेंही या पहिल्या लेखांत प्रतिपादन केलें आहे.

दुसरा लेखही असाच महत्त्वाचा आहे. महात्मा गांधीसारखे निःस्वार्थी पुढारी बहुजनसमाजाच्या उद्धाराकरितांच झटत आहेत ह्मणून त्यांचेवर विश्वास ठेवून दुसऱ्या वर्गांची वाट न पाहातां स्वातंत्र्यसंग्रामांत उडी घेतली पाहिजे असा मुद्दा पुढें आणला जातो, त्याला उत्तर या लेखांत चांगल्या प्रकारें दिलें आहे.

पुढारलेला वर्ग कायदेभंगाची चळवळ करीत आहे तेव्हां मागसलेल्या वर्गानें करबंदीची चळवळ करावी व अशा रीतीनें दोन्ही बाजूनें सरकारवर

हल्ला चढवून त्याचा पाडाव करावा असें कोणी ह्मणेल. परंतु कायदेभंग आणि करबंदी यांतील स्वार्थत्यागाचें प्रमाण सारखें नाहीं असें सिद्ध करून पुढारलेल्या वर्गाची लबाडी उघडी पाडली आहे. गुजराथेंतील ज्या पाटलांनीं राजीनामे दिले त्याच्या दहाव्या हिश्शानेंहि तलाठ्यांनीं दिले नाहींत. इतकेंच नव्हे तर हा पुढारलेला "चाणक्यवर्ग कुलकर्णीप्रमाणें पाटीलकीही आपल्या मांडीखालीं घेण्याचें कारस्थान" करण्यास चुकणार नाहीं. शेतकऱ्या-कडून करबंदी सुरू झाल्यास सावकार आपलें व्याज सोडणार नाहीं, डाक्टर त्यांना फुकट औषध देणार नाहींत व यासाठीं या पुढारलेल्या वर्गांतील लोक झीज सोसण्यास तयार नाहींत हें स्पष्ट आहे. "उलट लिलावाला निघा-लेल्या जमिनी गिळंकृत करण्यास चळवळींतले बहुरूपी पुढें येतील" अशी रा. रा. देसाई यांस पडलेली भीति खरी नाहीं असें ह्मणण्याचें धाष्टर्य किती लोक करतील?

श्रीशिवाजी महाराजांचे काळीं स्वातंत्र्य मिळविण्यासाटीं मावळ्यांनीं इतरांची वाट न पाहतां आपल्या सर्वस्वावर पाणी सोडलें. त्याचप्रमाणें आज स्वराज्यप्राप्तीसाठीं म. गांधींच्या पुढारीपणाखालीं शेतकऱ्यांनीं करबंदीची चळवळ करून आपल्या सर्वस्वावर पाणी सोडण्यास तयार झालें पाहिजे. तसें न केल्यास तो आत्मघात आहे अशा आक्षेपास तिसऱ्या लेखांत उत्तर दिलें आहे.

शिवाजी महाराज व म. गांधी यांत काल, मार्ग, उपाययोजना, साधनसामुग्री वगैरे सर्वच बाबतींत भिन्नपणा आहे. महात्माजी सर्वाधिकारी नाहींत. त्यांच्या चळवळीचा फायदा भांडवलवाले व बुद्धिजीवी लोक घेत असतां त्यांचें कांहीं चालत नाहीं. स्वराज्यप्राप्तीच्या हेतुसिद्धीसाठीं लोक महात्माजींस मानतात, पण महात्माजींनीं उपदेशिलेली अस्पृश्यतानिवारणाची चळवळ किंवा हिंदु-मुसलमान ऐक्य या कामीं महात्माजींना सच्चे अनुयायी थोडेच मिळतात.

पंडित जवाहिरलाल यांच्या भिडेस्तव महात्माजी आपलें मत बदलण्यास तयार होतातच व आपल्या अनुयायांच्या भिडखातर अस्पृश्यतेचा प्रश्न नजरे-आड करतात असेंही दिसून येत आहे.

लोकसत्तेच्या काळीं लोकमताप्रमाणें वागण्याची आवश्यकता महात्माजींना भासत आहे. तेव्हां केवळ महात्माजींच्या शब्दावर करबंदीच्या चळवळींत उडी न घेतां योग्यायोग्य पाहण्यास शेतकऱ्यास मुभा पाहिजे.

याच लेखांत रशियांतील पुढारी लेनीन व महात्मा यांतील फरक दाखवून महात्माजी त्या दृष्टीनें कसे फिके पडतात हें दाखविलें आहे.

चौथ्या लेखांत करबंदीच्या चळवळीपासून झालेले दुष्परिणाम दाखविले आहेत. या चळवळीचे जे कांहीं थोडे फायदे आहेत ते बुद्धिजीवी लोकांनीं उपटले व तोटे मात्र शेतकरी लोकांच्या वाट्यास आले. परदेशी मालावरील बहिष्कारामुळें आमच्या कच्च्या मालाची किंमत कमी झाली व त्यामुळें शेतकऱ्यांचें प्रत्यक्ष नुकसान झालें आहे. कच्चा माल येथेंही खपत नाहीं. त्यामुळें शेतकऱ्यांची स्थिति फार खालावली. त्याला सरकारी फाळा देणें परवडेना व सावकारी खंड जो शेतसाऱ्याच्या तिप्पट चौपट आहे तो नक्तीनें देणें अशक्य झालें आहे. स्वस्ताईमुळें शेतकरी बुडाला; पण सरकारी नोकर जास्त शिल्लक टाकूं लागला. या रकमेचा उपयोग जमिनी खरेदी करण्याकडे होणार. याचा अर्थ करबंदीच्या चळवळीनें शेतकऱ्यांच्या जमिनी शेत काम न करणाराकडे जास्त प्रमाणांत जाण्यांत होत आहे.

पाचव्या लेखांत करबंदीचे दुष्परिणाम आणखी वर्णिले आहेत. गुजराथेंत जमिनी सोडून संस्थान हद्दींत जाण्याचा उपदेश शेतकऱ्यांस करण्यांत आला. तोही किती नुकसानीचा आहे हे सांगण्यास नको. करबंदीचा स्पष्ट परिणाम सरकारच्या तिजोरीवर झाल्यास त्यांना आपले खर्च कमी करावे लागतील. बंदोबस्तासाठीं करावा लागणारा खर्च कमी न होतां उलटा वाढवावा लागेल, मग धाड येणार ती शिक्षण, आरोग्य, शेतकी, वगैरे राष्ट्रसंवर्धक खात्या-

वरच. एकंदरींत नुकसान मागासलेल्या वर्गाचें. इंग्लंडांतील मजूरपक्ष साम्राज्यवृद्धीविरुद्ध आहे. कारण या वाढीचा फायदा मजुरास न मिळतां तो इंग्लंडच्या बुद्धिजीवी वर्गास मिळतो. तीच गोष्ट शेतकरी आणि हिंदुस्थानाची. स्वराज्य मिळाल्यास त्याचा फायदा बुद्धिजीवी लाटणार व शेतकरी आणि मजूर यांना कांहीं मिळणार नाहीं. स्वराज्य मिळाल्यावरोबर यादवी माजेल व त्यांत जास्त नुकसान शेतकरी व मजुरांचेंच. बुद्धिजीवी वर्ग स्थिरस्थावर झाल्यावर शिरजोर होईल.

सातव्या लेखामध्यें एका निराळ्या चळवळीचा उपक्रम केला आहे व हीच चळवळ देशाच्या खऱ्या हिताची आहे असें पुढील लेखांत दाखविलें आहे. करबंदीची राजकीय चळवळ सुरू झाली आहे ती बंद करणें कठीण आहे. शेतकरी वर्ग भोळा असल्यानें इच्छा नसतांही तो या चळवळींत ओढला जाईल. करितां या चळवळीस पायबंद घालण्यासाठीं तिच्याबरोबर खंडबंदीची चळवळ सुरू केली पाहिजे. ह्मणजे सरकारी फाळा देऊं नये असा उपदेश करणारांनीं शेतकऱ्याकडून येणाऱ्या खंडांत सूट दिली पाहिजे. आपण होऊन पांढरपेशा वर्ग या कामीं पुढें येणार नाहीं. आपली कातडी बचावून चळवळ करावयाची हें या वर्गाचें आजपर्यंतचें धोरण आहे. स्वार्थत्याग करण्यास तो वर्ग तयार नाहीं. पण त्यांची आस्था कितपत खरी आहे. याची परीक्षा या खंडबंदीनें होणार आहे. त्यांनीं या चळवळीच्या वाटेंत अडचणी आणल्यास त्यांना आस्था नाहीं हें स्पष्ट शाबीत होणार आहे.

देशाच्या खऱ्या उन्नतीचे मार्ग सातव्या लेखांत दाखविले आहेत. हिंदुस्थानांत शेतकरी वर्ग सर्वांत संख्येनें मोठा आहे व तो कर्जांत बुडाला आहे. व याचाच परिणाम देश परतंत्र झाला हा आहे. यासाठीं देशाचें पारतंत्र्य जावें अशी इच्छा असल्यास शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे. आजच्या स्थितीस शेंकडा ७५।८० शेतकरी कर्जबाजारी आहेत. व त्यांच्या जमिनी सावकाराकडे गेल्या आहेत. वास्तविक पाहतां शेत कस-

णाराच जमिनीचा मालक पाहिजे. ही स्थिती पूर्वी होती पण या कालांत ती स्थिति बिघडली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी पैसेवाल्या लोकांकडे जाण्याचें काम झपाट्यानें सुरू आहे. व सध्याची चळवळ या स्थित्यंतरास मदतच करीत आहे.

अलीकडे समाजसत्तावादाचीं तत्वें विचारी लोकांस पटू लागलीं आहेत. संपत्ति उत्पन्न करण्याचीं साधनें राष्ट्राच्या मालकीचीं झालीं पाहिजेत. या साधनांत जमीन मुख्य आहे. तिची मालकी राष्ट्राकडे आली पाहिजे. याचा अर्थ मधला कष्ट न करणारा वर्ग याची मालकी नष्ट झाली पाहिजे. इंग्लंडांत खाणी राष्ट्रीय मालकीच्या होत आहेत व मालकांची सत्ता काढून टाकण्यांत येत आहे. तशीच गोष्ट शेतजमिनीची झाली पाहिजे.

शेत जमिनींत पैसा कमी व्याजानें गुंतविण्यास सावकार तयार असतो. कारण त्याच्या हातीं अनेक रीतीनें सत्ता खेळत असते. जमिनींतून सावकार निघाल्यास शेतकरी वर्गाचें दास्य जाईल व रिकामें झालेलें भांडवल व्यापारांत गुंतवावें लागेल असा दुहेरी फायदा होणार आहे.

जमिनींतून सावकाराचा हात काढणें किती कठीण आहे हें आठव्या लेखांत दाखविलें आहे. करबंदीची चळवळ शेतकरी वर्गाच्या नुकसानीची व सावकाराच्या फायद्याची आहे. या चळवळीनें जमीन मालकीनें करणार बरेच लोक उपरी कुळांत जाणार. चळवळीस यश येऊन कर कमी झाल्यास त्याचा फायदा सावकारास मिळेल शेतकऱ्यांस मिळणार नाहीं. कर न दिल्यामुळें शेतकऱ्यांच्या जमिनी लिलावांत निघतील व त्या सावकारच घेणार. सावकार हा अखेर सरकारच्याच बगलेंत शिरून आपला स्वार्थ साधील. सावकारी ही भांडवलशाहीची कन्या असून सरकारी कायद्याच्या जोरावर तिचें पोषण झालें आहे. व यामुळें ती शेतकऱ्यांचें रक्त शोषीत आहे मोठे जमीनदारही याच वर्गातले. पण ते सावकारापेक्षां थोडे बरे. सरकार उत्पन्नांतील

$\frac{1}{5}$ किंवा $\frac{1}{6}$ घेणार तर सावकाराची मजल कधीं कधीं $\frac{3}{4}$ घेण्यापर्यंत जाते. सावकाराच्या जुलमास आळा घालण्याकरितां खंडबंदीची चळवळ पाहिजे."

पण या चळवळीस सरकारचा पाठिंबा मिळावयाचा नाहीं. वर्तमान पत्रांतही या चळवळीस प्रोत्साहन मिळणार नाहीं. यास अनुकूल असा कायदा कौन्सिलांतहि पास होणार नाहीं. या कामीं देशाची खरी कळकळ असणारांनींच मदत केली पाहिजे. शेतकऱ्यास योग्य सल्ला देऊन क्रमाक्रमानेंच जमिनी पड पाडून जबर खंड कमी करीत आणला पाहिजे. स्वराज्यप्राप्तीचा खरा उपाय ही खंडबंदीच आहे. खंडकपात करून हळू हळू हें ध्येय गाठावयाचें आहे.

यापुढील ९।१० हे लेख खंडबंदीनें राष्ट्रहित कसें साधेल हें दाखवितात.

आमच्या देशांत खरा धन उत्पन्न करणारा शेतकरी वर्ग आहे. पण त्याच्या उत्पन्नांतील बराच मोठा भाग ऐतखाऊ सावकार खात असल्यानें शेतकरी जास्तच दरिद्री होत आहे. जमिनीची किंमत फाजील वाढली आहे. कारण खंडवसुली वाजवीपेक्षां जास्त होत आहे. ही खंडवसुली कमी झाल्याशिवाय शेतकऱ्याची सुधारणा होणार नाहीं. यासाठीं हें काम राष्ट्रहिताच्या दृष्टीनें फार महत्वाचें आहे.

पण सध्याचे चळवळे हे भांडवलशाहीशीं समरस आहेत. ते शेतकऱ्यावर चरणारे आहेत. शेतकऱ्यास तारणारे नाहींत. यासाठीं शेतकऱ्यांच्या खऱ्या हितचिंतकांनीं आतां खंडबंदीच्या कामास हात घातला पाहिजे. हा रोग अनेक वर्षे हळू हळू शेतकरी वर्गास ग्रासीत आहे. हा एकदम दूर करतां येणार नाहीं. सन १९२०।२१ सालीं सातारा जिल्ह्यांत जमिनी पड पाडून सावकारशाही उखडण्याचा प्रयत्न झाला. पण तो अयशस्वी ठरला कारण त्या कामीं घाई फार झाली. तो प्रयत्न क्रांतीच्या स्वरूपाचा होता.

धीमे धीमे सुधारणा करण्याचा नव्हता. त्या अपयशानें सावध होऊन आपल्या पुढाऱ्यांनीं धीमेपणानें आपली चळवळ चालविली पाहिजे.

क्रमाक्रमानें खंड कमी होत गेल्यास जमिनी विकत किंवा गहाण घेण्यास सावकार-नाखुष होतील, सावकाराच्या हातीं जमिनी जाण्याच्या क्रमास आळा पडेल. शेतकऱ्यांत एकोपा वाढेल, त्यांच्यांतील फूट कमी होईल. अशा रीतीनें आम्ही स्वराज्य संपादण्यास व उपभोगण्यास पात्र होऊं.

या पुस्तकाच्या प्रकाशनानें शेतकरी वर्गांत खळबळ उडून, ते आपल्याविषयीं विचार करूं लागल्यास, देशोन्नतीच्या कामीं मोठें साह्य होणारें आहे. ब्राह्मणेतर पक्षानें ही चळवळ आपले हातीं घेऊन तिचा पुरस्कार करणें अत्यंत जरूरीचें आहे.

कोल्हापूर
ता. ६।५।१९३१

**भास्करराव विठोजीराव जाधव.**
एम्. ए., एल्. एल्. बी.

# आजचें
# स्वराज्याचें मुख्य साधन
# खंडबंदी.

४३६०

## करबंदी आधीं कीं खंडबंदी?

करबंदी हा कांग्रेसच्या अनेकांपैकीं एक मुख्य कार्यक्रम आहे. आणि तो, सरकाराशीं कांग्रेसपक्षाचा समेट झाला नाहीं, तर अमलांत आणण्याच्या पूर्वतयारीला लवकरच सुरुवात होईल. यासाठीं करबंदीची इष्टानिष्टता जनतेसमोर आगाऊंच ठेवणें हें आवश्यक कर्तव्याचें होय.

स्वराज्य, जरी तें कोणत्या प्रकारचें पाहिजे आहे याविषयीं बराच वाद असला तरी, सर्वांनाच हवें आहे. परंतु साधनासंबधांत मात्र एकवाक्यता होणार नाहीं. आणि यांत अस्वाभाविक असेंहि कांहीं नाहीं. आणि ह्मणून कांग्रेसपक्ष करबंदी हें एक रामबाण साधन मानीत असला तरी त्यावरचा त्याचा विश्वास निःस्वार्थ बुद्धीचा, निर्विकारी दृष्टीचा आणि सांगोपांग विचारावरचा आहे काय, हें प्रथमतः पाहिलें पाहिजे.

'सर्वे गुणाः कांचनमाश्रयंते' या न्यायानें कर हाच सरकारचा जिव्हाळा किंवा जीवन आणि तें तर सर्वांशीं रयतेच्या अगर प्रजेच्या हातीं

आहे मग प्रजेनें करबंदी अमलांत आणल्यावर सरकारचें अस्तित्व राहातें कोठें, हा कांग्रेसपक्षाच्या युक्तिवादाचा सारांश. हा अत्यंत मनोरम आणि त्रैराशिक पद्धतीनेंच उत्तर काढावयाचें झाल्यास अचूक गुणकारी. परंतु एथें मांजराच्या गळ्यांत घाट बांधावी कोणी, असा व्यवहारदृष्ट्या प्रश्न पुढें येतो. करबंदीचा मुख्य अभिप्रेतार्थ ह्मणजे शेतसारा न देणें हा होय. पण शेतसाऱ्यावरच आज सरकारचा खर्च भागत आहे काय ? नाहीं. कारण प्रांतिक सरकारांसुद्धां हिंदुस्थान सरकारचा वार्षिक खर्च दरसाल सुमारें सव्वा दानशें कोटींचा आहे. आणि यांत शेतसाऱ्याचें उत्पन्न केवळ चौतीस पस्तीस कोटी रुपयांचें असतें. तेव्हां एकूण एक शेतकऱ्यांनीं वा जमीनदारांनीं कर देण्याचें नाकारिलें, ही अगदीं अशक्य गोष्ट गृहीत धरिली तरी आणि अबकारी खात्याकडील सुमारें सोळा कोटी रुपयांचें उत्पन्नहि वजा केलें तरी, सरकारच्या पाउणें दोनशें कोटी रुपये उत्पन्नाला खोट कशी बसणार ? अर्थात करबंदी झाली कीं ती शेतसाऱ्यापुरतीच संकुचित टेवून भागणार नाहीं. तर तिच्या पोटांत कस्टम, इनकमटॅक्स, मीठ, अफू, स्टॅंप, फारेस्ट, रजिस्ट्रेशन, इरिगेशन इत्यादिक खातींहि आलीं पाहिजेत. पण करबंदीचा जबडा इतका वाढविण्यास कांग्रेसपक्ष बिलकूल तयार नाहीं. याचें कारण काय ? सध्याच्या चळवळीला व्यापारी वर्गाचें आनुकूल्य आहे, असें हरवक्त सांगण्यांत येतें. आणि कांग्रेस वर्किंग कमिटीनें, आह्मी ह्मणतों, तितकी जरी करबंदीची व्याप्ति वाढविलेली नाहीं तरी इनकमटॅक्स देऊं नये, अशी एक तिची आज्ञा आहे. परंतु ती एकाहि व्यापाऱ्यानें पाळिल्याचें विश्वसनीय उदाहरण पुढें आलें नाहीं. आणि जोंपर्यंत अशा रीतीनें व्यापारी वर्ग सर्वस्वावर तिलांजुळी देण्यास तयार होणार नाहीं तोंवर शेतसारा भरणारांत ज्यांची बहुसंख्या आहे, अशा सामान्यतः दरिद्री बहुजन समाजानें आत्मयज्ञास तयार व्हावें, असें जर कांग्रेसपक्षाचें ह्मणणें असेल तर त्यांची ती वृत्ति 'पराय घरपर तुलशी-नारायण' यासारखीच अश्लाघ्यपणाची ठरणार नाहीं काय ? ह्मणून

जोंपर्यंत शहरांतील लोकांनीं इनकमटॅक्स देण्याचें नाकारिलेलें नाहीं तोंवर शेतकऱ्यांना शेतसारा देऊं नका ह्मणून सांगणें ह्मणजे शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा निर्दयतेनें गैरफायदाच घेणें होय.

केवळ व्यापाऱ्यांनीं इनकमटॅक्स द्यावयाचा नाहीं, असा सत्याग्रह पत्करिला कीं तेवढ्यानेंच करबंदीच्या तत्त्वाची परिपूर्तता होत नाहीं. तर करबंदीनें सरकारास मेटाकुटीस आणावयाचें तर साऱ्या हिंदी नोकरांनींहि आपापल्या नोकरीला लाथ मारून बाजूला झालें पाहिजे. परंतु इनकमटॅक्ससंबंधीं नुसती भाषा काढून सारा जोर जसा शेतसाराबंदीवरच कांग्रेस पक्षानें दिला आहे तद्वतच कांग्रेस पक्षाची सेना नेहमीं सांगकाम्या पोलिसांवरच तुटून पडते ! आमच्याच लोकांनीं आमच्यावर लाठी चालवावी काय, असा मोठ्या गांभीर्यानें कांग्रेस पक्षाचे पुढारी सवाल करीत असतात; परंतु आमच्याच सुशिक्षित हिंदू बंधूंनीं आमच्यावर लाठी चालविण्यास, तुरुंगांत डांबण्यास हुकूम द्यावा काय, असें एकदांहि उद्गार निघाल्याचें आमच्या तरी कानावर आलें नाहीं ! पोलीस ह्मणजे काय सांगितलेल्या कामाचे आणि घातलेल्या अन्नाचे. आज त्यांनीं नोकरीवर लाथ मारणें ह्मणजे स्वतःच्या पोटावरच लाथ मारून घेणें होय. शिवाय पोलिसपणाच्या कामाला विशेष अकलेची गरज नाहीं, आणि हिंदुस्थानांत बेकारी असल्यामुळें जुन्या पोलिसांची जागा नव्यांनीं भरून काढण्यास सरकारास पळभर आणि तीळभरहि कष्ट पडणार नाहींत. अशा परिस्थितींत पोलिसांनीं नोकरीला कंटाळावें ह्मणून त्यांची अवहेलना सतत करावयाची आणि स्वकीय मॅजिस्ट्रेटकडे मात्र राजकीय कैद्यास ‘ अ ’ वर्ग मिळावा ह्मणून आंतून रदबदली करावयाची, याचा अर्थ ‘देवो दुर्बल घातकः ’ असाच नव्हे काय ? ह्मणून जोंपर्यंत मॅजिस्ट्रेट, जज्ज, मामलतदार, प्रांत इत्यादिक अधिकाराच्या जागा, इंग्रजीचें—वाघिणीचें—दूध प्यालेले स्वकीय हिंदी लोक सोडावयास तयार नाहींत तोंवर निरक्षर वा साक्षर पोलिसांचा तिरस्कार करावयाचा हे तर आततायापणाच्या

पक्षपाताचेंच आहे. आणखी करबंदीच्या काळांत शेतकऱ्यांची मालमत्ता जप्त करून व त्यांना सतावून सोडण्याची कामगिरी करून तिच्या मोबदल्यांत हिंदुस्थानावर कर्जाचा डोंगर उभारणें हें तर कांग्रेस पक्षाच्या दृष्टीनें अत्यंत निषिद्ध ठरलें पाहिजे.

हिंदुस्थानावर कर्जाचा डोंगर उभारण्यास सरकारी नोकर कशी मदत करतात, याचा कित्येकांना एकदम बोध होणार नाहीं. त्यासाठीं खुलासा करावयाचा कीं, जर करबंदी अमलांत आली तर अर्थातच सरकारची तिजोरी रिती राहाणार. पण असें झाल्यावर सरकारनें आपल्याच नोकरांचा पगार भागवावयाचा कोठून ? अर्थात् कर्ज काढूनच. आतां विद्यमान सरकाची सत्ता नाहींशी झालीच तर त्याच्याबरोबर त्याच्यावरच्या कर्जाचा बोजाहि झिडकारून टाकतां येईल ! परंतु जर कां विद्यमान सत्ता पुढेंहि टिकूनच राहिली तर करबंदीचें प्रायश्चित्त आम्हास सवाई दिडीनें भोगावें लागणार नाहीं काय ? यासाठीं करबंदी अमलांत आणावयाची असेल तर तत्पूर्वीं पदवीधर हिंदी नोकरांनीं वर सांगितल्याप्रमाणें परकीय सरकारच्या सेवावृत्तीला सोडचिठी दिली पाहिजे किंवा कांग्रेसपक्षीयांनीं त्यांच्याकडून देवविली पाहिजे. पण असें न करितां ते एकदम शेतकऱ्यांनाच करबंदीच्या खाईत लोटूं लागले तर कांग्रेस पक्षहि जबरदस्तांना खांद्यांवर घेऊन गरिबांना पायाखालीं तुडविणारांपैकीं आहे, हें आज ना उद्यां चांगलेंच स्पष्ट होईल.

पदवीधर हिंदी लोकांनीं सरकारी नोकरी सोडल्याशिवाय आणि व्यापाऱ्यांनीं इनकमटॅक्स देण्याचें नाकारल्याशिवाय साराबंदीचा प्रश्नच मुळीं उपस्थित होणार नाहीं, हाच जरी आमच्या उपरोक्त विवेचनाचा सारांश असला तरी जोपर्यंत वकिलांनीं कोर्टांवर बहिष्कार पुकारला नाहीं तोंवर सरकारी नोकरास नोकऱ्या सोडा ह्मणून सांगणें, हें अत्यंत मूर्खपणाचें होय. कारण वकील ह्मणजे देशांतले सांगून सवरून शहाणे ! आणि कांग्रेसपक्षांत वकिलांचाच वर्चष्मा आहे. ह्मणजे इतरांपेक्षां स्वाभिमान आणि स्वातंत्र्य याचें

महत्त्व वकील वर्गालाच जास्त कळतें, ही गोष्ट नेहमींच गृहीत धरिली पाहिजे. तेव्हां अशांनीं परकीय सरकारच्या न्यायदानावर सामान्य जनतेस विश्वास ठेवण्यास प्रवृत्त करून कोर्ट फी आणि स्टँप फीच्या रूपांत सरकारचें उत्पन्न वाढविण्यास मदत करणें हें करबंदीच्या काळांत, त्यांना जर करबंदीचें तत्त्व मान्य असेल तर, अत्यंत बेशिस्त आणि अनिष्ट आहे. स्वराज्य कशाशीं खावें हें ज्यास ठाऊक नाहीं अशा अशिक्षित शेतकऱ्यांनीं करबंदीनें सरकारांचें उत्पन्न तोडण्याचा प्रयत्न करावयाचा तर इकडे देशभक्त किंवा अखिल भारतीय युद्धमंडळाच्या सर्वाधिकाऱ्यांनीं कोर्ट फीच्या द्वारें सरकारचें उत्पन्न वाढवीत राहावें हें परस्परविरुद्ध, उपहासास्पद आणि विचित्रच नव्हे. आणि ह्मणूनच आमचें तर असें ठाम मत झालें आहे कीं, वकिलांचा कोर्टावरील बहिष्कार हाच करबंदीचा पाया ठरविण्यांत आला पाहिजे. आणखी इनकमटॅक्स न देणें किंवा शेतसारा न भरणें या इतकें सरकारी कोर्टांतील वकिली सोडणें हें जोखमीचें किंवा धोक्याचें नव्हे. कारण करवसुलीसाठीं सरकार व्यापाऱ्याची पेढी किंवा दुकान आणि शेतकऱ्यांचीं गुरेंढोरें जप्त करील. परंतु सनद रद्द करण्यापलीकडे सरकारास वकिलांचें कांहींच वांकडें करतां येणार नाहीं. आणि वस्तुत: सरकाराशीं व्यापारी शेतकऱ्यांपेक्षां वकिलांचाच जास्त संबंध येतो ह्मणजे व्यापारी व शेतकऱ्यांनीं केलेल्या असहकारितेपेक्षां वकिलांची असहकारिता सरकारास विशेष असह्य होईल ! यासाठीं आधीं वकिलांनीं कोर्टावर बहिष्कार घातला पाहिजे, नंतर अधिकाराच्या जागेवरील हिंदी नोकरांनीं राजीनामा दिला पाहिजे. आणि या दोन गोष्टी अमलांत आल्यावरच इनकमटॅक्स न देण्याचा आणि शेतसारा न भरण्याच्या असिधाराव्रताचा व्यापाऱ्यांनीं आणि शेतकऱ्यांनीं अवलंब केला पाहिजे. असा सत्याग्रह कांग्रेसपक्षाला धरतां येईल. परंतु करबंदी, वरीलप्रमाणें पाया न भरतांच, अमलांत यावी ह्मणून स्वातंत्र्याची पुंगी वाजवून शेतकऱ्यांनाच ते गुंगवूं लागले तर बहुजन समाजाचें सत्त्व शोषण करून पुष्ट बनलेल्या बुद्धिजीवी आणि भांडवलवाल्या दुकलीच

कांग्रेसपक्ष हा एक अर्क आहे, अशी जर आमच्या सारख्यांची समजूत होऊं लागली तर ती अस्थानीं कशी हें दाखविण्याची जबाबदारी कांग्रेस पक्षावरच येत नाहीं काय ?

बरें वकील आणि हिंदी अधिकारी जर वरील प्रकारच्या स्वार्थत्याग करण्यास तयार झाले नाहींत तर त्यांना स्वराज्य नको आहे, असा त्याचा अर्थ घ्यावयाचा कीं स्वराज्यप्राप्तीसाठीं त्यांनीं दुसरें कोणतें व्रत घेतलेलें आहे? चालू चळवळींत वकिलांनीं कां भाग घेतला नाहीं, असें कांग्रेसपक्षाच्या पगारी प्रचारकाला कोणी विचारिलेंच तर ते अशी समजूत करतात कीं 'त्यांची आंतून मदत आहे'! वकिलांच्या अशा आंतून मदतीनेंच जर स्वराज्याची चळवळ प्रगमनशील ठेवतां येतें तर शेतकऱ्यांनीहि आंतूनच मदत करावी, अशी कांग्रेस पक्ष कां बरें अपेक्षा करीत नाहीं? आंतून मदत करणें ह्मणजे स्वतःची कातडी शाबूत ठेवणें, हाच त्याचा स्पष्ट आणि निर्विवाद अर्थ नव्हे काय? आणि वकिलांनीं स्वतःची कातडी सुरक्षित ठेवून त्यांनीं केलेल्या आंतल्या मदतीवरच जर कांग्रेसपक्ष संतुष्ट राहील तर त्याचा, शेतकऱ्यांना होत असलेला, करबंदीचा ह्मणजे शेताशिवारास, घरादारांस आणि गुरांढोरांस मुकण्याचा, उपदेश सद्धेतूचा आहे, असें पाहिजे तर कांग्रेस पक्षाच्या पगारी भाटांनीं किंवा चाणक्य वर्गानेंच ह्मणावें, आह्मी मात्र या कृतीला स्वातंत्र्याच्या नांवाखालीं गरीब आणि भोळ्या अतएव प्रवाहपतित शेतकरी वर्गाचा गळा कापणें असेंच समजतों. आणि आमची ही समजूत खोटी आहे, असेंच जर कोणास सिद्ध करावयाचें असेल तर त्यांनीं आधीं स्वातंत्र्याकरितां पेटलेल्या यज्ञांत वकिलांची आणि अधिकारांच्या जागांवरील हिंदी गृहस्थांनी आहुति द्यावी. आणि आमच्या मतें हेंच काम कष्टाचें आहे. शेतकरी काय बापडे बकरींच! त्यांच्या हव्या तेव्हां कोणीहि माना कापाव्या!

व्यापाऱ्यांनीं इनकमटॅक्स भरला, पदवीधर हिंदी गृहस्थ सरकारी नोकरीसच कवटाळून बसले आणि वकिलांनींहि कोर्टांतच गाडून घेतलें तर त्या

त्रिवर्गाला स्वराज्यप्राप्तीसाठीं खिशाला खार लावून घेण्याची गरज नाहीं किंवा त्यांना स्वराज्यहि नको आहे. आणखी स्वराज्याच्या अभावी त्यांचें काय अडलेलें आहे! ते बहुजन समाजावर आज खुशाल चरत आहेत आणि ह्मणून स्वराज्य पाहिजे तें मुख्यत: शेतकऱ्यांनाच होय. कारण परकीय सत्तेमुळें करभाराखालीं शेतकरी जर्जर झाले आहेत. आज पन्नास साठ वर्षे लोकलफंड भरूनहि त्यांच्या पोराबाळांना शिक्षण मिळत नाहीं; ईश्वरनिर्मित जंगलांत चुकूनहि त्यांची गाय शिरणें चोरीचें झालें, एवंच इंग्रजी राज्य ह्मणजे मुख्यत: शेतकऱ्यांना आपत्कालच होय. तेव्हां यांतून जर शेतकरी वर्गाला सुटका करून घेऊन सुखानें चार घास खाण्याची इच्छा असेल तर त्यानें स्वराज्य मिळविण्यासाठीं आपल्याबरोबर व्यापाऱ्यांनीं, सरकारी नोकरांनीं आणि वकिलांनीं यावें, अशी आशा बाळगून बसण्यांत कांहींच मतलब नाहीं. तर त्यानें एकाकींच स्वातंत्र्य-संग्रामांत उडी टाकिली पाहिजे. आज व्यापारी, सरकारी नोकर व वकील वर्ग वैशिष्ट्यानें स्वातंत्र्यसंग्रामांत न पडोत परंतु म. गांधी पं. नेहरू, सरदार पटेल देवी सरोजिनी, पं. मालवीय, इत्यादिक महान देशभक्त वा विभूति अतुल स्वार्थत्यागानें तुरुंगात खितपत पडल्या आहेत ते मूठभर वकिलाकीरतां किंवा सरकारी नोकरांकरितां नव्हे तर हिंदुस्थानांतील अफाट शेतकऱ्याच्या उद्धाराकरितांच होय. असें असतां आधीं व्यापाऱ्यांनीं इनकमटॅक्स नाकारावा, वकिलांनीं कोर्टावर बहिष्कार घालावा व सरकारी नोकरांनीं परकीय सरकारची सेवा टाकून द्यावी तरच आह्मी करबंदीला तयार होऊं, असें शेतकरी वर्गानें ह्मणणें किंवा त्यानें तसें ह्मणावें ह्मणून शिकवण देणें हें आत्मघाताचें नव्हे काय, असा अर्धसत्याच्या आधारावर कोणी तरी सवाल करीलच. अर्थात् त्याला सयुक्तिकपणें उत्तर देणें क्रमप्राप्तच होय. ह्मणून ते आह्मी यथामति पुढील अंकीं देऊं

ता. २३।९।३०

# करबंदी आधीं कीं खंडबंदी ?

२

म. गांधी—नेहरू प्रभृति पुढारी आज जे आत्मयज्ञास तयार झाले आहेत ते मूठभर वकिलांकरितां, सरकारी नोकरांकरितां किंवा वरवैठे धंदेवाल्यांकरितां नव्हे तर अफाट शेतकऱ्यांच्या उद्धाराकरितां होय. ह्मणून वकील, व्यापारी, सरकारी नोकर किंवा वरवैठे धंदेवाले यांच्या स्वराज्यविषयक कर्तव्याची उसाबर न करितां शेतकरी वर्गानें एकाकीच स्वातंत्र्यसंग्रामांत उडी टाकिली पाहिजे, अशा पुनः पुनः डोकावणाऱ्या मुद्यावरील युक्तिवादासंबंधीं, गत्या अंकीं सकल्पिल्याप्रमाणें, आज चिकित्सा करावयाची आहे.

प्रस्तुत मुद्यांत सामान्य जनतेला दिपविणारा एक भाग आहे. आणि तो ह्मणजे चळवळीचे चालक महात्मा गांधी-प्रभृती स्वार्थत्यागी आणि निःस्वार्थी पुढारी आहेत हा होय. अर्थात् अशा पुढाऱ्यांचा उपदेश अदूरदर्शीपणाचा किंवा आपमतलबीपणाचा राहाणार नाहींच. ह्मणून तें सांगतील तें ऐकणेंच श्रेयस्कर होय. आणि आमचेंहि याविषयीं कधीं दुमत होणार नाहीं. परंतु प्रश्न इतकाच कीं, जगद्वंद्य महात्मा गांधीजींचा उपदेश वकील, व्यापारी, सरकारी नोकर आणि वरवैठे धंदेवाले यांनाच वावडा कां वाटावा? पाहातां क्षणींच नजरेस येतें त्यावरूनच अनुमान करावयाचें तर उपरोक्त पांढरपेशा वर्गाला म. गांधीजींची योग्यता विशेष कळते आणि स्वराज्याची भूक त्यांना चरचरून लागलेली आहे ह्मणजे ते स्वराज्यातुर आहेत. अर्थात् ज्याच्या पोटांत दुखतें त्यांनीं आधीं ओवा खाल्ला पाहिजे. हा सर्व सामान्य नियम असत

तो कां मोडला जात आहे, याचा खुलासा व्हावयास नको काय ? कोणी ह्मणेल ' प्रभातफेऱ्या, सभा, मीठ–जंगल–कायदेभंग हे नगरवासी पांढरपेशांचे कार्यक्रम स्वराज्यार्थच आहेत.' गोष्ट वाक्यापुरती खरी आहे. परंतु त्या कार्यक्रमाकडे थोडेसें बारकाईनें पाहिलें असतां उपरोक्त कार्यक्रमांत शारीरिक कष्ट आहेत. परंतु सामान्यत: व्यक्तिश: खिशाला खार लागत नाहीं. आणि अशाच जर कार्यक्रमांनीं स्वराज्य मिळणार असेल तर नगरवासियाप्रमाणें शेतकरी वर्गानेंहि मिठाच्या कायदेभंगांत भाग घेण्यावर चळवळीचे चालक कां तृप्त होत नाहींत ? कायदेभंग आणि करबंदी यांतील स्वार्थत्यागाचें प्रमाण सारखें आहे काय ? नाहीं. कायदेभंगानें कारागृहवास सोसावा लागेल आणि इत:पर कदाचित् कायदेभंग करणाराकडून सक्तीनें दंडहि वसूल केला जाईल. बाकी, दंडवसुलीसाठीं घरावर जप्ती येऊं लागलीच तर किती मालकांना किंवा पालकांना कायदेभंगाविषयीं कौतुक वाटेल, हा अनुभवानेंच ठरविण्याचा प्रश्न आहे. असो, पण कायदेभंगापेक्षां करबंदींत अधिकच क्लेश आणि सर्वस्वाची हानि आहे. ह्मणजे कारागृहवास भोगावा लागेल, दंड भरावा लागेल नव्हे इस्टेटीलाहि मुकावें लागेल, इतकेंच नव्हे तर परागंदा होण्याची पाळी येईल. बार्डोलीचे शेतकरी पहिल्या प्रतीचे सत्याग्रही परंतु त्यांना आतां तर नम्रभावानें ' करबंदी ' चा सत्याग्रह चालवून गांवांतच राहाण्यापेक्षां परागंदा होणें कमी क्लेशाचें वाटत आहे. परंतु दहापांच कुटुंबांना संस्थानांत आसरा मिळाला ह्मणून साऱ्याच शेतकरी कुटुंबांना संस्थानांत आश्रय मिळेल, ही कल्पनाच बेफामपणाची ठरेल. सारांश काय, तर करबंदी ह्मणजे अक्षरश: आत्मयज्ञच होय. तेव्हां पारतंत्र्याच्या रोगामुळेंच जे एकसारखे विव्हळत आहेत त्यांनीं मात्र इनकमटॅक्स बंदी, सेवावृत्तीचा किंवा ' शूद्रकर्माचा ' त्याग यासारखें जालीम औषध न घेतां कायदेभंगासारखें नेमस्त औषध घेऊन पुन: तुरुंगांतहि सामाजिक दर्जा आणि तब्येत सांभाळण्याकरितां ' जुलमी ' सरकारच्या दासानुदासाकडे ' अ ' वर्ग मिळविण्याकरितां ' अर्जी ' किंवा

पुढाऱ्यांमार्फत जानव्याच्या दिग्दर्शनावर मध्यस्थी करावयाची आणि जाड्य, अज्ञान आणि अपात्रता व पुढारलेल्या वर्गांनीं त्यांच्यावर चालविलेली पायमल्ली यामुळें पारतंत्र्याचा रोग ज्यांना कष्टाचा झाला नाहीं किंवा धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक बाबतींत ज्यांना घरांपुरतेंहि स्वराज्य नाहीं त्या रजोगुणप्रधान शेतकरी वर्गानें अहिंसेच्या शुद्ध तत्त्वावर करबंदीच्या साधनानें, ह्मणजे आपल्या अस्तित्वावरच पाणी सोडून व पांढरपेशा वर्गाच्या कारवाईकडे दुर्लक्ष करून देशाला स्वराज्य मिळवून देण्यांत आयुष्य वेंचावें, हा युक्तिवाद कसा समर्थनीय, व्यवहार्य आणि सद्धेतूचा, हें आह्मांस तरी समजेनासें झालें आहे. आणि ह्मणून जोपर्यंत पांढरपेशा वर्ग करबंदीचें खडतर व्रत स्वीकारून आघाडीस झाला नाहीं तोंपर्यंत चळवळीचें चालक महात्मा गांधीजी आहेत ह्मणून त्यांत शेतकरी वर्गानें भाग घेतला पाहिजे, अशा चाणक्य क्लृतीनें सामान्य जनतेचे डोळे दिपविण्यांत मतलब असला तरी तें केव्हांही श्रेयस्कर होणार नाहीं. असो, अशा रीतीनें सामान्य जनतेला दिपविणाऱ्या भागाचें निराकरण झाल्यानंतर मूळ मुद्यांतील उरलेल्या भागाकडे आतां लक्ष्य पुरविलें पाहिजे.

आतां विवेचनासाठीं चालू मुद्यांतील उरलेला भाग ह्मणजे पांढरपेशा वर्गाच्या सहकारितेची गरज न ठेवतां शेतकरी वर्गानें स्वातंत्र्यसंग्रामांत उडी टाकणें श्रेयस्कर आहे, हा होय. यासंबंधांत भवति न भवति करावयाची तर प्रथमतःच असा एक प्रश्न उद्भवतो कीं, पांढरपेशा वर्ग स्वातंत्र्यसंग्रामांत पुरोगामित्व न पत्करो ह्मणजे विनीवाला न होवो परंतु शेतकरी वर्गानें आघाडी पत्करल्यानंतर पांढरपेशा वर्ग किंवा घरबैठे धंदेवाले पिछाडी तरी सांभाळतील काय कीं पिछाडी सांभाळण्याच्या मिषानें शेतकरी वर्गाच्या टांचा तोडण्याचें दुष्ट कृत्य करतील ? उपरोक्त प्रश्न करणें किंवा शंका घेणें हें मोठ्याच पापाचें किंवा धाडसाचें होय, असें कोणी ह्मणतील. परंतु सध्याच्या चळवळींतच अत्यंत कटु अनुभव येत आहे. कारवार जिल्ह्यापैकीं शिर्शी व

अकोलें तालुक्यांतील एकशें पंधरा व नाशिक जिल्ह्यांपैकीं बागलाण तालुक्यांतील शेंदीडशें व अहमदनगर जिल्ह्यापैकीं संगमनेर तालुक्यांतील साठसत्तर पाटलांनीं राजीनामे दिले. परंतु पाटलांचा अनुयायी जो कुलकर्णी किंवा तलाटी यांचे पाटलांइतके तीनचारशें राजीनामे नसोत परंतु तीनचारहि नाहींत. आज त्या राजीनामा दिलेल्या पाटलांचे सरकारी आणि दप्तरी काम कुलकर्णी किंवा तलाठीच करीत असतील ना ? मग हें पाटलांना पुढें घालून त्याचे पाय तोडण्यासारखेंच नीचपणाचें काम झालें नाहीं काय ? एवढेंच नव्हे तर आह्मास अशीही भीति उत्पन्न झाली आहे कीं शेतकरी वर्गांतील वतनदार पाटलांत प्रसंगावधान नसतें ही सबब पुढें करून चाणक्य वर्ग कुलकर्णीकी प्रमाणें पाटीलकीहि आपल्या मांडीखालीं घेण्याचें कारस्थान करील आणि कदाचित त्या कारस्थानास विद्यमान सरकारहि बळी पडेल ! या एकाच उदाहरणावरून उपरोक्त शंका चांगलीच बळकट होते. तथापि कुलकर्णी म्हणजेच कांहीं पांढरपेशा वर्ग नव्हे, अशी कोणी तक्रार करतील. तेव्हां अशाकरितां आह्मी विचारितों कीं, जर शेतकरी वर्ग करबंदीच्या आत्मयज्ञास तयार झालाच तर शेतकरी वर्गाशीं ज्या ज्या पांढरपेशा किंवा घरबैठ्या धंदेवाल्या वर्गांचा आर्थिक संबंध आहे ते ते वर्ग करबंदीच्या सालापुरता तरी शेतकऱ्यावरील आपापला बोजा बाजूला घेतील काय ? ह्मणजे सावकार व्याजाची आणि इनामदार—जमीनदार खंडाची सूट देतील काय ? या प्रश्नाचें होय असें उत्तर देण्यास फक्त कांग्रेसचे पगारी प्रचारकच तेवढे पुढें येतील ! व्याज खंडाचें राहो परतु करबंदीच्या सत्रांतील शेतकऱ्यांच्या कुटुंबांना डॉक्टरवर्ग प्रामाणिकपणें पण फुकट औषध तरी देईल काय ? ह्मणून आह्मी विचारितों, स्वराज्यातुर सुशिक्षित वकिल्या न सोडोत, धनाढ्य व्यापारी खुशाल इनकमटॅक्स भरोत, आणि अगडबंब पगाराचे लोक अंमलदारी न सोडोत. परंतु ते स्वराज्याकरितां नसो पण करबंदीच्या सत्रांतिल शेतकरी वर्गाकरितां तरी मिळकतीच्या कितव्या हिश्शावर पाणी सोडण्यास तयार

आहेत ? याचेंहि उत्तर सर्वत्र होकारार्थी मिळणार नाहीं. उलट लिलावाला निघालेल्या जमिनी गिळंकृत करण्यास चळवळींतलेच बहुरूपी पुढें येतील ! असले अधमाधम कोणी निघणार नाहींत आणि निघालेच तर त्यांना सामाजिक बहिष्कारानें त्राहि भगवन् करून सोडतां येईल, असें कोणी तरी एथें समर्थन करतील. परंतु सामाजिक बहिष्कार कोणावर तर प्रामाणिक दुर्बलांवर ! मध्यप्रांताच्या स्वराज्यपक्षानें एके काळीं सरकाराला मंत्रिमंडळ स्थापन करणें अशक्य करून ठविलें परंतु मुत्सद्दी सरकारांनीं स्वराज्य पक्षाचे अध्वर्यु श्रीयुत ( आतां नामदार आणि उद्यां कदाचित हिज एक्झेलेन्सि ) तांबे यांना ए. कौन्सिलर करतांच त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार झाला नाहीं. तो नसो, परंतु अभिनंदनाचा वर्षाव झाला ! खुद्द केळकरांनींहि सार्वजनिक अंतःकरणानें नव्हे तर खासगी अंतःकरणानें [ह्मणे] अभिनंदनाची पत्रिका नव्हे तर तार पाठविली ! कित्येकांना हें उदाहरण जुनें दिसेल. परंतु उदाहरण जुनें असलें तरी तन्मूलक प्रवृत्ति ताजीच आहे. आणि ती गेल्या कायदेमंडळाच्या निवडणुकींत विशेष स्पष्टतेनें दृग्गोचर झाली आहे. जो कांग्रेसपक्ष शेतकऱ्यांनीं करबंदीचा आत्मयज्ञ चालवावा ह्मणतो त्याच कांग्रेसपक्षानें कौन्सिलावर बहिष्कार घालण्याचा आणि पोलिंग स्टेशनवर पिकेटिंग करण्याचा जाहीरनामा काढिला. परंतु तो बहिष्कार आणि तें पिकेटिंग भोंवलें कोणास? तर मागसलेल्या वर्गांतील उदयोन्मुख पक्षास ! ह्मणजे कांग्रेसपक्षाचें पिकेटिंग बिलकूल निःपक्षपाताचें झालें नाहीं. तेव्हां कांग्रेसपक्षांत राहूनहि जे कांग्रेसची आज्ञा मोडून कायदेमंडळांत शिरले त्यांच्यावर बहिष्कार पुकारला न जातां उलट त्यांचें पुण्यासारख्या म्युनिसिपालटींतहि अभिनंदन होतें ! तेव्हां हीच प्रवृत्ति करबंदीच्या प्रकरणीं प्रबळ झालेली दृष्टोत्पत्तीस किंवा प्रत्ययास येणार नाहीं, अशाबद्दल कोणास कांहीं पुरावा देतां येईल काय ? कदाचित् बार्डोलीच्या करबंदीच्या सत्याग्रहाचें उदाहरण पुढें येईल. परंतु बार्डोलीच्या करबंदीचें ध्येय-

क्षेत्र निराळें आणि स्वराज्यार्थ अमलांत आणावयाच्या करबंदीचें निराळें. बार्डोलीची करबंदीची लढाई सारावाढ रद्द व्हावी, याकरितां होती. म्हणजे विद्यमान सरकारची उचलबांगडी करण्याचा त्या चळवळींत हेतु नव्हता. परंतु आगामी करबंदी ' निर्भेळ स्वातंत्र्य ' मिळविण्याकरितां आहे ! याचा स्पष्टार्थ हा कीं, बार्डोलीच्या चळवळीचें फळ ज्याच्या त्याच्या पदरांत पडावयाचें होतें आणि तसें पडलें. परंतु आगामी सारावंदीच्या आत्मयज्ञामुळें शेतकऱ्यांच्या पदरांत पर्यायानें नव्हे तर प्रत्यक्षतः कोणतें फळ पडणार आहे! सारावंदीबरोबर करबंदीची अमलबजावणी अनेक वर्षें चालू राहील तर स्वराज्य-नसलें तरी कांहीं विशेष हक्क हिंदुस्थानच्या पदरांत पडतील. परंतु ते हक्क म्हणजे कांहीं कायमची सारा सूट नव्हे किंवा साऱ्यांत कांहीं सूट नव्हे. अर्थात सारावाढ रद्द या ध्येयाशीं बार्डोली तालुक्यांतील शेतकऱ्यांचा जसा एकजीव झाला तसा स्वराज्य या ध्येयाशीं एकजीव झालेल्यांची बहुसंख्या जोपर्यंत निर्माण होणार नाहीं तोंपर्यंत सारावसुलीकरितां सरकारनें लिलावास काढलेल्या जमिनी थोडक्या पैशांत कबजांत घेण्याचा वरच्या सारख्या लोकांतला मोह मुळींच नष्ट होणार नाहीं. आणि याविषयींचा आणखी एक मोठा दाखला म्हणजे दारू–शेंदी–ताडी हे पदार्थ अत्यंत निषिद्ध असतांहि आणि त्यांच्या सरकारी दुकानांतील, विक्रीवर राजकारणाच्या दृष्टीनें कां असेना कॉंग्रेस पक्षाचें पिकेटिंग असतां आणि दारू शेंदी प्याल्याबद्दल पंचायतींत थोडाबहुत दंडहि होत असतां जर गुत्ते लिलावांत मागणार लोक मिळतातच तर उद्यां जमीन थोडक्या पैक्यांत आणि वरती सरकारची बहाल मर्जी, असलें आमिष लाथाडण्यास कोणी सावकार जमीनदार पुढें येतील अशी कल्पना तरी आम्ही कोणत्या अनुभवावरून करावी? म्हणजे स्वराज्यातुर दिसत असलेला पांढरपेशा वर्ग किंवा घरबैठे धंदेवाले आर्थिकदृष्ट्या आत्मयज्ञ करावयास तयार नाहींत ते नाहींतच, नव्हे त्यांची सारावंदीच्या सत्रांत सक्रिय सहानुभूतिही मिळणार नाहीं, इतकेंच काय ते कदाचित् तटस्थहि राहाणार नाहींत! उलट आघाडीवरच्या शेत-

करी वर्गाचे पाय तोडण्यासहि त्यांच्यांतले कित्येक चाणक्य कमी करणार नाहींत. ही गोष्ट पुराव्यानिशीच, निदान आमच्या दृष्टीनें तरी सिद्ध होत आहे. पण असें जरी असलें तरी आमच्या या विवेचनामुळें आमच्या साऱ्याच प्रतिपक्षीयांची तोंडें बंद होतील, असें मुळींच नाहीं. पुनः त्यापैकीं एखादा शिष्ट अशीच मल्लिनाथी लढवील कीं, ज्या अर्थी हिंदुस्थानांत शेतकरी वर्ग बहुसंख्याक आहे त्या अर्थी पारतंत्र्याचें दुःखहि त्यालाच विशेष भोगावें लागणार. ह्मणून स्वराज्य पाहिजे तें मुख्यतः शेतकरी वर्गाकरितांच होय. आणि ज्यांना स्वराज्य पाहिजे आहे त्यांच्याविषयी प्रारंभींच सर्वांनीं सहानुभूति दाखविली असा कोठें इतिहास मिळतो? हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या श्रीशिवाजी महाराजांना प्रारंभीं तर कोणी अनुकूल नव्हतेंच एवढेंच नव्हे तर खुद्द त्यांचे तीर्थरूप शहाजी राजे यांनाहि शिवाजी महाराजांचा स्वराज्य मिळविण्याचा मार्ग पसंत नव्हता. आणि तत्कालीन पांढरपेशा वर्ग किंवा घर-बैठे धंदेवालेहि सरासरीच्या दृष्टीनें शिवाजी महाराजांना प्रतिकूलच होते. असें असतांहि त्याची पर्वा न ठेवतां शिवाजीच्या मावळ्यांनीं जमिनीच काय परंतु आपले प्राणहि शिवाजी महाराजांच्या स्वाधीन केले. आणि ह्मणूनच पुढें मराठ-शाहीची स्थापना होऊन स्वराज्यांतच मावळ्यांतले सावळे सर्जेराव झाले. हा उज्ज्वल इतिहास डोळ्यापुढें असतां आणि मावळ्यांना जसे शिवाजी तसे शेतकऱ्यांना गांधीजी मिळाले असतांहि शेतकऱ्यांनीं पांढरपेशा वर्ग किंवा घरबैठे धंदेवाले स्वातंत्र्यसंग्रामांत आघाडीला नाहींत उलट प्रतिकूल जातील ह्मणून स्वराज्य मिळविण्याच्या बाबतींत माघार घ्यावी, हें आत्मघाताचें नव्हे काय!"

वरच्या सवालाला आमच्या बाजूचें उत्तर आतां पुढील अंकीं.

ता. २०।९।३०

# करबंदी आधीं कीं खंडबंदी?

३

मोठे तालेवार सरदार आणि खुद्द शहाजीराजे प्रतिकूल आहेत याविषयीं पुरी ओळख असतांहि मुख्यतः शेतकरी वर्गानें श्रीशिवाजी महाराजांना प्राणधनाची पर्वा न ठेवतां सहाय्य केलें ह्मणूनच पुढें शेतकऱ्यांतलेच शिलेदार–सुभेदार बनले व मराठेशाहीचा किंवा हिंदवी स्वराज्याचा झेंडा फडकला. आणि ह्मणूनच हिंदी पांढरपेशा वर्ग किंवा घरबैठे–धंदेवाले स्वराज्यासिद्धीच्या कामीं सर्वतोपरीं विरुद्ध असले तरीहि सांप्रतच्या हीन दीन शेतकरी वर्गाला जगाच्या शर्यतींत आपला उद्धार करून घ्यावयाचा असेल तर त्यांच्यासाठींच रात्रंदिन तळमळणाऱ्या महात्माजींचे त्यांनीं एक-निष्ठ अनुयायी झालें पाहिजे. आणि यांत जर तें कांहीं अनमान करतील तर त्यांनीं तो आत्मघाताचाच मार्ग पत्करिला आहे, असा एक आमच्या प्रति-पक्षीयांचा कोटिक्रम पुढें येईल हें गेल्या अंकींच ध्वनित केलें आहे. व त्याला पूर्वीं ठरल्याप्रमाणें, आज उत्तर द्यावयाचें.

फलप्राप्तीच्या दृष्टीनें कोणाची योग्यता जास्त, हें भावी काळच ठरवि-णार असला तरी निदान सांप्रत श्रीशिवाजी महाराजांपेक्षांहि महात्माजींचा कीर्तिविस्तार विशेष व्यापक आहे आणि गांधीजींचा महात्मा मुख्यतः शेतकरी वर्गासाठींच नसला तरी दारिद्रीनारायणासाठीं तळमळत आहे या दोनहि गोष्टी निर्विवाद आहेत, याविषयीं मुळीं संशय नाहीं. परंतु कालमानानुसार उभय महापुरुषांच्या साधनांत आणि परिस्थितींत महदंतर आहे, ही गोष्ट

भावनाप्रधान होऊन नजरेआड करतां येणार नाहीं. श्रीशिवरायांच्या मनांत आसेतु हिमाचल हिंदुस्थान एक सत्तासूत्रानें परिबद्ध नव्हता. तर–Survival of the fittest–' बळी तो बादशाहा ' अशा गोष्टीला आरंभापासूनच अनुकूल अशी परिस्थिति होती. परंतु तशी परिस्थिति सांप्रत नाहीं. आज हिंदुस्थानांत लोकशाहीचा, हिंदी जनतेच्या अपेक्षेप्रमाणें, अमल नसला तरी लोकशाहीच्या तत्वावर प्रस्थापित झालेल्या राज्यघटनेंतील कारभाऱ्यांच्या हातांत सबंध हिंदुस्थानचें सत्तासूत्र आहे. श्रीशिवकालीं सबंध टापूचा टापू किंवा मोठमोठ किल्ले हां हां ह्मणतां प्रतिपक्षाला घशांत घेतां येत होते. आणि त्याची वार्ताहि सहा सहा महिने महाराजांना किंवा बादशाहाला लागत नव्हती. पण आतां पुरा एक गुंठाहि जमीन उघडपणें घटकाभरसुद्धा पचवितां येत नाहीं, इतकी सांप्रतची सम्राटसत्ता जागरूक आहे. आणि हें संपूर्णतः ओळखूनच महात्माजींनीं स्वराज्य मिळविण्याकरितां निःशस्त्र प्रतिकाराचें राजकारण अवलंबिलें आहे. आणि जमीन अस्मानाच्या अंतराइतका फरक तो हाच. ह्मणजे सशस्त्र चढाई हा सत्ताधीश होण्याचा शिवकालीन मासला आणि आज निःशस्त्र प्रतिकारानें स्वराज्य मिळवावयाचें आहे. यामुळें महत्त्वाचा असा दुसरा एक फरक पडला आहे. आणि तो ह्मणजे श्रीशिवाजी महाराजांना किंवा विद्यमान गाजी मुस्तफा केमालपाशांना, किंवा इटालीच्या सिंआर मुसोलिनींना सत्तासंवर्धन करण्याचें राजकारण जसें एकतंत्री ठेवितां आलें तितकें एकतंत्रित्व किंवा निर्बंध सर्वाधिकारित्व महात्माजींना अद्याप तरी मिळालें नाहीं. आणि याचें एकच मोठें उदाहरण ह्मणजे, भूतलावरील मुसलमानांना धर्मभोळेपणामुळें तुर्कस्थानांतील खिलाफतीचें सिंहासन अत्यंत जिव्हाळ्याचें होऊन राहिलें असतांहि त्यावर बेगुमानपणें केमालपाशांनीं नांगर फिरविला. स्वभावतः त्यावेळीं थोडीशी खळबळ उडाली. परंतु केमालपाशाचा हात धरण्याची कोणा मुसलमानाला किंवा मुसलमानांच्या संघाला धमक झाली नाहीं. असलें सर्वाधिकारित्व किंवा

एकतंत्रित्व महात्माजींना मिळालें आहे काय किंवा आम्ही मिळवून दिलें? याचें होय असें उत्तर देण्याचा कांहीं लोकांकडून थोडा वेळ प्रयत्न होईल. कारण नानाविध मनोवृत्तीच्या कांग्रेसमध्यें महात्माजींच्या मतालाच प्राधान्य आहे आणि त्यांच्या भक्तीमुळेंच हजारों लोक तुरुंगांत खितपत पडलेले आहेत. परंतु एवढ्यामुळें त्यांना सर्वाधिकारित्व मिळालें आहे असें आम्हास वाटत नाहीं आणि तशी आमची समजूत होण्यास आमच्या मतें तरी मोठा भक्कम आधार आहे.

आजच्या चळवळीच्या प्रवाहाची गति आणि वळण जरा बारकाईनें पाहिलें तर चळवळीच्या जीवनांतला वंहंश जरी गांधीजींचा असला तरी त्याला मिळत असलेल्या वळणावर गांधीजींचा ताबा नाहीं तर त्या जीवनाचा भांडवलवाला आणि बुद्धिजीवि वर्ग आपल्या शेतामळ्याकडे उपयोग करून घेत आहे! महात्माजींच्या अलौकिक तपश्चर्येमुळें सत्याग्रहाच्या चळवळींकडे जगाचें चित्त वेधलें, ही गोष्ट कोणासहि नाकारतां येणार नाहीं. परंतु ती पंडित जवाहीरलाल नेहरूंनींच मात्र नाकारिली. अजूनहि महात्माजी मनांतून वसाहतीच्या स्वराज्यावरच संतुष्ट असतील. परंतु जवाहीरलाल नेहरूंच्या स्वातंत्र्यवादांतील अत्याग्रहामुळेंच महात्माजींनीं, वसाहतीच्या स्वराज्याचाहि पत्ता नसतांना, साम्राज्यांतून फुटून निघण्याचा प्रश्न पुढें केला आहे. एवढ्या या एका उदाहरणामुळेंच महात्माजी अनिरुद्ध सर्वाधिकारी नाहींत, असें आम्ही म्हणतों, असें नाहीं; तर स्वराज्यप्राप्तीच्या मार्गावर जितका लोकांचा घोळका जमविलेला दिसतो त्याचा कोट्यंशहि अस्पृश्यतानिवारणाच्या अगर हिंदु मुसलमानांत एकी निर्माण करण्याच्या मार्गावर दिसून येत नाहीं. असले घरगुती प्रश्न स्वराज्यप्राप्तीनंतर सोडवावयाचे असतात, असा युक्तिवाद पुढें येईल. परंतु अस्पृश्यतेचें निवारण झाल्याशिवाय किंवा हिंदु मुसलमानांत दिलसफाई, दिलजमाई नांदल्याशिवाय स्वराज्य मिळणार नाहीं, असें महात्माजींना अजूनहि वाटतें! आणि उपरोक्त प्रश्न स्वराज्य मिळविल्यानंतर सोडवा-

वयाचा असा शोध कधीं लागला ? परवांपर्यंत तर खुद्द कांग्रेसनेंच अस्पृश्यता-निवारणाच्या प्रश्नाला मुख्य कार्यक्रमांतच स्थान दिलें होतें. तेव्हां स्वराज्य मिळल्यानंतरच अस्पृश्यतेचें उच्चाटण करावयाचें ही अक्कल अलीकडेच सुचलेली नाहीं काय ? शांततेच्या प्रसंगीं मुख्य मुख्य कार्यक्रम हातीं घेतल्यास चालण्यासारखें असतें. परंतु संग्रामाला सुरुवात झाल्यानंतर शक्ति द्विधा होऊं देणें अव्यवहार्य होय, अशी कोणी तरी समजूत घालण्याचा प्रयत्न करील. परंतु खादी प्रसार, प्रभातफेरी, झेंडावंदन, पिकेटिंग असल्या अनेकविध कार्यक्रमाचें लक्ष्य जर एकच होऊं शकते तर अस्पृश्यतानिवारण ही स्वराज्यध्येयाकडची वाट कां होऊं शकत नाहीं! यावरहि कोणी असें ह्मणेल कीं, अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नामुळें देशांत दुफळी उत्पन्न होते. पण पिकेटिंगमुळें दुफळी होत नाहीं काय ? आज शाळा कॉलेजवरील पिकेटिंगमुळें विद्यार्थिवर्गात भेद माजलेले नाहींत काय ! कौन्सिलवर बहिष्कार आणि पोलिंगस्टेशनवर पिकेटिंग यामुळें बऱ्याच लोकांची सहानुभूति नष्ट झालेली नाहीं काय ? असें असतांहि जर पिकेटिंगचा कार्यक्रम अमलांत आणतां येतो तर अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न हातीं घेतल्यामुळें उपस्थित होणाऱ्या परिस्थितिकडेच कांग्रेसपक्षीयांनीं कां बरें लक्ष्य पुरवावें ? कांग्रेसचे अनुयायी खादीचा पेहेराव करितात ह्मणून ते इतरांनीं खादी घालावी असा आग्रह धरितात. कौन्सिलांत ते जात नाहींत ह्मणून दुसऱ्यांना जाऊं नका ह्मणून सांगतात. मग याप्रमाणें त्यांना जर अस्पृश्यता नको आहे तर इतरांनाहि अस्पृश्यता पाळूं नका, असा आग्रह कां बरें धरीत नाहींत ? परदेशी कापड अंगावर असणाऱ्यास देवालयांत जाऊं द्यावयाचें नाहीं, याकरितां जर पिकेटिंग होतें तर ज्या देवालयांत अस्पृश्यता पाळिली जाते त्या देवालयांचीहि 'रसद' तोडण्यासाठीं कांग्रेसचे स्वयंसेवक कां सत्याग्रह करीत नाहींत ? सरकार आणि दारूदुकानदार विरुद्ध असतां दारू-'पिकेटिंग' करूनजर तुरुंगांत जाण्यास स्वयंसेवक तयार होतात तर हिंदुस्थानची जनता बव्हंशीं कांग्रेसच्या धोरणालाच अनुकूल आहे तर अस्पृ-

ऱ्यांचा देवालयांत प्रवेश व्हावयासाठीं सत्याग्रहाचें व्रत तरी घेण्याची कां बरें जरुरी असावी ! सारांश काय, गांधींजींना अस्पृश्यतानिवारण पाहिजे आहे. परंतु त्यांच्या पुजाऱ्यांना अस्पृश्यतेचें संरक्षण झालें पाहिजे असें वाटत आहे. आणि ही पुजाऱ्यांची इच्छा ओळखूनच अस्पृश्यतेचें निवारण होण्याकरितां अवश्य असलेली चळवळ महात्माजींनीं हातीं घेतली नाहीं. म्हणजे जवाहिरलाल नेहरूंच्या इच्छेसाठीं महात्माजींनीं आपलें स्वराज्यविषयक ध्येय बदलिलें. चळवळीची धुरा हातीं घेतलेल्यांच्या इच्छेसाठीं अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न स्वराज्यप्राप्तीनंतरच्या शिंक्यावर टांगून ठेविला. एवढ्या मुख्य दोन गोष्टींमुळे महात्माजींकडे अनिरुद्ध सर्वाधिकारित्व किंवा एकतंत्रित्व नाहीं, हें सिद्ध होतेंच. परंतु वकील वकील्या सोडण्यास, व्यापारी इनकमटॅक्स भरण्याचें नाकारण्यास आणि विद्वान लोक सरकारी नोकऱ्यावर राजीनामा देण्यास आणि कौन्सिलवर बहिष्कार पुकारण्यास बिलकूल तयार नाहींत ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट झाल्यानंतरहि ज्या अर्थी महात्माजी कायदेभंगाची चळवळ चालू ठेवण्याच्याच इराद्यांत आहेत त्या अर्थी अस्पृश्यतेप्रमाणेंच वकिल्या, सरकारी नोकऱ्याहि स्वराज्याच्या मार्गांत आड येत नाहींत, असें महात्माजींना वाटत नसलें तरी पुजाऱ्यांच्या धोरणानुसार वाटत आहे, हें सिद्ध होतें. तात्पर्य आरंभींच आह्मी सांगितल्याप्रमाणें महात्माजी जरी अप्रतिम सच्छील, अपूर्व सत्याग्रही, निर्भेळ अहिंसाचारी अतएव पुण्यश्लोक किंवा महात्मा आहेत तरी त्यांच्या सांप्रतच्या देशोद्धाराच्या चळवळींतील जीवन मात्र त्यांच्या संकुचित मनोवृत्तीच्या पुजाऱ्यांच्या हातीं आहे, हें उपरोक्त विस्तृत विवेचनावरून सिद्ध होत आहे. तेव्हां नाइलाजानें असो वा अन्य हेतूमुळें असो, महात्माजी स्वतंत्र किंवा शिवाजी महाराज, गाझी मुस्तफा केमालपाशा वा सिंआर मुसोलिनी याप्रमाणें निर्बंध सर्वाधिकारी नाहींत किंवा तसें सर्वाधिकारित्व देण्यास त्यांचे पुजारी तयार नाहींत तोंवर म्हणजे शेतकरी वर्गाच्या आत्मयज्ञाचें फळ त्यांना साजेसें देण्याचें स्वातंत्र्य महात्माजींच्या ठायीं आहे हें सिद्ध होईपर्यंत स्वरा-

साठीं ह्मणून शेतकरी वर्गानेंच मात्र केवळ म. गांधीजींच्या माहात्म्याकरितां करबंदीचा आत्मयज्ञ करावयास तयार व्हावें, हें कसें इष्ट ठरतें ?

श्रीशिवाजी महाराज प्रभृति नरशार्दूल राज्यसत्ताधारी ह्मणूनच त्यांनीं मावळ्यांतल्या सावळ्यांना सर्जेराव केलें किंवा मरणोन्मुख राष्ट्रांना संजीवनी दिली तशी परिस्थिती महात्माजींची नाहीं. ज्या अर्थी लोकशाहीचा काळ आहे त्या अर्थी गांधीजी केवढेहि महात्मे असतना त्यांना बहुमतानुसार वागलें पाहिजे, अशी कोणी येथें चाणक्यनीति लढवितील. आणि तिलाच जर कांग्रेस-पक्ष चिकटून राहील तर करबंदीचा किंवा स्वराज्यविषयक प्रयत्नांचा प्रश्न सोडवितांना गांधीजींच्या माहात्म्याकडे न पाहातां इतरांप्रमाणें स्वतंत्रपणेंच शेतकरीवर्ग तारतम्यभावाचा किंवा शक्याशक्यतेचा विचार करील. पण पुजाऱ्यांच्याच धोरणानें देवानें वागलें पाहिजे, ही गोष्ट मात्र सर्वांनाच पटण्यासारखी नव्हे. आज महात्मा निकोले लेनिन यांचें चरित्र किंवा त्यांचा समाजसत्तावाद लोकांपुढें आहेच. अस्पृश्यतेची किंवा तत्सम विषमतेची हिंदुस्थानाला लागलेली कीड आधीं मारून टाकावी तर त्यामुळें स्वराज्याचें ध्येय लांबणीवर पडेल, अशी जी पुजाऱ्यांनीं महात्माजींना भीति उत्पन्न केली आहे ती आमच्या मतें निराधार किंवा स्वार्थसाधुत्वाची आहे. महात्मा लेनिन प्रथमतः 'कार्ल मार्क्स' च्या तत्त्वावर फैलावलेल्या चळवळींत शिरले होते. परंतु आपल्या ओजस्वितेचा आणि तेजस्वितेचा चळवळीचे चाणक्य चालक भलतीकडेच उपयोग करीत आहेत, हे महात्मा लेनिन यांच्या दृष्टोत्पत्तीस येतांच त्यांनीं 'क्लास वॉर' च्या तत्त्वावर स्वतंत्रपक्ष स्थापन केला. राजशाही किंवा सरदारशाही यांचा वा भांडवलवाले आणि बुद्धिजीवि या वर्गांचा शक्य त्या उपायांनीं मोड करणें हें महात्मा लेनिनचें मुख्य ध्येय आणि पुष्कळांचें पुष्कळ हित जेणेंकरून होईल तो मार्ग व तीं साधनें चांगलीं हें त्यांचें मत. यामुळें त्यांच्या टीकास्त्राखालीं धर्मगुरू व तत्सम ध्येयवादी यांनाहि जर्जर व्हावें लागलें. आणि अशा या साधन—ध्येयाचे नरसिंहच पुढें सोव्हिएट सरकारचे अध्यक्ष झाले. महात्माजींहि भांडवलवाल्या

४३४० ३१

वर्गावर किंवा एतखाऊ धर्मगुरूवर या सामाजिक कृत्रिम वैषम्यावर टीकास्त्र सोडीत नाहींत असें नाहीं. परंतु त्यांच्या पक्षाचें पालनपोषण, मात्र निदान आज तरी भांडवलवाल्या आणि बुद्धिजीवि किंवा पांढरपेशा आणि घरबैठे धंदेवाले यांच्याच हातीं आहे. तेव्हां अशी जोपर्यंत वस्तुस्थिति आहे तोंपर्यंत श्रीशिवाजी महाराजांचें आणि त्या काळांतील शेतकरी वर्गाचें उदाहरण आजच्या शेतकरी वर्गापुढें ठेवणें हें बिलकूल प्रामाणिकपणाचें ठरत नाहीं. आणखी होहि गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे कीं, श्रीशिवाजी महाराजांना तत्स-मयींच्या शेतकरी वर्गानें महाराजांच्या माहात्म्यामुळें असो, अगर स्वराज्य-प्राप्तीसाठीं असो अथवा एकपंथ दो काज या धोरणानें शिपाईगिरीच्या धंद्या-करितां असो जी मदत केली ती ' कर्मण्येवाधिकारस्ते... ' या भगवदुक्तीस अनुसरून नव्हे. तर लष्करांत शिरलेल्या शेतकऱ्यांना निदान नवराबायकोचा तरी संसार भागण्याइतका मुशाहिरा मिळत होता, लढाईंत कामास आलेल्या शिपायांच्या कुटुंबाला कांहीं नेमणुका असत व बहादुरी दाखविणारांना इनामें मिळत. असा हा श्रीशिवाजी महाराजांना झालेल्या साहाय्याचा मोबदला होता, परंतु आज महात्माजींना कराव्या लागणाऱ्या मदतीचा करबंदीच्या रूपांतील यज्ञ भलताच निराळा आहे. स्वातंत्र्यसंग्रामांत भाग घेतल्याबद्दल शेतकरी वर्गास पोटापुरता मेहेनताना मिळणार नाहीं तो नाहींच उलट शेताशिवारास, घरादारास आणि गुराढोरांस मुकावें लागेल ! तेव्हां स्वराज्या-करितां आत्मयज्ञ करण्यास पांढरपेशा वर्ग आणि घरबैठे धंदेवाले तयार नस-तांना आणि महात्माजी, श्रीशिवाजी महाराजांप्रमाणें किंवा महात्मा निकोले लेनिनप्रमाणें निर्बंध सर्वाधिकारी नसतांना शेतकरी वर्गाला अदृश्य स्वराज्याखातर करबंदीचा आत्मयज्ञ करण्याची शिकवण देणें हें कोणत्या प्रकारच्या अंतःकर-णाचें द्योतक आहे, हें आह्मांस सांगतां येणार नाहीं. असें जरी असलें तरी ' दुनिया झुकति है झुकानेवाला चाहिये ' या न्यायानें भोळा शेतकरी वर्ग चाणक्याच्या तडाख्यांत सांपडणें संभवनीय आहे. आणि ह्मणून करबंदीचा सविस्तर दुष्परिणाम त्यांच्यापुढें ठेवणें अगत्याचें आहे. ते पुढील अंकीं.

ता. ७।१०।३०.

# करबंदी आधीं कीं खंडबंदी?

४

गेल्या अंकीं ठरविल्याप्रमाणें आज करबंदीपायीं घडणाऱ्या वाईट परिणामांचें चौफेर नजर फेकून सविस्तर विवेचन करावयाचें.

कचेरी-बंदी किंवा इनकमटॅक्स-बंदी याविषयीं सत्याग्रहाचा जोर न दाखवितां चळवळीचे नेते पुढारी करबंदीसाठींच आपली पुण्याई खर्चीत आहेत. हें असें, शेतकरी वर्गाची अडाणी दुनिया इर्षेतशी झुकते, बेफामपणानें जीवावरहि उदार होते, यासाठींच ना कीं याला दुसरें कांहीं कारण आहे? स्वराज्याच्या बळकटीचा पाया शेतकरीवर्ग आहे आणि तेथूनच स्वराज्याविषयीं जागृति झाली पाहिजे असें सांगण्यांत येईल. परंतु शेतकरीवर्ग निर्धन, निरक्षर, ठगलुच्यांची पारख नसणारा असा आहे. ही गोष्ट निर्विवाद असतां त्याच्यांत स्वराज्याची आवड उत्पन्न करावयाची ती एकदम त्यांना घरदार शेतशिवार सोडून परागंदा होण्यास भाग पाडूनच कीं काय? तसें असेल तर ही जागृतीची योजना कित्येकांच्या दृष्टीनें चांगली असेल पण ती जगावेगळी आहे खास! कीं स्वराज्याविषयींच्या चळवळींत आजपर्यंत बिनशेतकरीवर्ग किंवा पांढरपेशा वर्गच तनमनधन वेचीत आला आहे परंतु स्वराज्याच्या यज्ञांत बहुसंख्याक शेतकरी वर्गाकडून जी आहुति पडावयास पाहिजे होती ती पडली नाहीं आणि यामुळेंच स्वराज्य मिळावयाचें राहिलें आहे? व याकरितांच आतां त्याजकरवीं करबंदीच्या स्वरूपांत आहुति

टाकून घ्यावयाची आहे? विचार न करतां ' होय ' असें कोणी तरी चटकन उत्तर देतील. परंतु असे ह्मणणाऱ्यांनीं आपलें मत स्वतंत्र विचारांनीं बनविलेलें नाहीं. वाङ्मयसृष्टींतच ह्मणजे व्याख्यानें आणि वाचनांतच गढून न जातां चळवळींतील नुकसानीची आंच प्रत्यक्षतः आणि विशेषतः कोणास लागली आहे, हा प्रश्न वस्तुस्थितीकडे लक्ष्य पुरवून ते सोडवितील तर चळवळीपासून आतांपर्यंत तरी पांढरपेशा वर्गांनीं फायदाच उचलला आहे किंवा अर्थशास्त्राच्या दृष्टीनें त्यांचा तोटा तरी झाला नाहीं. परंतु तशी गोष्ट शेतकरी वर्गाची नाहीं. ' परदेशी मालावर बहिष्कार ' या गर्जनेनें परदेशी व्यापारांच्या छातीला जितका धक्का बसला तितकाच हिंदी शेतकरी वर्गाच्या छातीलाहि बसला. परंतु दैववादी दुर्दैवी हिंदी शेतकरी वर्गास तो जाणवला नाहीं. इतकेंच नव्हे तर पांढरपेशा वर्गापेक्षांहि कित्येक ठिकाणच्या शेतकरी वर्गानें परदेशी मालावर बहिष्कार अशा आरोळ्या ठोकून आपला घसा सुकवून आणि दुखवून घेतला. परंतु परदेशी मालावरील बहिष्काराचा भुंगा शेतकरी वर्गालाहि पोखरीत आहे हे बापड्यांच्या ध्यानीं आलें नाहीं. तथापि कापूस, ताग, तंबाखू, भुइमूग, मिरची, गूळ, वगैरे ज्या जिनसांना पूर्वी शंभर रुपये किंमत येत होती ते आतां ५०।६० रुपयालाहि कोणी घेण्यास तयार नसल्यामुळें सरकाराचा आणि सावकाराचा सारा कशानें भागवूं, याचा त्यांना मोठा बिकट प्रश्न पडला आहे! उत्पन्नाच्या एकषष्ठांश पासून एकदृशांश पर्यंत असलेला सरकारी फाळा कसा तरी भरतां येईल. परंतु दोनतृतीयांश किंवा तीनचतुर्थांश असलेल्या सावकारी साऱ्याची भरती कशी करतां येईल, याची त्याला घोर चिंता लागून राहिली आहे. सावकारी सारा वा खंड धान्याच्या रूपांत असेल तर शेतकऱ्यांना त्याची विशेष फिकीर नाहीं. परंतु गेल्या एक दोन वर्षांतील कच्च्या मालाच्या भावावर ज्यांनीं खंड रकमेची, सावकाराजवळ ठेव ठेवून, कबुलायत लिहून दिली असेल त्या शेतकऱ्यांचें डोकें फुटण्याचीच आतां वेळ आली नाहीं काय? समजा, कापूस भाव ३५०

रु. खंडी, शेंगदाणा रुपयास ६। शेर, गूळ २१॥ रुपयास गोणी, जोंधळे रुपयास १० शेर, हळद ५ रुपये मण, बाजरी रुपयास ९॥ शेर असा दर असतां ( ता. १८ माहे सप्टेंबर १९२८चा दर. ) एक जमीन ३५० रुपये खंडरकमेनें पत्करली होती. तेवढीच रक्कम आतां भरावयाची तर हल्लींचा दर कापूस १३५—१३६ रुपये, शेंगदाणा रुपयास १० शेर, गूळ २० रुपये, जोंधळे १५ शेर, बाजरी १३ शेर, हळद २ रुपये मण असा आहे. अशा स्थितींत ३५० रुपयांची भरती करावयाची कोठून ? पूर्वी एक खंडी कापूस किंवा १२ गोण्या गूळ अगर ४४–४५ मण ( १२ पायलीचा मण ) शेंगदाणा विकला असतां तेवढ्यांतून वरची खंड रक्कम भागवितां येत होती. परंतु तेवढ्याकरितां हल्लीं अडीच खंडी कापूस, किंवा १७॥ गोण्या गूळ, किंवा ७३ मण शेंगदाणा विकावा लागेल पण तो आणावयाचा कोठून ? अर्थात पूर्वीच्या दरावर ज्यांनीं खंडरकमेच्या कबुलायती दिल्या असतील आणि त्यांचे सावकार जर अविचारी आणि निर्दय असतील तर बापड्या शेतकऱ्यांच्या हाडांचाहि खंडरकम भरतांना चुराडा होणार !

आमची ही शेतकरी वर्गाविषयींच कहाणी ऐकून कोणी केवळ चळवळे असे ह्मणतील कीं स्वराज्याची चळवळ आणि हिंदी शेतकरी वर्गाचा कच्चा माल सवंग होणें याचा परस्पराशीं काय संबंध आहे ? जगांतलाच व्यापार हुंडणावळ, सुवर्णाचें चलन सार्वत्रिक नसणें वगैरेमुळें मंदावला आहे आणि त्याचाच परिणाम एथल्या शेतकऱ्यांना भोगावा लागत आहे. असें असतां चळवळींत व्यापार मंदीचा विषय घुसडून चळवळीविषयीं शेतकरी वर्गाचा बुद्धिभेद करणें हा स्वराज्यद्रोह होय. ” केवळ चळवळ्यांचा हा युक्तिवाद चळवळींत शरिराबरोबर मनहि ज्यांचें प्रवाहपतित झालें आहे त्यांना सोळा आणे बरोबर दिसेल. परंतु स्वराज्यासाठीं ह्मणून परदेशी मालावर बहिष्कार घालण्यांत येत आहे त्याचाच परिणाम आज शेतकरी वर्गाला भोगावा लागत आहे ना ? इंग्लंड कापडविक्रीच्या रुपानें दरसाल ६५ कोटी रुपये हिंदुस्थानां-

तून नेतें, हा आंकडा भयंकर आहे ही गोष्ट खरी परंतु ते ६५ कोटी रुपये कापडाच्या रूपानें हिसकावून घेतें ह्मणूनन जर सबंध परदेशी कापड आणि मालावर बहिष्कार घालावयाचा तर परदेश आमच्याकडून दरसाल १०० कोटी रुपयांचा कापूस, ४० कोटी रुपयांचे तांदूळ, १०० कोटी रुपयांचे ताग आणि तागाचें कापड, ३० कोटी रुपयांचा शेंगदाणा, २ कोटी रुपयांचा चहा खरेदी करितात त्याची वाट काय? परदेशच्या मालावर आह्मी बहिष्कार घात ल्यानंतर आमचा ते कच्चा माल खरेदी करण्याइतके दुधखुळे नाहींत. आणि दुधखुळे जरी असले तरी विकत घेऊन करणार तरी काय? यावर कोणी दांड शाहाणे लागलींच खुलासा करतील कीं, आमचा कच्चा माल आमच्या देशांत राहील आणि एथें त्या प्रमाणांत देशी उद्योगधंदे निर्माण होतील. लोकांचें अन्नपाणी स्वस्त होईल. " अंशत: खुलासा सयुक्तिक आहे. परंतु कच्चा माल पैशाला पासरी झाल्यामुळें शेतकरीवर्ग केवळ कंगाल होतो याची वाट काय! सुमारें तीन अब्ज रुपयांचा कच्चा माल परदेश खरेदी करितो ह्मणूनच महायुद्धानंतर आणि गेल्या वर्षापूर्वी रुपयाला जोंधळे १० शेर आणि तांदूळ ५ शेर असा भाव होता. परंतु हा तीन अब्जाचा माल खरेदी करण्याइतकी परस्पर सहकार्यानें परदेशांत आह्मी निदान शेतकरी वर्गानें शक्ति उत्पन्न केली नाहीं तर रुपयाला १५ शेरांच्या ऐवजीं पंधरा पायली जोंधळे आणि पांच पायली तांदूळ होतील. कारण कापूस, ताग, चहा आणि शेंगदाणा परदेश खरेदी करणार नाहीं. त्या पिकाकरितां सुमारें ३ कोटी एकर जमीन जी गुंतलेली आहे तपैकीं निदान दोन कोटी एकर जमिनींत जोंधळा, गहूं यांसारखीं धान्यें पिकवावीं लागतील. ह्मणजे मागणी नसतां माल निपजाविणें भाग पडेल. अर्थात् तो मातीमोल होणें स्वाभाविकच होय, आणि यामुळेंच पैसा बेहद्द महाग होईल. ह्मणजे जो रुपाया साहा महिन्यांपूर्वी शेतकऱ्याला १० शेर जोंधळे किंवा पांच शेर तांदूळ देऊन मिळत होता, तोच रुपाया मिळविण्यासाठीं त्याला


पंधरा पायली जोंधळे किंवा दहा पायली तांदूळ विकावे लागतील ! संसारांत अन्नवस्त्र एवढ्याचीच गरज असती आणि हिंदुस्थानाला जगाचें अस्तित्वच मूर्खपणानें नाकारावयाचें असेल तर धान्य आणि कापूस पैशाला पासरी केल्यामुळें देशाला त्या दृष्टीनें तोटा होणार नाहीं. परंतु संस्कृति वाढवावयाची असेल तर जगाबरोबर आपल्याहि देशांत रुपया स्वस्त झाला पाहिजे. ह्मणजे हिंदुस्थानांतील कच्चा माल महाग झाला पाहिजे. तो मग निर्गतीमुळें ह्मणजे बाहेरदेशीं गेल्यामुळें होवो अगर हिंदुस्थानांतच कच्चा माल पक्का करण्याचे भरपूर कारखाने निघून होवो. आज परदेशी मालावरील बहिष्कारामुळेंहि हिंदुस्थानांतील कच्च्या मालाला मागणी नाहीं. आणि यामुळें कच्चा माल पक्का करण्याचे एथले कारखाने तरी वाढते तर थोडा वेळ शेतकरी वर्गानें दम धरला असता. परंतु दुर्दैव हें कीं, एतद्देशीय कारखाने एकामागून एक बंद पडत चालले आहेत. संक्रमणावस्थेंत असें कांहीं काळ चालावयाचेंच असें सुचविण्यांत येईल. परंतु या संक्रमणावस्थेंतील तोट्याचा बोजा केवळ प्रत्यक्षतः शेतकरी वर्गानेंच तेवढा कां उचलावा, याचें कारण कोणी सांगतील तर त्यांचे आमच्यावर फार उपकार होतील. सद्यःस्थितीनें अनेक विषयांवर जो प्रकाश पाडला आहे त्यामुळें आह्मास असें वाटतें कीं, एकदम परदेशी मालावर बहिष्कार हा मार्ग शेतकरी वर्गाला बिलकूल हितावह होणार नाहीं, आणि त्याचा प्रत्यय आतां दरेक माणसास आला आहे. कांहीं असो. ह्मणजे स्वदेशी मालावरच्या बहिष्कारामुळें हिंदी उद्योगधंद्याची भरभराट होऊन त्याबरोबर शेतकरी वर्गाच्या कच्च्या मालाला मोल येईल कीं नाहीं याविषयीं प्रस्तुत प्रकरणीं विशेष आवश्यकता नाहीं. फक्त आज परदेशी मालावरील बहिष्कारामुळें हिंदी शेतकरी वर्गाला पहिला एकच का असेना मोठा धक्का बसला आहे, एवढी गोष्ट प्रांजलपणें कबूल करण्यांत आली ह्मणजे आमचें काम भागलें. आणि ३५० रुपयांचा कापूस १५० वर आणि बारा रुपये मणाचा ताग अडीच रुपयावर उतरलेला पाहात अस-

तांहि तें शेतकरी वर्गाला नुकसानीचें होणार नाहीं, असें ह्मणणारा नराधम कोणी असेल, असें आह्मास वाटत नाहीं. तेव्हां हें जें शेतकरी वर्ग नुकसान सोसत आहे ह्मणजे ज्या शेतकऱ्यांच्या हातांत तागविक्रीचे ५०–६० कोटी रुपये पडत होते त्यांच्या हातीं २०–२५ कोटी रुपये तरी आतां पडतील कीं नाहीं याची शंका आहे. आणि अशाहि स्थितींत पुनः व्यापारमंदीमुळें उत्पन्न झालेल्या आगींतील शेतकरी वर्गास करबंदीच्या फुफाट्यांत लोटण्यास तयार असलेल्यांनीं स्वराज्यविषयक चळवळीच्यापायीं निदान शेतकरीवर्गा इतकें तरी आपण भांडवल गमावून घेतलें आहे काय, याचा विचार करावयास नको ?

बड्या पगारवाल्या सरकारी नोकरांची तर व्यापारमंदीमुळें चैनच झाली आहे. कपडालत्ता, दूध, तेल, तूप, भाजी आणि धान्य हे प्रमुख संसारोपयोगी जिन्नस त्यांना एकंदरींत शेंकडा ४०–५० टक्के सवंग मिळत आहेत. पूर्वी शहरांत ४ शेर दूध मिळणें मुष्किलीचें होतें तें आज ६ शेरहि कोण घेईना. आठ आणे वाराचें कापड चार आणे झालें आहे, खोबरेलाचा मणी भाव पूर्वी ७॥ रुपये होता तो आज ४॥ वर उतरला आहे. तिळेलाचा दर ६ रुपये होता तो आतां ४८३ झाला आहे. लोणी ६ आण्याला शेर मिळत होतें तें आतां ३॥ आण्याला मिळत आहे. यामुळें सरकारी नोकराचा पगार बराच 'सेव्हिंग' होत आहे. आणि जी बड्या सरकारी नोकरांची स्थिति तीच इतर पांढरपेशा वर्गाची होय. आणि व्यापारी वर्गाच्या हातीं जरी आतां पूर्वीप्रमाणें पैसा खेळत नसला तरी त्यांच्या भांडवलाला विशेषसा धक्का लागला नाहीं. तथापि ज्याच्याजवळ परदेशी कापड आहे, अशां व्यापाऱ्यांना मात्र थोडासा खार लागणार. तथापि एकंदरींत शेतकऱ्यांचें नुकसान अतिशयित होत आहे आणि बड्या सरकारी नोकरांचा पैसा पूर्वीपेक्षां जास्त शिल्लक पडत आहे. याचा अर्थ हा कीं खुद्द शेतकऱ्यांकडे असलेल्या जमिनींपैकीं बऱ्याच जमिनी सरकारी नोकर आणि सावकार यांच्या घशांत जाणार, ह्मणजे

करबंदीच्या पूर्वीच चळवळीचा हा शेतकऱ्यांवरचा परिणाम कीं ज्यामुळें त्यांना आपल्या जमिनीस मुकावें लागत आहे. तात्पर्य, परदेशी मालावरील बहिष्कारामुळेंहि आधींच ज्या शेतकरी वर्गाचें अर्धें बळ कमी झालें आहे, त्या शेतकरी वर्गास करबंदीच्या यज्ञांत ढकलावयाचें याचा शेतकरी वर्गावर तर अत्यंत अनिष्ट परिणाम होणारच, परंतु त्यामुळें एकंदरींत देशाचें स्वास्थ्यहि नष्ट झाल्याशिवाय राहाणार नाहीं. तें कसें हें पुढील अंकीं पाहूं.

ता. १४।१०।३०.



# करबंदी आधीं कीं खंडबंदी!

५

स्वराज्यप्राप्तीसाठीं म्हणून चाललेल्या चळवळींत पांढरपेशावर्ग किंवा घरबैठे धंदेवाले स्वतःची कातडी काळजीनें आणि दूरदृष्टीनें शाबूत ठेवतील एवढेंच नव्हे तर करबंदीच्या सत्रांतील लिलावाला निघालेली शेतकऱ्याची स्थावर जंगम जिंदगी उपटण्यासहि ते कमी करणार नाहींत. आणि महात्मा गांधीसारखे जर स्वातंत्र्याच्या संग्रामांत शेतकरीवर्गानें उडी टाकावयाची तर शेतकरीवर्गाचा उद्धार करण्याइतकें महात्मा गांधीजी-जवळ विद्यमान कांग्रेसपक्षानें स्वातंत्र्य ठेविलें नाहीं. आणि त्यांत पुनः जगांतल्याच व्यापार मंदीमुळें आणि परदेशी मालावरील बहिष्कारामुळें शेतकरी वर्गाचें अर्धेअधिक बळ कमी झालें आहे. म्हणजे सांप्रतच सदरवर्ग दुष्काळाच्या आगींत होरपळत आहे. अशा त्याच्या अधोगतीच्या परिस्थितींत तो भावनाप्रधान बुद्धीनें आणि अंधश्रद्धेनें करबंदीच्या आत्मयज्ञांत उडी टाकण्यास तयार झाला तर त्याच्यावर आणि देशाच्याहि स्वास्थ्यावर कसा दुर्धर दुष्परिणाम होईल याविषयीं, गतांकीं ठरल्याप्रमाणें, आज चर्चा करावयाची.

करबंदीच्या दुःसह आणि अननुभूत दुष्परिणामाचें तर्कशास्त्रानुसारच कल्पनाचित्र रेखाटण्यासाठीं तसदी घेण्याचीहि आतां दुर्दैवानें जरुरी राहिली नाहीं. कारण बार्डोलीच्या शेतकऱ्यांच्या स्वार्थत्यागामुळें घडलेल्या दुष्परिणामाचें मूर्तिमंत पण अंगांवर शहारे आणणारें चित्र गेल्याच आठव-

ह्यांत जनतेपुढें ठेवण्यांत आलें आहे ! ह्मणे कीं, त्यांनीं घरादारांना कुलपें ठोकलीं ! जेवढें धान्य लगबगीनें पदरांत पाडून घेतां येईल तेवढें घेऊन बाकीच्या पिकांना आगी लावून दिल्या ! गुराढोरांना रानोमाळ सोडून दिलें आणि सुमारें सहाकोटी किंमतीच्या किंवा दरसाल ५० लाख रुपये उत्पन्नाच्या जमिनीवर तिलांजुळी देऊन ते आतां परागंदा झाले आहेत.' यांत तथ्यांश केवढा आहे, हें लवकरच दृष्टोत्पत्तीस येईल. परंतु करबंदीच्या पुढचा हा अपरिहार्य परिणाम हें निश्चित होय.

वर वर्णिल्यासारखा वास्तविक व काल्पनिक स्वार्थत्याग सर्वत्रच घडेल काय, हा विचाराचा प्रश्न आहे. कारण वीतभर जमिनीसाठीं किंवा क्षणैक मानापानासाठीं कोर्टांत हजारो रुपये उधळणारा शेतकरी वर्ग कोटीनें किंमत करावी लागेल अशा जमिनी आणि घरें सोडून जाईल, हें बहुशीं असंभवनीयच. परंतु काय होईल कोण जाणें अशा दैववादाच्या भोंवऱ्यांत गटंगळ्या खाणाऱ्यांच्या कल्पनेप्रमाणें तसें घडूं लागलेंच तर २१ कोटी शेतकरी वर्गास परागंदा होण्यास या प्रचंड भूतलावर जागा कोठें मिळेल? दहावीस हजार माणसें अतिवृष्टीमुळें किंवा अग्निप्रलयामुळें निराश्रित झाली तर त्यांची सोय करण्यासाठीं उभ्या जगाचाच धावा करावा लागतो. अशी वस्तुस्थिति असतां कोट्यवधि शेतकऱ्यांनीं परागंदा होऊन शहरांत सुखेंच मे शयनेंच मे अशा स्थितींत असणाऱ्यांच्या आकांक्षेप्रमाणें स्वराज्य मिळवून द्यावें, अशी आशा करणारांच्या अकलेची आणि मनोवृत्तीची कशी तारीफ करावी हें आह्मास समजत नाहीं! एकूणएक शेतकरी वर्गानें करबंदी करतांक्षणींच इंग्रजांना आपल्या चंबूगबाळ्यासहित विलायतेची वाट धरावी लागेल. अर्थात् त्यामुळें शेतकऱ्यांना परागंदा होण्याचीहि पाळी येणार नाहीं. ही त्रैराशिकी कल्पना ठीक आहे! आणि त्यांच्या कल्पनेप्रमाणें आह्मीहि ह्मणतों कीं, एकदम करबंदी कदाचित अमलांत येईल. परंतु हा पूर्वार्ध जरी आह्मी घटकाभर मान्य करीत असलों तरी करबंदी होताक्षणींच एथल्या इंग्रजी सत्तेचें निर्मूलन होईल

हीं गोष्ट मात्र आम्हास पटत नाहीं. कारण हिंदुस्थानचा शेतसारा साराच ३४ कोटी. तेव्हां एकाद्या वर्षाला ६०।७० कोटी रुपये जमेंत तूट आली कीं इंग्रज निजधामाचा मार्ग पत्करतील ही आशा व्यर्थ होय. उभें पीक सरकारच्या हातीं पडूं नये म्हणून बार्डोलीचे अहिंसावादी शेतकरी जर आपल्याच शेतांतील उभ्या पिकांना आगी लावण्यास तयार होतात आणि त्याबद्दल त्यांचे नागरिकांच्या सभा अभिनंदन करितात तर सांगून सवरून परके आणि आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेले इंग्रज फक्त शेतकऱ्यांनीं करबंदी अमलांत आणतांच तें आपली पथारी आवळूं लागतील ? नाहीं ते आपली हलाखीची आर्थिक स्थिती इंग्लंडांत कर्ज उभारून भरून काढतील! गेल्या महायुद्धांत इंग्लंडचा लढाईकडचा खर्च कांही दिवस दररोज तेरा कोटी रुपये होता. ही गोष्ट अंधश्रद्धेनें स्वातंत्र्य मिळविणारे विसरोत, परंतु आमच्यासारख्यांना मात्र नजरेआड करतां येणार नाहीं.

घटकाभर समजूं कीं, पांढरपेशा आणि घरबैठे धंदेवाल्यांना आपल्या 'पराय घरपर तुलशी नारायण' असल्या आत्मवंचक कृतीबद्दल पश्चात्ताप झाला आणि त्यांनींहि नोकऱ्या, वकिल्या, सर 'क्या' रावबहादूर 'क्या' सोडिल्या, इनकमटॅक्स नाकारिला, व शेतकऱ्यांना खंड सूट दिला. आणि यामुळें हिंदुस्थान सरकारचें दरसालचें सव्वादोनशें कोटी रुपयांचें उत्पन्न अजिबात बुडालें, तरीहि एक दोन वर्षें हिंदी लोकांच्या असल्या गगनभेदी चळवळीशीं तोंड दिल्याशिवाय इंग्रज राहणार नाहींत! अशा परिस्थितींत जेथें दोन चार कोटी रुपयांचीहि सारावंदी होणें अशक्य आहे तेथें करबंदीच्या सुदर्शनानें सरकारास सतावून टाकतां येईल आणि त्याच्याकडून स्वराज्य हिसकावून घेतां येईल अशी पाहिजे तर केवळ मूर्खांनींच कल्पना करावी. तरी पण करबंदी हें स्वराज्य मिळविण्याचें रामबाण साधन असें ज्यांना प्रामाणिकपणानेंच वाटतें त्यांच्याकरितां असंभवनीय तें संभवनीय समजून आम्ही असें विचारितों कीं, शेतकरी वर्गाला किती काळ परागंदा स्थितींत राहावें लागेल ?

सशस्त्र अर्थात् हिंसावादी आयर्लंडला स्वातंत्र्याकरितां इंग्लंडशीं सातशें वर्षे झगडावें लागलें. तेव्हां निदान शेतकरी वर्गानें सात वर्षे तरी करबंदीचा आत्म-यज्ञ करावा लागणार नाहीं काय ? पण सात वर्षांचा काळ सुसूत्रतेनें शेतकरी वर्गाला स्वराज्याकडेच नेईल काय ? कीं देशांत आत्मघाताची थंडाळी माजेल ?

शेतकरी वर्गच ठिकाणावर न राहिल्यास सरकारहि एका बाजूनें ठिकाणावर राहणार नाहीं. ह्मणजे देश ताब्यांत ठेवण्याकरितां किंवा स्वत:च्या दृष्टीनें देशांत शांतता नांदविण्याकरितां तें पोलीस आणि लष्कर वाढवील पण राष्ट्रमंदिराच्या पालनपोषणाकडे स्वभावत:च त्यांचें दुर्लक्ष होत राहील. अर्थात् करबंदीच्या यज्ञांत सॅनिटरी कमिट्या, ग्रामपंचायती, तालुकाबोर्डें, जिल्हाबोर्डें, आणि जिल्हास्कूलबोर्डें यांची त्यांच्या परिवारासह आहुति पडेल, ह्मणजे प्राथमिक शाळा, दवाखाने बंद पडतील ! रस्तावाढ आणि रस्ता दुरुस्तीच्या कामाला खीळ पडेल, एवंच शेतकरी वर्गाप्रमाणें शेतकरी वर्गावर जगणा-ऱ्यांनाहि रानोमाळ हिंडावें लागेल ! आणि पुढें शेतकरी वर्गाला रानटी स्थिति प्राप्त होईल. आज शेतकरी वर्ग सामान्यत: संस्कारयुक्त असतांहि तो अशिक्षित असल्यामुळें त्याचें पांढरपेशा वर्ग अखंडच सत्वशोषण करीत आहे. आणि अशा परिस्थितींत स्वराज्यासाठीं शेतकरी वर्गानें वनवास पत्करल्यानंतर स्वराज्य मिळतांच तो मूळस्थानास रानटी स्थितींत येतांच त्याला स्वराज्याचे हक्क आणि स्वातंत्र्याचें सुख उपभोगूं देण्यास पांढरपेशावर्ग तयार होईल काय? मुळींच नाहीं. आणि इतिहासांतहि दाखला नाहीं. आज अमेरिका आणि इंग्लंड सर्वश्रेष्ठ स्वतंत्र राष्ट्रें परंतु युनायटेड स्टेटस व इंग्लंडमध्यें आज पांढरपेशा वर्गाच्या राजकारणामुळें अनुक्रमें ५० लाख व एकवीस लाख लोक नुसते बेकार आहेत. आणि तेथला उद्योगी मजूर वर्गहि हालअपेष्टांतच दिवस काढीत आहे. वर्तमान पत्रकांच्या वाच-कांना ठाऊक असेलच कीं, इंग्लंडच्या गेल्या पार्लमेंटच्या निवडणुकींत उमेद-वार राहाण्याकरितां सरकारांत डिपॉझिट ठेवण्यास पुरेसा पैसा न मिळाल्या-

कारणानें बऱ्याच मजूर पक्षीय प्रतिनिधींना आपली उमेदवारी मागें घ्यावी लागली एवढेंच नव्हे तर आपल्या पक्षाची पुरेशीं वृत्तपत्रें प्रसिद्ध करण्यासहि आजच्या सत्ताधारी मजूरपक्षाजवळसुद्धां भरपूर पैसा नाहीं! इंग्लंडांतील मजूर पक्षाला किंवा शेतकरी वर्गाला भांडवलवाल्यांशीं टक्कर देत असतां जर नाकीं नव येत आहेत तर रानटी किंवा निरक्षर स्थितींत स्वराज्याचे वास्तविक हक्क निर्वेधपणें उपभोगूं देण्यास पांढरपेशा वर्ग कबूल होईल ही गोष्ट पाण्यांत निराधार पाषाण तरण्यासारखीच आश्चर्योत्पादक ठरेल. आज हिंदी पांढरपेशा वर्ग स्वराज्यासाठीं उत्कंठ झालेला दिसत असतांहि सात कोटी दलित वर्गांभोंवतालचा अस्पृश्यतेचा पाश तोडून टाकण्यास तो बिलकूल तयार नाहीं. उलट स्वराज्य मिळाल्या-नंतरच हा घरगुती प्रश्न सोडवूं असें अगदीं बेशरमपणें सांगत असतो. तेव्हां अनायासें पदरांत स्वराज्य पाडून घेण्यासाठीं आज धडपडत असलेला वर्ग शेतकऱ्यांच्या आत्मयज्ञामुळें मिळालेलें स्वराज्य शेतकरी वर्गाच्या स्वाधीन करील ही गोष्ट संभवनीय मानण्यास आमच्याजवळ किंवा कोठल्याहि एका हिंदुस्थानाच्या इतिहासांत दाखला नाहीं. उलट स्वराज्यप्राप्तीनंतर स्वराज्य राखण्यासाठीं जो पुढें कांहीं वर्षे यज्ञ पेटणार आहे त्यांतील आहुतीसाठीं आजच्या स्वभावाप्रमाणेंच, तो शेतकरी वर्गाला राखून ठेवील आणि भोळा बिचारा शेतकरीवर्गहि प्रवाहपतित होऊन पांढरपेशा वर्गाच्या चैनीकरितां स्वातंत्र्याच्या भारणींत आपले प्राण खर्चीत राहील! इंग्लंडच्या साम्राज्य-तृष्णेचा निषेध करण्याच्या कामीं इंग्लंडचाच मजूरपक्ष संधि मिळेल तेव्हां तत्पर असतो तो पांढरपेशाच्या असल्याच धोरणाकरितां होय. कां कीं, इंग्लंडचा साम्राज्यविस्तार केवढाहि मोठा झाला तरी त्यामुळें आपलें दुःख हलकें होत नाहीं. किंवा सुखांत भरती पडत नाहीं. ही गोष्ट मजूरपक्ष पुरते-पणीं ओळखून आहे. उलट साम्राज्य संरक्षणाकरितां जी प्राणहानि होते त्यामुळें बहुजन समाजाच्या लोकसंख्येंतच विशेष खड्डा पडतो. आणि म्हणूनच

इंग्लंडच्या चढाईच्या धोरणाला मजूर पक्षाचा नेहमींचाच विरोध असतो. इंग्लंडचा मजूर किंवा शेतकरी वर्ग इतका जागृत असतांहि जर त्याचा उपयोग इंग्लंडचा भांडवलवाला किंवा बुद्धिजीवि वर्ग आपल्या चैनीकडे करून घेण्यास मुळींच खती बाळगत नाहीं. तर हिंदी बुद्धिजीवि आणि भांडवलवाले वर्ग निरक्षर आणि अंधश्रद्धेच्या शेतकरी वर्गाला, त्याला उद्धारक होईल, असें स्वराज्य देण्यास तयार होतील अशी आह्मास तरी कल्पनाहि करवत नाहीं.

हिंदी लोकांच्या चळवळीमुळें एथून इंग्रज निघून गेले तर बळी तो कान पिळी या मामल्यास एथें पुन: सुरुवात होणार नाहीं, असें ह्मणतां यावयाचें नाहीं. इंग्रज जातांच रशिया किंवा जर्मन एथें एकदम घुसतील असें नाहीं. परंतु हिंदुस्थानांतच एकतंत्री सत्ता स्थापन करण्याची आजवर दडपलेली मुसलमान शीख, रजपूत व मराठा वगैरेंची मनोवृत्ति पुन: उचल खाणार नाहीं, असें नाहीं. आणि असें झालेंच ह्मणजे यादवी माजली किंवा 'सिव्हिल वॉर' सुरू झाली तर दोघांच्या भांडणांत आपला कांहीं चंचुप्रवेश होतो किंवा काय हें पाहाण्यासाठीं दुसरा एखादा देश धडपडल्याशिवाय राहाणार नाहीं. आतां आणखी पुन: हिंदुस्थानांत परकीय सत्ता दृढमूल होणें बरेंच कठिण होय. परंतु यादवी मोडण्यांत आणि परचक्र निवारण्यांत शेतकरी वर्गाची बरीच शिरकमळें रणदेवतेला वाहावीं लागतील. आणि पुढें स्थिरस्थावर झाल्यानंतर त्यांस पुन: पांढरपेशा वर्गाशीं भांडावें लागेल. ह्मणजे स्वराज्य मिळतांच स्वराज्य उपभोगण्याची ताकद शेतकरी वर्गांत राहाणार नाहीं. एवढेंच नव्हे तर ती पुढें किती वर्षांनीं येईल, याचाहि कोणास अंदाज करतां येणार नाहीं. आणि तो अंदाज करणें किती कठिण काम आहे, हें इंग्लंडमधील कांझरवेटिव्ह आणि मजूरपक्ष यांच्यांतील रस्सीखेचीच्या इतिहासावरून अजमावतां येईल, आणि ह्मणूनच करबंदीचा गृहीत धरलेला सात वर्षांचा काळ सुसूत्रतेनें शेतकरी वर्गाला स्वराज्याकडे नेणार नाहीं.

उलट शेतकरी वर्ग पांढरपेशा वर्गाला आजच्यापेक्षां सुलभ भक्ष्य होईल ! असें हें उपरोक्त पहिल्या प्रश्नाचें निराकरण झाल्यानंतर करबंदीमुळें देशांत आत्मघाताची बंडाळी माजेल काय या प्रश्नाची भवति न भवति लक्ष्यांत घ्यावयाची.

वरील प्रश्नाला आमची सदसद्विवेक बुद्धि तरी होकारार्थीच उत्तर देते आहे. दारिद्र्य हेंहि एक पापाचें घर आहे. दुष्काळांतच चोऱ्या आणि दंगे होतात, ही गोष्ट सर्वांच्याच अनुभवाची आहे. विश्वामित्र ऋषि गायत्री मंत्राचा द्रष्टा परंतु त्यानेंहि दुष्काळांत दोन महा पापें केलीं. पहिलें चोरीचें, दुसरें कुत्र्याचें मांस खाणें. मग करबंदीमुळें बेकार पडलेला प्राथमिक शिक्षकवर्ग, स्थानिक स्वराज्यांतील व मुलकीकडील कारकूनवर्ग शेतकरी आणि त्याचे बारा बलुतेदार इत्यादिकांचा अफाट बहुजन समाज अन्नत्यागानें अहिंसा वृत्तीचा अवलंब करील ही गोष्ट कालत्रयींहि शक्य नाहीं. सध्या व्यापार मंदीमुळें जी बेकारी माजली आहे तिच्या अनिष्ट फळाच्या कळ्या कित्येक दूरदृष्टी लोकांना आजच दिसत आहेत! अशा स्थितींत करबंदीचीहि भरती पडली तर काय प्रकार घडतील, याविषयीं शांतपणानें अनुमान बांधिलें पाहिजे. आज शांतता आणि सुव्यवस्था राखण्याच्या उद्देशानें प्रजेनें सरकारास कर दिला असतांहि सरकारच्या शांततेचें आणि सुव्यवस्थेचें क्षेत्र इतकें संकुचित झालें आहे कीं त्यांत प्रजाजनांच्या स्वास्थ्याला जागाच नाहीं. अशी जेथें स्थिति आहे तेथें करबंदी घडतांच प्रजाजनांतील गुडांनींच सुभेदारी गाजविण्याचा प्रयत्न चालविला असल्याचें पाहणें नशिबीं आल्यास त्यांत दोष कोणास द्यावयाचा ? आणि अशी गुंडगिरी माजणें ह्मणजेच ती आत्मघाताची बंडाळी होय. आणखी आजच गुंडगिरीचा अंमलहि कांहीं ठिकाणीं चालू असल्याचीं उदाहरणें त्रयस्थाच्या नजरेला येतहि असतील. एवंच करबंदी ही अत्यंत दुष्परिणामाची आहे, हें सर्वतोपरि सिद्ध होतें. परंतु असें असलें तरी सुद्धां नाइलाजानें कां असेना करबंदीच्या प्रवाहांत कांहीं ठिकाणचा शेतकरी वर्ग पडलेला दिसेल. तेव्हां तशाहि परिस्थितींत आधीं कोणती सावधगिरी ठेविली पाहिजे, हें आतां पुढील अंकीं पाहू. ता. २१।१०।३०

# करबंदी आधीं कीं खंडबंदी?

६

इच्छा नसतांहि कांहीं ठिकाणचा शेतकरीवर्ग करबंदीच्य वावटळींत सांपडलेला दिसेल, तेव्हां तशाहि परिस्थितींत त्यानें कोणती सावधगिरी ठेवावी याविषयं गतांकीं ठरल्याप्रमाणें, आज चर्चा करावयाची.

जाणता आणि स्वराज्याविषयीं अत्यंत आतुर दिसत असलेला पांढरपेशा वर्ग केवळ फुकाच्या रावबहादूर व रावसाहेब असल्या पदव्याहि सोडण्यास आपखुषीनें तयार नाहीं तेथें स्वराज्याची मुळ कल्पना नसलेला एवढेंच नव्हे तर पारतंत्र्यदुःखाचीहि ज्याला आंच पोचत नाहीं असला सामान्यतः पूर्व स्थितींतच असलेला शेतकरीवर्ग स्वराज्य मिळावें याकरितां करबंदीचा आत्मयज्ञ करण्यास आत्मप्रेरणेनें तयार होईल अशी कल्पनाहि करणें वस्तुतः अव्यवहार्य होय; परंतु शेतकरीवर्ग सामान्यतः जितका निर्बुद्ध आहे तितकाच तो परावलंबीहि आहे. त्याला अट्टल झुकानेवाल्यांनीं कसेंहि खेळवावें! भरपूर अवडंबर माजवून त्याला एकदा चेतना किंवा चालना दिली कीं पुरें आहे. सर्वस्वाचा नाश होईपर्यंत तो उपक्रम पुढें चालू राहावयाचाच! आणखी एवढ्याच एका मुद्यावर शेतकरीवर्ग करबंदीस प्रवृत्त होईल, अशी झुकानेवाल्यांची कल्पना नसते. झुकानेवाल्यांचीं कुळें किंवा कर्जदार लोक खेड्यापाड्यांतून असतातच. अशांना गावांतील कर्जदलालांची, बेकार गुंडांची आणि लब्धप्रतिष्ठित तरुणांची जोड मिळाली कीं तेथें करबंदीची होळी पेटविण्यास मुळीं विलंबच नाहीं. त्यांच्याविरुद्ध जाण्याचें जोखीम शिरावर घेण्यास कोण तयार होणार? आणि चळवळे लोक पुनः आपली चळ-

वळ महात्मा गांधीजींच्या नांवाखालीं चालविणार! पण तद्वत कृति असली पाहिजे असा कोणाचा सत्याग्रह राहाणार नाहीं! ह्मणजे चळवळीच्या गांवांत बळजोरीचा सामाजिक बहिष्कार नांदणार! असल्या सामाजिक बहिष्काराची शहरांतील लोकांस कल्पना येणार नाहीं. कारण बाकीचीं सारीं कुकर्मे माफ राहातील. परंतु जर कोणी कर देण्याची धैर्यानें भाषा बोलूं लागेल तर मात्र त्याचा सामाजिक बहिष्कारामुळें इतका कोंडमारा होऊन जाईल कीं खुळयांच्या बाजारांत सामील होणें हाच शहाणपणा होय, असा त्यास अनुभव येईल! एवंच झुकानेवाल्यांना उपरोक्त प्रवृत्तीच्या लोकांची गट्टी जुळवितां आली कीं तेथें करबंदीचा यज्ञ धडाडण्यास सुरुवात झालीच ह्मणून समजावें!

वरील प्रवृत्तीचे किंवा झुकानेवाल्यांचे मिंधे लोक खेड्यांतून बहुसंख्य असतात, असें नाहीं. परंतु त्यांचा गांवावरील पगडा ह्मणून पाहून आपलें धोरणच यशस्वी करण्यास बहुसंख्य पण उद्योगशील लोकांना आधीं सवड नसते आणि तशांत पुनः बेकार पण प्रसंगोपात पुढाऱ्याजवळ जी हातच-लाखी किंवा धूर्तपणा असतो तो सामान्यतः प्रामाणिक उद्योगशील लोकां-जवळ नसतो. यामुळें हुल्लडीला चटावलेल्या सभेला जिंकण्याचें बहुसंख्य पण उद्योगी लोकांना अशक्य होतें! अशा परिस्थितींत वर ध्वनित केल्या-प्रमाणें प्रवाहपतित होऊन सर्वांच्याच नशिबांशीं आपलेंहि नशीब चिकटवून पुढें काय होतें हें पाहाण्याखेरीज गत्यंतर नसतें. ह्मणूनच अशाहि प्रसंगीं कांहींसा तरणोपाय सावध शेतकऱ्यांकरितां सुचविणें आह्मास क्रमप्राप्त झालें आहे.

गांवांतील निरुद्योगी लोकांचें किंवा टोळीचें 'राजकारण' ह्मणून पाडण्याइतकी अनुकूल परिस्थिती असेल तर त्या टोळीबरोबर गांवच्या भलेपणाकरितां तसें करण्यास कांहीं हरकतीचें नाहीं. नव्हे अवश्यमेव केलेंच पाहिजे. परंतु वर सांगितल्याप्रमाणें तें अशक्य होत असेल तर करबंदीचा

आत्मयज्ञ विशेष खडतर होऊं नये याकरितां जरूर तेथें खंडबंदीचा अवलंब करणें अपरिहार्य ठरेल आधीं खंड घेणार जमीनदार बहुधा सरकारी नोकर, सावकार किंवा शहरांतील घरबैठे धंदेवाले असतात. आणि ते बहुत करून मुदतीच्या आधींच आपला सरकारी शेतसारा भरून मोकळे होतील आणि बार्डोली तालुक्यांत तसा अनुभवहि आला आहे. परंतु जर का करबंदीच्या वणव्यांत खेड्याबरोबर एखादें शहरहि पडूं लागलें तर मात्र करबंदी नसेल अशाहि भागांतील कुळांना जमीनदाराला खंड देण्याचें आत्मसंरक्षणार्थ तहकूब करून ठेवणें अगत्याचें आहे. कारण जमीनदाराकडून जर मुदतींत सारा वसूल झाला नाहीं तर जमीन महसुलीच्या कायद्यान्वयेंच जमिनींत कसणाऱ्या कुळांकडून सक्तीनें अर्थात जमीनें शेतसारा वसूल केला जातो. तेव्हां जमीनदाराच्या अपराधाचें प्रायश्चित आपणास भोगणें भाग पडूं नये, असें जर जाणत्या कुळांना वाटत असेल तर जोपर्यंत कांग्रेसनें करबंदीचा ठराव रद्द केला नाहीं, तोंपर्यंत कुळांनीं आपल्या जमीनदाराचा खंड भरण्याची घाई कां करावी, हें आह्मांस समजेनासें झालें आहे. ह्मणून करबंदी अमलांत येवो वा न येवो परंतु शेतसारा न भरल्याची पावती जमीनदाराकडून जोंपर्यंत दाखविली जाणार नाहीं. तोंपर्यंत कुळांनीं आपला खंड सावकाराला भरूच नये, अशी जर आह्मी इषारत दिली तर ती आक्षेपार्ह किंवा अप्रासंगिक ठरणार नाहीं, असा आह्मांस भरवंसा आहे. कोणी एथें अशी शंका घेतील कीं, जर कबुलायतीप्रमाणें मुदतींत खंड भरला नाहीं तर जमीनदार कुळांवर मदतीचा दावा करतील आणि त्यामुळें दाव्याचा एक खर्च कुळांच्या मानगुटीवर बसेल. शंका अवास्तविक नाहीं. परंतु सरकारांनीं किंवा न्यायाधीशांनीं कुळांच्या उद्देशाकडे लक्ष्य पुरविलें पाहिजे. आणि गांवचा गांव जर याच उद्देशानें खंडतहकुबी अमलांत आणील तर दाव्याचा खर्च कुळावर लादण्याचा अन्याय न्यायाधीशहि करणार नाहींत. आणि कांग्रेस ही संस्था लोकमान्य आहे आणि पांढरपेशा वर्गाला किंवा भांडवलवाल्यांना स्वराज्याची

जर सत्कंठा लागली असेल तर गरीब कुळांनीं आत्मसंरक्षणार्थ पत्करलेला खंडतहकुबीचा उपाय असह्य कां बरें वाटावा? एवंच काय करबंदी जर प्रासंगिक ठरत असेल तर करबंदीचें तत्त्व मान्य असणारांनीं तरी करबंदीपूर्वीच खंडबंदीला नसली तरी खंडतहकुबीला मान्यता दिली पाहिजे.

वरचें विवेचन झालें करबंदीच्या ठरावापुरतें परंतु करबंदीच्या अमलबजावणींत मात्र खंडतहकुबीवरच तत्त्वतः भागत नाहीं. तर तेथें खंडबंदीच अपरिहार्य आहे. बार्डोली व बोरसद तालुक्यांतील कुळांनीं जमीनदारांस खंड भरला की नाहीं, ही गोष्ट उघडकीस आली नाहीं, मात्र जेथें आपखुषीनें वा बळजोरीनें करबंदी अमलांत येईल तेथील कुळांकडून कांग्रेसच्या अनुयायांनीं तर खंडाची अपेक्षा करणें ह्मणजे आमच्या मतें ती नराधमताच ठरेल. आणि साराच देश कांग्रेसचा अनुयायी आहे, असें कांग्रेसच्या पुढाऱ्यांचें छातीठोक सांगणें आहे. तेव्हां कांग्रेसचा करबंदीचा ठराव प्रामाणिकपणें त्यांना अमलांत आणावयाचा असेल तर त्यांनीं करबंदीपूर्वी खंडबंदी अमलांत आणून दाखवावयास नको काय? करबंदीचा यज्ञ ज्या त्या गावांत राहूनच सिद्धीस नेतां आला असतां तर शेतसाऱ्यापुरतीच खंडांत जमीनदारांनीं सूट देण्यावर भागलें असतें परंतु करबंदीचा यज्ञ परागंदा झाल्याशिवाय परिपूर्ण होतच नाहीं, हें बार्डोलीच्या उदाहरणावरून सिद्ध झालेंच आहे. आणि निव्वळ कूळच असा कोणी शेतकरी सहसा नसल्यामुळें अर्थातच कर भरणाऱ्या शेतकऱ्याबरोबर जमीनदारांच्या कुळांनाहि निदान शेजारधर्म पाळण्यासाठीं तरी आपखुषीची हद्दपारी पत्करावी लागणार. तेव्हां अशा स्वातंत्र्यार्थ वनवासांत पडलेल्या कुळांकडून खंड वसूल करण्याची नुसती एतद्देशीयास इच्छा होणें हें सुद्धां आसुरी वृत्तीचें ठरणार नाहीं काय? तेव्हां कांग्रेसच्या ज्या पुढाऱ्यांना करबंदी अमलांत आणावयाची असेल त्यांनीं ते जर स्वतः जमीनदार असतील तर आपापल्या कुळांना खंडाची माफी दिल्याबद्दल आजच जाहीरनामा काढावयास नको काय? परंतु अनुभव तर भलताच येत आहे. आतांपर्यंत

बार्डोली व बोरसद तालुक्यांतून हजारों शेतकरी कुटुंबांनीं करबंदीसाठीं स्थानत्याग केल्याच्या वार्ता वाचावयास मिळाल्या परंतु एकाद्या जमीनदार पुढाऱ्यांची करबंदीकरितां मिळकत जप्त झाल्याचें एकहि उदाहरण निदान आमच्या तरी दृष्टीपुढें आलें नाहीं. तेंच ईजिप्तमध्यें करबंदीची चळवळ हिंदुस्थानापेक्षां किती तरी मागाहून सुरू होऊनहि तेथील वफद पक्षाचे पुढारी नहासपाशा यांची करबंदीसाठीं मिळखत जप्त झाल्याचें वृत्त सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आलें आहे! असे आपल्या पक्षाच्या ठरावाशीं इमानानें वागणारे पुढारी हिंदुस्थानांत कितीसे मिळतात? फार दूर कशाला? तुरुंगांतून सुटून येऊन आरती ओवाळून घेतांना आपल्या कुळांना अर्धेलीनें जमिनी दिल्याचें वचन देऊनहि पुनः वकिली लढविण्यास खुद्द श्री. गंगाधरराव देशपांड्यांनीं कमी केलें नसल्याचें आमच्या कानावर आलें आहे. म्हणजे शेतकरी वर्ग पिकवीत असलेल्या मालाची किंमत शेंकडा पन्नास साठ टक्क्यांनीं उतरलेली असतां ज्यांना जमिनी अर्धेलीनें किंवा निम्म्या हिश्यानें देण्याचें धैर्य होत नाहीं ते लोक करबंदीची चळवळ अमलांत राहीपर्यंत कुळांना खंडाची सूट देण्यास कितपत तयार होतील, हें स्पष्ट दिसतेंच आणि हें आम्ही मागील लेखांतूनच ध्वनित केलें आहे. परंतु करबंदीचा यज्ञ चालू करा म्हणणारे जमीनदारच खंडबंदीला तयार नसले तरी कुळांनीं या बाबतींत जरूर तितकें आत्मसंरक्षण करून घ्यावयास नको काय? बाकी याहि बाबतींत कुळांना झुकानेवाले बुद्धिभेद केल्याविना राहाणार नाहींत, हें आम्हांस ठाऊक आहे. ते आम्हास असा युक्तिवाद लढवितील कीं, आम्हास झगडावयाचें आहे सरकाराशीं, जमीनदाराशीं नव्हे. आणि अशा वेळीं जर करबंदीबरोबर खंडबंदीचा प्रश्न पुढें केला तर देशांत बेकी माजेल आणि कार्यांत बिघाड उत्पन्न होईल शिवाय जमीनदारालाहि करबंदीचा त्रास सोसावा लागणारच आहे. तेव्हां अशा प्रसंगीं कुळांनीं खंडबंदीचा प्रश्न उपस्थित करून जमीनदारांचें चित्त द्विधा कां करावें? सकृद्दर्शनीं हा युक्तिवाद बिनतोड दिसतो, परंतु पांढरपेशा जमीनदार वर्ग कर-

बंदी अमलांत आणील ही गोष्ट गृहीत धरून आमची ही लेखमाला चालविली नाहीं तर तो स्वतःची कातडी सुरक्षित ठेवून निर्बुद्ध आणि भावनाप्रधान शेतकरी वर्गास आगींत लोटून देईल तर अशा वेळीं शेतकरीवर्गानें कशी सावधगिरी ठेवावी, हें सांगण्यासाठींच इतकी आह्मीं तसदी घेतली आहे. आणि आजवरच्या अनेक अनुभवामुळें आह्मास असेंच वाटतें कीं, कसल्याहि चळवळींत पांढरपेशा वर्ग आपल्या खिशाला पैचाहि खार लावणार नाहीं. बारडोली व बोरसद तालुक्यांत आणि खेडा जिल्ह्यांत करबंदीचा सत्याग्रह चालल्याचें आपण ऐकतों. परंतु इनकमटॅक्स बंदीचा सत्याग्रह उभ्या हिंदुस्थानांत कोठें तरी चालला आहे काय? तेव्हां करबंदीच्या आत्मयज्ञानें शेतकरी वर्गानें सर्वस्वनाश करून घ्यावा ह्मणणारांनीं आत्मयज्ञ करणाऱ्या शेतकरी वर्गानें खडबंदीचा प्रश्न काढतांच देशांत बेकी उत्पन्न होईल, असें ह्मणावयाचें ह्मणजे याचा सरळ अर्थ हाच कीं, देशोद्धारार्थ पांढरपेशा वर्ग स्वार्थत्याग करण्यास तयार नाहीं. आणि हेंच जर खरें आहे व चालू यज्ञांत सांगोपांग आहुति पडल्याखेरीज जर स्वराज्य मिळावयाचें नसेल तर पांढरपेशा जमीनदार वर्गातर्फेची आहुति खडबंदीच्या मार्गानें शेतकरी वर्ग पाडून घेण्यास तयार झाल्यास त्याचें तें कृत्य ऐक्यविघातक ठरविणें निवळ जबूकनीतीचें नव्हे ? कांहीं असो, खेड्यांतील करबंदीपूर्वी खडबंदीला पांढरपेशा वर्ग किंवा घरबैठे धंदेवाले लोक जर तयार होणार नाहींत तर त्यांची शेतकरी वर्गाच्या करबंदीच्या आत्मयज्ञाविषयीं सहानुभूति आहे, असें मानावयास मुळींच जागा नाहीं. आणि आह्मी तर ह्मणतों कीं, करबंदीच्या चळवळीची यशस्विता अजमावयास खडबंदी निर्विघ्नपणें अमलांत येणें हीच उत्कृष्ट कसोटी होय. कारण शेतकरी वर्गाची खडबंदी पांढरपेशा जमीनदार वर्गास सहन झाली तरच पुढें करबंदीच्या वेळीं लिलावाला निघणाऱ्या जमिनी घेण्यास तो पुढें येणार नाहीं, अशी खात्री बाळगतां येईल. कोणी ह्मणतील खडबंदीस मान्यता देऊन जमीनदार वर्गास तोट्यांत पाडून कुळांना फायदा काय ह्मणून ह्माव-

याचा ! तर याचें उत्तर हेंच कीं, पुढें कुळांना--करबंदीच्या--दिव्यांत उडी टाकावयाची आहे म्हणून आणि या खंडबंदीचें नुकसानहि कांहीं अनेक वर्षें सोसावें लागणार नाहीं. कारण करबंदीच्या यज्ञाची सुरुवात--म्हणजेच पिकलेलें धान्य पदरांत पाडून घेऊन परागंदा व्हावयाचें ही होय ! मग देशासाठीं फकीर होण्यास ज्यांना तयार करावयाचे त्या शेतकरी वर्गाच्या झोळींत आपल्या खंडाचे एक वर्षाचें तेवढें धान्य टाकण्यास पांढरपेशा जमीनदार वर्गानें तयार व्हावयास नको काय ? आणि तशी जर त्यांची तयारी नसेल तर शेतकरी वर्ग करबंदीच्या यज्ञांत होरपळणार नाहीं. यासाठीं त्यांनीं काळजी घ्यावयास नको काय ? नाहीं तर करबंदीपायीं शेतकरी वर्ग परागंदा होतांच आपोआप खंडबंदी ही मागून येणारी आहेच ! बार्डोली तालुक्यांत सरकारास सारा देणारे शेतकरी कोणी नसतील पण जमीनदारास खंड देणारीं कुळें तरी मग कोठली आणावयाची ? सारांश काय कीं, करबंदी नंतर खंडबंदी ही क्रमप्राप्तच आहे ! पण पांढरपेशा वर्ग स्वराज्यासाठीं आतुर आणि स्वार्थत्याग करावयास तयार आहे किंवा नाहीं यासंबंधींच्या परीक्षेसाठीं शेतकरी वर्गानें आधीं खंडबंदीचा प्रयोग अमलात आणून पहावा आणि तो जर निर्वेधपणें यशस्वी ठरला तरच मग करबंदीच्या आत्मयज्ञास त्यांनीं तयार व्हावें. नाहीं तर 'ना देवाय ना धमाय' अशा रीतीनें त्यांना हकनाक मरावें लागेल. असा जर आम्ही आज इशारा दिला तर तो अगदींच वाया जाईल काय ? असो, खंडबंदी अमलांत आणतां आली तरच शेतकरी वर्ग स्वराज्य मिळविण्यास कसा समर्थ होईल, हें आतां पुढील लेखांकांत पाहूं.

तारीख ११-११-३०

☞ (दुरुस्ती–पृष्ठ ३८ वरील १५ व्या ओळींत 'शेतसारा न भरल्याची' या वाक्यांतील 'न' हें अक्षर चुकून पडलें आहे.)

# करबंदी आधीं कीं खंडबंदी?

७

हिंदभूमीच्या अस्सल पुत्रांस ह्मणजे काबाडकष्टानें संपत्ति उत्पन्न करणाऱ्या शेतकरी वर्गास खंडबंदी करतां आली तरच हिंदुस्थानास स्वराज्यजन्य सुख अनुभवितां येईल; आणि कदाचित् शेतकरी वर्ग सर्व बाजूंनीं उन्नत होण्यापूर्वीच स्वराज्य मिळालें तरी तें हिंदुस्थानांत स्वास्थ्य नांदविण्यास समर्थ होणार नाहीं, हा आजच्या चालू लेखांतील निष्कर्ष किंवा आमच्या मतें सिद्धांत आहे.

हिंदुस्थानांत शेतकरी वर्ग शेंकडा ७२ आहे. ह्मणजे हिंदुस्थानच शेतकरी आहे. अर्थात् शेतकरी वर्गाचें चित्र तेंच हिंदुस्थानचें होय, हा वरील सिद्धांताचा मुख्य आधारबिंदु आहे.

मग हिंदी शेतकरी वर्गाचें चित्र अविकृत अंतःकरणाचा आणि निर्दोष दृष्टीचा कुशल कारागीर कसें रेखाटील? तीस कोटीच्या देशांतच खपणाऱ्या कच्च्या मालाखेरीज सुमारें दोन अब्ज रुपये किंमतीचा माल दरसाल परदेशीं रवाना होत आहे. त्याचा उत्पादक शेतकरी वर्गच. पण त्याची स्थिति काय तर 'साखरेच्या गोण्या बैलाचिया पाठीं तयाला शेवटीं कडबाचि;' किंवा 'मालाचिं पेटारें वाहाताति उंटें तयाला पै कांटे भक्षावया' अशीच होय. शेतकऱ्यांतील बहुसंख्याक समाज सुगीनंतर फार तर तीन चार महिने सुखानें चार घांस खात असेल. परंतु बाकीचे आठ महिने त्याल अन्न ह्मणजे खोबऱ्यांसारखें महाग झालेलें असतें, आणि परदेशालाच जो

शेतकरी वर्ग जो सवाशें कोटींचा कापूस पाठवितो त्याला फाटक्या कुडत्यां-तच चार चार महिने काढावे लागतात! या दुर्दशेच्या मुळाशीं अज्ञान आणि पारतंत्र्य हीं एकाहून एक अशीं मुख्यतः दोन बलिष्ठ कारणें आहेत असें पुनः पुनः सांगण्यांत येत असतें. हीं कारणें लवचिक आणि अति व्यापक असल्याकारणानें या खेरीज तिसरें कोणतें मूळ कारण असेल, असें आह्मा-सहि वाटत नाहीं. परंतु पारतंत्र्य नष्ट झाल्याविना शेतकरी वर्ग सुधरणार नाहीं, हा जो अलीकडे अनिरुद्धपणें गजर चालला आहे त्याविषयीं मात्र आमचा मूलतःच मतभेद आहे. ह्मणजे पारतंत्र्याचें उच्चाटन झाल्यानंतर शेत-करी वर्गाच्या उन्नतीला खीळ बसेल असा आमच्या ह्मणण्याचा आशय नाहीं तर शेतकरी वर्गाची आर्थिक स्थिति मर्यादितपणें सुधारल्याशिवाय पार-तंत्र्य मुळीं नष्ट होणार नाहीं अशीच आमची दृढ समजूत आहे. आणि याविषयींच्या कारणांना आतां पुढें विचार करावयाचा.

शेतकरी वर्गाला स्वराज्याची भूक लागली आहे काय ? नाहीं, असेंच उत्तर दिल्याविना गत्यंतर नाहीं. आतां आजच्या स्वराज्यविषयक चळवळींत कित्येक शेतकरी पडलेले आहेत, हें आमच्या नजरेआड झालेलें नाहीं. परंतु त्यांची भागीदारी स्वयंस्फूर्तीची किंवा समजुतीची नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे. अतएव वस्तुतः शेतकरी वर्ग स्वराज्योत्कंठ नाहीं ह्मणून वरील निय-मान्वयें हिंदुस्थानहि स्वराज्योत्कंठ नाहीं. स्वातंत्र्य निसर्गसिद्ध असतांहि शेतकरी वर्ग स्वराज्यातुर नाहीं, असें ह्मणणें ह्मणजे बुद्धिपुरस्सर वस्तुविपर्यास होय, असा साहजिकच आक्षेप घेण्यांत येईल. परंतु प्रस्तुत आक्षेप अदू-रदृष्टीवरच अधिष्ठित झाला असल्याचें विचारांतीं कोणाच्याहि निदर्शनास येईल. स्वातंत्र्यप्रीतीप्रमाणें क्षुधा ही मुद्दां नैसर्गिकच आहे. परंतु तब्येत निर्दोप असेल तेव्हांच भूक लागते, नाहीं तर भूक निसर्गसिद्ध आहे ह्मणून जर दुसऱ्याचें पाहून रोगी एखादें पक्वान्न बळेंच आपल्या घशांत कोंबून घेईल तर पुढें त्याच्या हालअपेष्टांना सीमाच राहात नाहीं. केवळ रोगानेंच

भूक मरतें असेंहि नाहीं. तर वेळेवर अन्न न मिळाल्यामुळेंहि तशी स्थिति प्राप्त होते. आणि असल्या स्थितीतच आजचा शेतकरी वर्ग सांपडला आहे. आणि त्याचा जर जठराग्नि प्रदीप्त करावयाचा असेल तर एकदम त्याच्या पोटांत संपूर्ण स्वराज्याचें जडान्न घालण्याचा व्यवहारशून्य मार्ग न पत्करतां हलक्या अन्नानेंच त्याची प्रकृति आणि शक्ति वाढवून घेतली पाहिजे. असें तें शेतकरी वर्गाकरितां हलकें अन्न कोणतें ? तर जिची तो थंडी उनाची आणि वाऱ्या पावसाची पर्वा न करितां दिवस रात्र गुरांपोरांसह उपासना करितो, ती अन्नदात्री भूदेवी त्याच्या मालकीची असली पाहिजे. तिला 'वंदेमातरम्' असें हक्कानें आणि निःशंक वृत्तीनें ह्मणतां आलें पाहिजे. आज तशी स्थिति आहे काय ? बिलकूल नाहीं. तर शेतकरी समाजांतील शेंकडा ८०।८५ कुटुंबें गुलामगिरीवजा हमालगिरीनेंच सावकारांच्या जमिनींत मागचा पुढचा, सुखदुःखाचा आणि नफ्यातोट्याचा विचार न करितांच पिढ्यानपिढ्या राबत आहेत. ह्मणजे बहुसंख्येच्या दृष्टीनें शेतकरी वर्गच आज हमाल आहे. हें दृश्य इष्ट आणि न्याय्य आहे काय ?

आमचे वंश इंग्रजांच्या पूर्वी हिंदुस्थानांत आहेत. एवढ्याच वहिवाटीवर हिंदुस्थान हा देश आमचा आहे, इंग्रजांचा एथें कांहीं संबंध नाहीं, एथून त्यांनीं चालतें झालें पाहिजे असें आह्मी जोरानें प्रतिपादन करीत असतों. आणि जगांतील व्यवहाराच्या दृष्टीनें तें अन्याय्यहि नव्हे. परंतु शेंकडो पिढ्या ज्या जमिनींत, पोटाला चिमटा घालून, शेतकरी वर्ग राबत आहे व ज्या जमिनी मूळच्या त्यांत राबणाऱ्यांच्याच होत्या. एवढेंच नव्हे तर नाठाळ जमिनीस राबणाऱ्यांनींच फलपुष्पधरा बनविलें आहे. असें असतांसुद्धां शेंकडा किती कुळांना, आयतखाऊ पांढरपेशांची किंवा घरबैठे धंदेवाल्यांची शेतजमिनीवर मालकी असूं नये, असें वाटतें ? आह्मी ह्मणतों, हजारांतूनहि एखादें असें कूळ निर्माण होणार नाहीं, एवढेंच नव्हे तर अशी कल्पना करणें पापमूलक होय, अशीच एकूणएक कुळांची समजूत असेल.

त्यांच्या या समजुतीला प्रामाणिकपणा असें सुंदर विशेषण देऊन त्याला भुलवितां येईल परंतु त्यांची अशी स्थिति असणें दशहिताच्या दृष्टीनें उपयुक्ततेचें ठरणार नाहीं. ज्या दोन चार वा अनेक एकर जमिनींत शेतकरी हाडांची कांड, मासाचा चिखल आणि रक्ताचें पाणी करून राबतो ती जमीन आपल्या मालकाची असली पाहिजे. असें जर त्यास अंतःकरणपूर्वक वाटणार नाहीं तर इंग्रजांच्या हातून हिंदुस्थान मुक्त व्हावा वा करणें कर्तव्याचें आहे, असा त्यास ध्यास लागला पाहिजे, अशी अपेक्षा कोणत्या तत्वावर देशभक्तांना करतां येईल ?

आणखी ही विचारसरणी कित्येकांना तत्वहीनतेची अतएव विपरीत बुद्धीची वाटेल. पण आज स्वतंत्र राष्ट्रांत कोणकोणतीं नवीन तत्वें जन्मास येत आहेत ! मोठमोठे कारखाने आणि खाणी वगैरे राष्ट्राच्या मालकीच्या असल्या पाहिजेत. याच्या बुडाशीं असलेल्या तत्वव्याप्तींत आमचें तत्त्व समरस होणार नाहीं काय ? शेतजमिनीवर राबणारांचीच मालकी प्रस्थापित झाली तर त्यांत जमिनी कशा वरें राष्ट्राच्या मालकीच्या ठरतात, असा कित्येकांत किंतु निघेल परंतु एथें जमिनीवरील मालकीचा हक्क मर्यादितच आहे हें लक्ष्यांत असूं दिले पाहिजे. सरकारांत जमिनीबद्दल सारा भरणें ह्मणजेच जमिनी राष्ट्राच्या मालकीच्या आहेत, या तत्त्वाला पर्यायानें कबुली देण्यासारखेंच होय. पण राष्ट्राबरोबर अर्थात् सरकाराबरोबर सावकरांनाहि शेतजमिनीच्या उत्पन्नांत भागीदार होऊं देणें ह्मणजे राष्ट्राच्या मालकीचें तत्व गढूळ करण्यासारखेंच होय. सरकारांत योग्य तो कर भरून पण मजुरांना भरपूर वेतन न देतां काम मात्र त्यांच्या शक्तीबाहेर करून घेऊन त्याचा फाजील फायदा खाणीवाले उपटतात ह्मणूनच खाणी राष्ट्राच्या मालकीच्या असल्या पाहिजेत या तत्त्वाला जन्म मिळाला आहे आणि तें तत्त्व अमलांत आलें तर आज खाणीच्या संबधांत सरकार, सावकार आणि मजूर असा जो त्रिवर्गाचा भाग आहे त्यांतून फक्त सावकारालाच तेवढें वगळिलें जाईल. अर्थात् सरकार आणि मजूर तेवढेच

शिल्लक राहातील. आणि हीच योजना राष्ट्राच्या मालकीची निदर्शक होय. तद्वतच शेतजमिनीसंबंधांतूनहि सावकाराची हकालपट्टी झाली पाहिजे. कारण या सावकारीमुळें सर्वत्र शेतकरी वर्गाचें वाटोळें झालेलें आहे. कारण मजुरासारखी सुद्धां शेतकरी वर्गाची भाकरी निश्चित नाहीं. मजुरांना राबल्याबद्दल पगार मिळाला नाहीं; असें कधींच घडलें नाहीं. परंतु शेतांत राबल्याबद्दलचा मुशाहिरा कुळांना जवळ जवळ मिळतच नाहीं. ही गोष्ट निमूटपणेंच कोणासहि कबूल केलीच पाहिजे. कारण सारावाढीमुळें शेतकरी वर्गाला आपल्या मेहनतीचें फळ आपल्या पदरांत पाडून घेतां येत नाहीं. या विधानाला सर्व देशभक्तांनीं आणि पर्यायानें सावकारांनींहि पाठिंबा दिला आहे. मग एवढ्याच या एका दाखल्यावरून सहजच प्रश्न निष्पन्न होतो कीं, सारावाढीमुळें शेतकरी वर्गाच्या मेहेनतान्याला जर चाट बसतो तर साऱ्याच्या तिपटीनें चौपटीनें सावकारी धारा भरून ज्या कुळांनीं जमिनी पत्करल्या आहेत त्यांना मेहेनतीचा पुरेसा मोबदला मिळत असेल, असें एकाद्या माथेफिरूसहि म्हणतां येणार नाहीं. म्हणजे मेहेनतान्याच्या बाबतींत मजूर वर्ग तर कुळाहून सुखी आहेच. परंतु कुळांपेक्षां तो राबतोहि कमी, असेंच म्हटलें पाहिजे. कारण आठवड्यांतून अठ्ठेचाळीस तासाच्या वर राबण्यास तो केव्हांही तयार होणार नाहीं. असो, निश्चित मजुरी, मर्यादित काळांत काम अशी परिस्थिति असतांहि जर खाणी आणि कारखाने राष्ट्राच्या मालकीचे झाले पाहिजेत. आणि तें जर तत्वाला धरून आहे तर ज्यांनीं किती राबावें याची मर्यादाच नाहीं व मेहेनतान्याचाहि ज्यांना भरंवसा नाहीं त्यांनीं किंवा त्यांच्या कैवाऱ्यांनीं शेतजमिनीहि राष्ट्राच्याच किंवा राबणाऱ्यांच्या मालकीच्या असल्या पाहिजेत, या तत्वाचा पुरस्कार केल्यास तें विपरीत बुद्धीचें ठरविणें म्हणजे प्रचलित मनूंतील वस्तुस्थितीचें ज्ञान नसल्याचीच कबुली देण्यासारखें नव्हे काय !

राष्ट्र अर्थात सरकार आणि शेतकरी यांच्यांत सावकाराची लुडबुड असूं नये, या तत्त्वाचें आह्मी जें प्रतिपादन करीत आहों तें सकृद्दर्शनीं जरी सावकारांना अनिष्ट आणि त्वेषजनक वाटत असलें तरी आपल्या भांडवलाचा ते अर्थशास्त्रानुसार विचार करतील तर सध्यां शेतजमिनींत भांडवल गुंतविणें हें जवळ जवळ मूर्खपणाचेंच आहे, अशी त्यांना खात्री पटल्याविना राहाणार नाहीं. आज शेतजमिनींत गुंतलेल्या भांडवलावर शेंकडा दोन तीन टक्केहि व्याज किंवा फायदा पडत नाहीं. पोस्टल सेव्हिंग बँक सुद्धां आज विनत्रासानें तीन टक्के व्याज देतें, परंतु दोन टक्के फायदा घेण्यास सावकारांना प्रसंगोपात किती तरी खस्ता खाव्या लागतात. ' काय करावें, व्यापारधंद्याला पुरेसें भांडवल नाहीं. ' अशी नेहमीं ओरड ऐकूं येते. परंतु इनामदारीवजा सावकारी गाजविण्याची हिंदी भांडवलवाल्यांना अत्यंत घाणेरडी संवय लागलेली असल्यामुळें ते व्यापारांत पैसा गुंतविण्याचें सोडून देऊन अत्यंत अल्प फायद्याच्या शेतजमिनींत गुंतवितात त्यामुळें कुळांना गुलाम बनविणें आणि व्यापारधंद्याना उपाशीं पाडणें हीं दोन पापें शेतजमिनींत पैसा ओतणारे सावकार करीत असतात. तेव्हां अशी ही वस्तुस्थिति स्पष्टपणें नजरेपुढें आल्यावर आमच्यासारख्यांनीं हिंदुस्थानाच्या अवनतीचें खापर पांढरपेशा सावकारावर फोडिलें तर ते चुकीचें किंवा अस्थानीं होईल, असें आह्मांस मुळींच वाटत नाहीं. असो, या विवेचनावरून अगदीं स्पष्ट होतें कीं, सरकार आणि शेतकरी यांच्यांत सावकारांचा प्रवेश होऊं देणें हें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट आहे. आणि ह्मणून आपण होऊन सावकारांनीं शेतजमिनींतून आपलें अंग काढून घेतलें पाहिजे. परंतु सावकारींतहि एक प्रकारची सत्ता असल्यानें ती आपल्या पावलानें माघार घेणार नाहीं. तेव्हां त्याकरितां शेतकरी वर्गानें काय केलें पाहिजे ते आतां पुढील अंकीं पाहूं.

तारीख ९-१२-३०.

# करबंदी आधीं कीं खंडबंदी?

८

शेतजमिनीत शिरलेल्या सावकारींत विशिष्ट सत्तांश उतरत असल्यामुळें ती आपल्या पायीं माघार घेणार नाहीं ह्मणून तिला शेतकरी वर्गानें कसें बाजूला काढावयाचें हा प्रश्न यापुढें सोडवावयाचा आहे.

आधीं ही गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे कीं, करबंदीइतका खंडबंदीचा उपाय साधा आणि सोपा नाहीं.कारण शेतसारा कमी होण्याकरितां अमलांत यावयाची करबंदी सावकारांना सर्वतोपरी इष्टच असते. कां कीं सदर चळवळींत तीन तऱ्हांनीं सावकारांना फायदा उचलतां येतो. यापैकीं कायमचा पहिला फायदा हा कीं, चळवळींत बेभानपणें भाग घेतल्यामुळें शेतकरी वर्गाची जीं हाडें मोडतात त्यामुळें कायमचीं उपरी कुळें होण्यापलीकडे त्यांच्यांत सामर्थ्य उरलेलें नसतें. दुसरा, चळवळ यशस्वी झाल्यास त्याचा अधिक तो वाटा अनायासें सावकारवर्गाच्या पदरांत पडतो. कारण जास्त ती जमीन सावकारांच्याच कबज्यांतील आहे. आणि तिसरा फायदा ह्मणजे करबंदीच्या चळवळींत लिलावाला निघालेल्या जमिनी घेणाराहि सावकारच असतो, हा होय. यामुळें करबंदीच्या चळवळींत सावकार वर्ग विघ्न उपस्थित करण्यास पुढें येत नसतो, परंतु खंडबंदी सावकारांनाच भोवणार असल्यामुळें ते, सदरहू चळवळ न्याय्य आहे कीं अन्याय्य आहे, याचा विचार न करतांच, ती हाणून पाडण्यासाठीं सारी चाणक्यनीति अमलांत आणण्याचा प्रयत्न केल्याविना राहाणार नाहींत, एवढेंच नव्हे तर आज स्वातंत्र्यप्राप्तीची

चळवळ असहकारितामूलक असतां सुद्धां ते सरकारच्या बगलेंत उघडपणें घुसतांना बिलकुल शरम वाळणार नाहींत ! भोर संस्थानचें उदाहरण आतां नजरेपुढें आहेच. परंतु एवढें कशाला, मुळीं सावकारींचा अतएव जमीनदारीचा जन्मच सरकार आणि भांडवलवाले यांच्या संगनमतांतून झालेला आहे.

औरंगजेबाच्या कारकीर्दीत राज्यसत्ता ढिली पडतांच सरकारी अधिकारी वर्गाकडून कर बरोबर वसूल होईना ह्मणून सावकारांना जमीनदार नेमण्याचा प्रघात पडला. आणि यापुढें हे ' जमीनदार ' च जमिनीचे मालक बनले व तसें त्यांचें प्राबल्यहि वाढलें. इतकें कीं ते सरकारालाहि मानीनासे होऊन रयतेपासून जुलूम जबरदस्तीनें पैसा उकळूं लागले. या जमीनदार वर्गाच्या अन्यायासंबंधीं इंग्रज ग्रंथकर्ते मि. बेडन पॉवेल यांनीं असें वर्णन केलें आहे कीं, इजारदारांकडे वसुलीचें काम असल्यामुळें त्यांचें वर्चस्व वाढून शेतकऱ्यास नाहक उपद्रव होऊं लागला. इजारदार त्यांच्याकडून हवा तितका वसूल मिळवीत व इतर मार्गानें त्यांस गांजून टाकीत. व थोडयाच वर्षांत **जमिनीचे खरे मालक केवळ काबाडकष्ट करणारे शेतकरी बनून इजारदार आपणच जमीनदार ह्मणून मिरवूं लागले.** याच भोंदू जमीदारांबरोबर ऊर्फ इजारदाराबरोबर कंपनी सरकारनें कायम धारावंदीचे करार करून जमीनदारी पद्धति सुरू केली. " यावरून स्पष्टपणें दिसून येईल कीं, सावकाराची आई जी जमीनदारी तिचा जन्म सरकारी सत्तेच्या ढिलाईंत झाला. एवढेंच नव्हे तर मोठमोठ्या मुत्सद्यांनाहि असें वाटूं लागलें कीं, जमीनदार वर्गाच्या संरक्षणांतच आपल्या राज्यसत्तेचेंहि संरक्षण आहे. हिंदुस्थानचे माजी गव्हर्नर जनरल सर जॉन लॉरेन्स कायमधारावंदीसंबंधानें मत व्यक्त करतांना लिहितात कीं, " देशांतील सुशिक्षित समाजास संतुष्ट राखण्याचा एकच उपाय ह्मणजे जमिनीवरील सारा कायम करून आर्थिक उन्नतीस मदत करणें हा होय. " तसेंच सर जॉन शोअर ऊर्फ लॉर्ड टेनमथ यांनींहि असा अभिप्राय दिला आहे कीं, जमिनदार जमिनीचे मालक आहेत हें आपण यापूर्वीच कबूल

केलेंच आहे. आतां आपल्यासारख्या परकीय सरकारनें जमीनदारांपासून होईल तितका कमी सारा घेण्याचा रिवाज पाडला पाहिजे. या विवेचनावरून वाचकांच्या लक्ष्यांत आलें असेलच कीं, सरकार आणि जमीनदार यांचा परस्परांशीं अनन्य संबंध आहे. आणि जमीनदारीचीच लेक सावकारी ही आहे. अर्थात् ती जमीनदारीहून वरचढ आहे. बंगाल पंजाब व संयुक्त प्रांतांतील जमीनदार कुळाकडून ठोक जमेच्या पांचवा किंवा सहावा हिस्सा घेतात. परंतु अलीकडे सावकार जमीनदार ठोक जमेच्या तीनचतुर्थांशापर्यंत हिस्सा उचलितात. असो, प्रस्तुत प्रकरणीं आह्मास एवढेंच सांगावयाचें आहे कीं, जमीनदार आणि सावकार हा एकच वंश आहे. आणि जमीनदारी मोंगलाईत व सावकारी ऑंग्लाईत जन्मास आली आहे. ह्मणजे ज्या अर्थी ती मध्येंच उद्भवली आहे त्या अर्थी ती मध्येंच नाश पावली किंवा नाहींशी केली तर ती गोष्ट अन्याय्य, अव्यवहार्य किंवा तत्वहीनतेची ठरणार नाहीं. मात्र आरंभींच सांगितल्याप्रमाणें सरकार, जमीनदार आणि सावकार हे त्रिवर्ग परस्परावलंबी असल्यामुळें शेतकरी वर्गानें खंडबंदीची अर्थात् शेत जमिनींतून सावकारीला बाजूला काढण्याची चळवळ सुरू करितांच कोणकोणत्या मार्गानें त्यांच्यावर आपत्ति ओढवतील, यासंबंधीं कल्पनाहि करवत नाहीं. असें जरी असलें तरी त्या आपत्तींना भिऊन शेतकरी वर्गानें उपरि कुळांच्या दुर्दशेंत पिढ्यानपिढ्या कंठाव्या असें आमचें ह्मणणें नाहीं. तर फक्त ते जी चळवळ चालवितील ती अनत्याचार वृत्तीची आणि विनयशीलतेची असली पाहिजे, असें आमचें आग्रहपूर्वक सांगणें आहे.

वरचें सगळें खरें. परंतु चळवळीकरितां शेतकरी वर्गांतच जी एकी पाहिजे ती आज उत्पन्न होईल अशी जरी परिस्थिती दिसत असली तरी तो आजच्या सवंगाईचाहि एक परिणाम असावा. कारण सर्वच उपरि कुळांना खंड कसा भागवावा याविषयीं काळजी उत्पन्न झाली आहे. आणि त्यामुळें खंड भयंकर दिसत आहे. परंतु गेल्या तीन चार वर्षांपूर्वीप्रमाणेंच शेतक-

राष्ट्र अर्थात सरकार आणि शेतकरी यांच्यांत सावकाराची लुडबुड असूं नये,-या तत्त्वाचें आह्मी जें प्रतिपादन करीत आहों तें सकृद्दर्शनीं जरी सावकारांना अनिष्ट आणि त्वेषजनक वाटत असलें तरी आपल्या भांडवलाचा ते अर्थशास्त्रानुसार विचार करतील तर सध्यां शेतजमिनींत भांडवल गुंतविणें हें जवळ जवळ मूर्खपणाचेंच आहे, अशी त्यांना खात्री पटल्याविना राहाणार नाहीं. आज शेतजमिनींत गुंतलेल्या भांडवलावर शेकडा दोन तीन टक्केहि व्याज किंवा फायदा पडत नाहीं. पोस्टल सेव्हिंग बँक सुद्धां आज विनत्रासानें तीन टक्के व्याज देतें, परंतु दोन टक्के फायदा घेण्यास सावकारांना प्रसंगोपात किती तरी खस्ता खाव्या लागतात. 'काय करावें, व्यापारधंद्याला पुरेसें भांडवल नाहीं.' अशी नेहमीं ओरड ऐकूं येते. परंतु इनामदारीवजा सावकारी गाजविण्याची हिंदी भांडवलवाल्यांना अत्यंत घाणेरडी संवय लागलेली असल्यामुळें ते व्यापारांत पैसा गुंतविण्याचें सोडून देऊन अत्यंत अल्प फायद्याच्या शेतजमिनींत गुंतवितात त्यामुळें कुळांना गुलाम बनविणें आणि व्यापारधंद्यांना उपाशीं पाडणें हीं दोन पापें शेतजमिनींत पैसा ओतणारे सावकार करीत असतात. तेव्हां अशी ही वस्तुस्थिति स्पष्टपणें नजरेपुढें आल्यावर आमच्यासारख्यांनीं हिंदुस्थानाच्या अवनतीचें खापर पांढरपेशा सावकारावर फोडिलें तर ते चुकीचें किंवा अस्थानीं होईल, असें आह्मांस मुळींच वाटत नाहीं. असो, या विवेचनावरून अगदीं स्पष्ट होतें कीं, सरकार आणि शेतकरी यांच्यांत सावकारांचा प्रवेश होऊं देणें हें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अत्यंत अनिष्ट आहे. आणि ह्मणून आपण होऊन सावकारांनीं शेतजमिनींतून आपलें अंग काढून घेतलें पाहिजे. परंतु सावकारींतहि एक प्रकारची सत्ता असल्यानें ती आपल्या पावलानें माघार घेणार नाहीं. तेव्हां त्याकरितां शेतकरी वर्गानें काय केलें पाहिजे ते आतां पुढील अंकीं पाहूं.

तारीख ६-१२-३०.

# करबंदी आधीं कीं खंडबंदी?

८




जमिनींत शिरलेल्या सावकारींत विशिष्ट सत्तांश उतरत असल्यामुळें ती आपल्या पायीं माघार घेणार नाहीं ह्मणून तिला शेतकरी वर्गानें कसें बाजूला काढावयाचें हा प्रश्न यापुढें सोडवावयाचा आहे.

आधीं ही गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे कीं, करबंदीइतका खंडबंदीचा उपाय साधा आणि सोपा नाहीं. कारण शेतसारा कमी होण्याकरितां अमलांत यावयाची करबंदी सावकारांना सर्वतोपरी इष्टच असते. कां कीं सदर चळवळींत तीन तऱ्हांनीं सावकारांना फायदा उचलतां येतो. यापैकीं कायमचा पहिला फायदा हा कीं, चळवळींत बेभानपणें भाग घेतल्यामुळें शेतकरी वर्गाची जीं हाडें मोडतात त्यामुळें कायमचीं उपरी कुळें होण्यापलीकडे त्यांच्यांत सामर्थ्य उरलेलें नसतें. दुसरा, चळवळ यशस्वी झाल्यास त्याचा अधिक तो वाटा अनायासें सावकारवर्गाच्या पदरांत पडतो. कारण जास्त ती जमीन सावकारांच्याच कबज्यांतील आहे. आणि तिसरा फायदा ह्मणजे करबंदीच्या चळवळींत लिलावाला निघालेल्या जमिनी घेणाराहि सावकारच असतो, हा होय. यामुळें करबंदीच्या चळवळींत सावकार वर्ग विघ्न उपस्थित करण्यास पुढें येत नसतो, परंतु खंडबंदी सावकारांनाच भोंवणार असल्यामुळें ते, सदरहू चळवळ न्याय्य आहे कीं अन्याय्य आहे, याचा विचार न करतांच, ती हाणून पाडण्यासाठीं सारी चाणक्यनीति अमलांत आणण्याचा प्रयत्न केल्याविना राहाणार नाहींत, एवढेंच नव्हे तर आज स्वातंत्र्यप्राप्तीची

चळवळ असहकारितामूलक असतां सुद्धां ते सरकारच्या वगलेंत उघडपणें घुसतांना बिलकुल शरम वाळणार नाहींत ! भोर संस्थानचें उदाहरण आतां नजरेपुढें आहेच. परंतु एवढें कशाला, मुळीं सावकारीचा अतएव जमीनदारीचा जन्मच सरकार आणि भांडवलवाले यांच्या संगनमतांतून झालेला आहे.

औरंगजेबाच्या कारकीर्दींत राज्यसत्ता ढिली पडतांच सरकारी अधिकारी वर्गाकडून कर बरोबर वसूल होईना ह्मणून सावकारांना जमीनदार नेमण्याचा प्रघात पडला. आणि यापुढें हे ' जमीनदार ' च जमिनीचे मालक बनले व तसें त्यांचें प्राबल्यहि वाढलें. इतकें कीं ते सरकारालाहि मानीनासे होऊन रयतेपासून जुलूम जबरदस्तीनें पैसा उकळूं लागले. या जमीनदार वर्गाच्या अन्यायासंबंधीं इंग्रज ग्रंथकर्ते मि. बेडन पॉवेल यांनीं असें वर्णन केलें आहे कीं, इजारदारांकडे वसुलीचें काम असल्यामुळें त्यांचें वर्चस्व काढून शेतकऱ्यास नाहक उपद्रव होऊं लागला. इजारदार त्यांच्याकडून हवा तितका वसूल मिळवीत व इतर मार्गानें त्यांस गांजून टाकीत. व थोडयाच वर्षांत **जमिनीचे खरे मालक केवळ काबाकष्ट करणारे शेतकरी बनून इजारदार आपणच जमीनदार ह्मणून मिरवूं लागले.** याच भोंदू जमीदारांबरोबर ऊर्फ इजारदाराबरोबर कंपनी सरकारनें कायम धारावंदीचे करार करून जमीनदारी पद्धति सुरू केली. " यावरून स्पष्टपणें दिसून येईल कीं, सावकाराची आई जी जमीनदारी तिचा जन्म सरकारी सत्तेच्या ढिलाईंत झाला. एवढेंच नव्हे तर मोठमोठ्या मुत्सद्यांनाहि असें वाटूं लागले कीं, जमीनदार वर्गाच्या संरक्षणांतच आपल्या राज्यसत्तेचेंहि संरक्षण आहे. हिंदुस्थानचे माजी गव्हर्नर जनरल सर जॉन लॉरेन्स कायमधारावंदीसंबंधानें मत व्यक्त करतांना लिहितात कीं, " देशांतील सुशिक्षित समाजास संतुष्ट राखण्याचा एकच उपाय ह्मणजे जमिनीवरील सारा कायम करून आर्थिक उन्नतीस मदत करणें हा होय. " तसेंच सर जॉन शोअर ऊर्फ लॉर्ड टेनमथ यांनींहि असा अभिप्राय दिला आहे कीं, जमिनदार जमीनीचे मालक आहेत हें आपण यापूर्वीच कबूल

केलेंच आहे. आतां आपल्यासारख्या परकीय सरकारनें जमीनदारांपासून होईल-तितका कमी सारा घेण्याचा रिवाज पाडला पाहिजे. या विवेचनावरून वाच-कांच्या लक्ष्यांत आलें असेलच कीं, सरकार आणि जमीनदार यांचा परस्प-रांशीं अनन्य संबंध आहे. आणि जमीनदारीचीच लेक सावकारी ही आहे. अर्थात् ती जमीनदारीहून वरचढ आहे. बंगाल पंजाब व संयुक्त प्रांतांतील जमी-नदार कुळाकडून ठोक जमेच्या पांचवा किंवा सहावा हिस्सा घेतात. परंतु अलीकडे सावकार जमीनदार ठोक जमेच्या तीनचतुर्थांशापर्यंत हिस्सा उचलितात. असो, प्रस्तुत प्रकरणीं आह्मास एवढेंच सांगावयाचें आहे कीं, जमीनदार आणि सावकार हा एकच वंश आहे. आणि जमीनदारी मोंगलाईंत व साव-कारी ऑंग्लाईंत जन्मास आली आहे. ह्मणजे ज्या अर्थी ती मध्येंच उद्भवली आहे त्या अर्थी ती मध्येंच नाश पावली किंवा नाहींशी केली तर ती गोष्ट अन्याय्य, अव्यवहार्य किंवा तत्वहीनतेची ठरणार नाहीं. मात्र आरंभींच सांगि तल्याप्रमाणें सरकार, जमीनदार आणि सावकार हे त्रिवर्ग परस्परावलंबी अस-ल्यामुळें शेतकरी वर्गानें खंडबंदीची अर्थात् शेत जमिनींतून सावकारीला बाजूला काढण्याची चळवळ सुरू करितांच कोणकोणत्या मार्गानें त्यांच्यावर आपत्ति ओढवतील, यासंबंधीं कल्पनाहि करवत नाहीं. असें जरी असलें तरी त्या आपत्तींना भिऊन शेतकरी वर्गानें उपरि कुळांच्या दुर्दशेंत पिढ्यानपिढ्या कंठाव्या असें आमचें ह्मणणें नाहीं. तर फक्त ते जी चळवळ चालवितील ती अनत्याचार वृत्तीची आणि विनयशीलतेची असली पाहिजे, असें आमचें आग्रहपूर्वक सांगणें आहे.

वरचें सगळें खरें. परंतु चळवळीकरितां शेतकरी वर्गांतच जी एकी पाहिजे ती आज उत्पन्न होईल अशी जरी परिस्थिती दिसत असली तरी तो आजच्या सवंगाईचाहि एक परिणाम असावा. कारण सर्वच उपरि कुळांना खंड कसा भागवावा याविषयीं काळजी उत्पन्न झाली आहे. आणि त्यामुळें खंड भयंकर दिसत आहे. परंतु गेल्या तीन चार वर्षांपूर्वीप्रमाणेंच शेतक-

त्यांचा माल महाग झाला तर शेतकरी वर्गात एकी निर्माण होईल काय, हा एक प्रश्न महत्वाचा आहे. मोठमोठ्या शहरांतील भाडेकरी सामान्यतः सुशिक्षित असल्यामुळें त्यांनीं कांहीं मुदतीपर्यंत कां असेना रेंट ॲक्ट पास करून घेतला. आणि मलबारांतील वहिवाटदार व उपरी कुळांना जमीनदारांचा अतिशय जाच झाल्यामुळें आणि मद्रासच्या जस्टिसपक्षानें त्यांचा कैवार घेतल्यामुळें तेथें 'टेनन्सी ॲक्ट' पास झाला. ह्मणजे खंडाला जमिनीच्या कसाप्रमाणें मर्यादा घालण्यांत आली. परंतु सावकारी खंडाला लगाम घालण्यास सरकारांचें आणि साऱ्याच सुशिक्षित नागरिकांचें कसें बरें साहाय्य मिळावें ? प्रसंग पडलाच तर चळवळ्या शेतकरी वर्गाचा कैवार घेण्यास हजारों वर्तमानपत्रांपैकीं एखादेंहि वर्तमानपत्र पुढें सरसावण्याचें धाडस करणार नाहीं. कारण आधीं बहुतेक सारीं वर्तमानपत्रें भांडवलवाल्यांच्याच सहानुभूतिवर जगलेलीं आहेत, अशा परिस्थितींत सावकार विरुद्ध शेतकरी असा सामना सुरू होतांच शेतकरी वर्गाची वास्तविक बाजू लोकापुढें ठेवण्याचा एखाद्या पत्रानें हिय्या केलाच तर त्याची चारीहि बाजूनीं नाकेबंदी केल्याशिवाय सावकार राहाणार नाहींत. ह्मणजे चळवळींतील मुख्य साधनांपैकीं वर्तमानपत्र हें एक साधन आज शेतकरी वर्गाच्या हातीं नाहीं. यामुळें त्यांच्या प्रतिपक्षांच्या वृत्तपत्रांनीं त्यांच्या चळवळीचें विकृत स्वरूपच जनतेपुढें ठेविलें तर त्याच दृष्टीनें सावकारांसहि आपलें धोरण ठेवणें भाग पडेल ! एकंदरीत खंडबंदीची किंवा आज खंडकपातीची चळवळ शेतकरी वर्गाला सध्यांच्या 'डेमॉन्स्ट्रेशन' च्या धर्तीवर चालवितां येणें अशक्य आहे.बरें, तसें कायदे मंडळांत एखादें बिल यावें, अशी जर अपेक्षा करावी तर बिल आणणारा एखादा महाभाग मिळेल परंतु तें पास होईल, अशी आजच्या स्थितींत स्वप्नींहि आशा करतां येत नाहीं. तात्पर्य काय, चळवळ यशस्वी करण्यास सुशिक्षितांना मुख्यतः जे काय मार्ग आहेत त्यांतील बहुतेक मार्ग शेतकरी वर्गाला जवळ जवळ बंदच आहेत ! मग आत्मोद्धारासाठीं नसो पण तरणो-

पायार्थ शेतकरीवर्गानें कोणता मार्ग पत्करावा ? अनेक बाजूंनीं विचार केल्या-नंतर आमच्या मतें एकच मार्ग, जरी लांब पल्ल्याचा असला तरी, प्रयोजकतेचा दिसतो. आणि तो ह्मणजे दरएक टापूंतील शेतकऱ्यांनीं सावकारांच्या जास्त खंडाच्या ज्या जमिनी असतील त्या क्रमाक्रमानें पण नेटानें पड टाकिल्या पाहिजेत. ह्मणजे साऱ्याच सावकारांशीं एकदम सामना देण्याचा अगर सावकारी साऱ्याच जमिनींवर बहिष्कार टाकण्याचा त्यांनीं मार्ग पत्करून भागणार नाहीं. तर तडजोडीस तयार नसलेला माणुसकी सोडलेला अशा सावकारांच्या जमिनीवरच त्यांनीं प्रथमतः बहिष्कार पुकारला पाहिजे. आतां आह्मांस ठाऊक आहे कीं, एकेका गांवांत बहुधा सारी आणे जमीन एका एका सावकाराची असते व बेळगांव तालुक्यांतील पश्चिम भागांत आणि चंदगड महालांत अशीं भरपूर उदाहरणें मिळतात. तेव्हां अशा ठिकाणच्या सावकारांना माणुसकीचा धडा कसा द्यावा ? प्रश्न दिसतो तितका कठिण नाहीं. आतां हें खरें कीं, खंडकपातीचा प्रश्न पुढें येतांच सारा सावकार वर्ग संघटित होईल आणि त्यांच्यांत कमी खंडानें जमिनी द्यावयाच्या नाहींत असा कट होईल. परंतु गांवांतील शेतकरी जसे एकत्र नांदतात तसें सावकार एकत्र नांदत नसल्यामुळें असला कट शेवटपर्यंत टिकणार नाहीं. आणखी एखादा सावकार कितीहि दुष्ट व कावेबाज असला तरी त्याला हिशेब कळत नाहीं असें मात्र ह्मणतां येणार नाहीं. समजा ‘ अ ’ या गांवांत ‘ ब ’ या सावकाराच्या सुमारें दहा खंडी खंडाच्या जमिनी आहेत. त्यांतील निदान एक खंडीची जमीन गांवाला सहज बहिष्कृत ठेवतां येईल, अशा वेळीं शेतकरी वर्गाच्या बहिष्काराला व बहिष्कारजन्य इतर वृत्तीला तोंड देऊन एक खंडी धान्य गमावण्यापेक्षां दहा दहा मण खंडाच्या जमिनी नऊ नऊ मणानें देण्यास तो तयार होणार नाहीं, असें मुळींच ह्मणतां येत नाहीं.

आतां हा उपाय आह्मी नव्यानेंच सांगितला किंवा तो अगदींच

निष्कंटक आहे, असें नाहीं. पैशाच्या जोरावर गांवांत बेकी निर्माण करणें, किंवा गांवांवरच अत्याचारांची तोहमत लादणें सावकारांना कित्येकदां सुलभ असतें. परंतु शेतकरी वर्गांतील पुढारी आपल्या पुढारीपणाचा वैयक्तिक किंवा खासगी अदावत साधण्याकडे उपयोग न करण्याची खबरदारी बाळगितील तर गांवांतील एकी खोडसाळपणानें फोडण्याचा प्रयत्न सहसा यशस्वी होत नाहीं. आणि असलीं प्रशंसनीय उदाहरणें ठिकठिकाणीं मिळूं शकतील. बेळगांव नजीकच्या आंबेवाडी गांवांतील शेतकरी वर्गाची एकी अभिनंदनीय आणि कौतुकास्पद नाहीं असें कोणासच ह्मणतां येणार नाहीं. आणि त्यांतहि पुनः शेतकरी वर्गानें आणखी एक जरूर दक्षता घ्यावयाची ती ही कीं, सरकारांशींहि संबंध येणाऱ्या गोष्टींत त्यांनीं सनदशीरपणा आणि सरळपणा बिलकूल सोडतां कामा नये. त्यांनीं आपली चळवळ केव्हांहि खुली ठेवून तिचा मूळ हेतु शक्य त्या मार्गांनीं सरकारच्या नजरेपुढें आणण्याच्या बाबतींत कधींहि कसूर करूं नये. आतां इतकी खबरदारी बाळगल्यानंतरहि चाणक्य कारस्थानांच्या संकटास तोंड देण्याचा शेतकरी वर्गावर प्रसंग ओढवलाच तर त्यास स्वार्थत्यागपूर्वक तोंड देण्यास केव्हांहि तयार असलें पाहिजे. तरच वस्तुतः आज खंडबंदीचा नव्हे तर खंडकपातीचा प्रश्न त्यांना यशस्वीपणें सोडवितां येईल.

खंडबंदी किंवा खंडकपात अगर सावकार विरुद्ध शेतकरी असा भेद निर्माण करणें इवढेंच आमच्या प्रस्तुत लेखमालेचें ध्येय असतें तर इतक्यांतच लेखणी थांबवावी लागली असती. परंतु स्वराज्यप्राप्तीला करबंदी हें एक मुख्य साधन आहे. असा प्रश्न उपस्थित झाल्यावेळीं ज्या अर्थी करबंदी किंवा खंडबंदी हा प्रश्न आह्मी उपस्थित केला त्या अर्थी स्वराज्यप्राप्तीला खंडबंदी हेंच कसें वस्तुतः रामबाण साधन आहे, हें सिद्ध करण्याची आमच्यावर जबाबदारी येते. ह्मणून खंडबंदींत स्वराज्य कसें साध्य आहे, हें पुढील अंकीं पाहूं.

ता. १६।१२।३०

# करबंदी आधीं कीं खंडबंदी?

१

**वस्तुतः** सावकार विरुद्ध कुळें असा भेद निर्माण करणें वा निसर्गतःच निर्माण होत असलेल्या भेदभावास उत्तेजन देणें असल्या क्षुल्लक उद्देशानें चालू लिखाणास आम्ही प्रवृत्त झालों नाहीं तर महात्माजींना खादी हें जसें एक स्वराज्यप्राप्तीच्या अनेक साधनांपैकीं उत्तमोत्तम साधन वाटतें, तद्वतच खंडकपातीनंतरची सहजगतीची खंडबंदी हेंहि स्वराज्यप्राप्तीला रामबाण साधन होय असा आह्मास निःसंशय आणि पूर्ण भरंवसा आहे. आणि ह्मणूनच याविषयीं, गेल्या अंकीं संकल्पिल्याप्रमाणें आज विचार करावयाचा.

खंडकपातीच्या वा खंडबंदीच्या कार्यक्रमास चालना दिल्यास आपापसांतच बेकी निर्माण होईल आणि त्यामुळें अर्थातच स्वराज्य लांबणीवर पडेल, असा एथें प्रारंभींच प्रश्न उत्पन्न होईल. पण हा प्रश्न विचारांतीं आकुंचित दृष्टीचा परिणाम ठरेल. स्वराज्य दूर होईल, असला मार्ग पत्करणें खरोखरच महापापाचें होय. परंतु बेकी उद्भवते ती अन्याय्य गोष्टीसाठींच, असा मात्र कांहीं सिद्धांत नाहीं. उलटपक्षी न्याय्य गोष्टीपायीं बेबनाव उत्पन्न झाल्यास ती एक अपरिहार्य निष्पत्तीच होय, असें मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं. उदाहरणार्थ, महात्मा गांधीजींच्या पूज्यता पावलेल्या खादीच्याच कार्यक्रमाचा किंवा चळवळीचा इतिहास सिंहावलोकनानें लक्ष्यांत घ्या. खुद्द कांग्रेसमध्यें सुद्धां खादीपायीं दोन पक्ष निर्माण झाले. आणि यांपैकीं एका पक्षास 'खद्दरवाला' ह्मणून बृहन्महाराष्ट्रांत तरी निखदण्यांत येऊं लागलें! जेथें

स्वराज्यार्थ शिपाई बनलेल्यांत असा, मतभेद नव्हे, बेबनाव तेथें हिंदी गिरणीवाले खादीकडे आरंभीं कोणत्या दृष्टीनें पाहात असतील, याची सहजच कल्पना होईल. असें असतां दरिद्री नारायणासाठीं महात्मा गांधीजींनीं नवकोट नारायणांचा विरोध लक्ष्यांत घेऊनहि जर या खादीविषयीं सत्याग्रह धरिला आहे, तर खंडबंदीपायीं सावकार आणि कुळें असा भेद उत्पन्न होऊन बेकी पैदा होईल, अशी भीति दाखविणें किंवा बाळगणें ही एक चाणक्य नीति किंवा सावकारांची अराष्ट्रीय कारवाई ठरणार नाहीं काय ?

बरें, स्वराज्याच्या अफाट आणि धोपट मार्गांत सावकारीपणाच्या संरक्षणार्थ निपजलेली जी बेकी आड येईल तिला न्यायाचें व सत्याग्रहाचें तरी अधिष्ठान मिळेल काय ? खंडकपात आणि तदनंतरची खंडबंदी विवक्षित देशबंधूंचा उत्कर्ष सहन होत नसल्यामुळें किंवा त्यांना खालीं खेचण्याकरितां अमलांत आणावयाची नाहीं, तर अविश्रांत परिश्रमानें अनंत संपत्ति उत्पन्न करून सुगीपासून सुगीपर्यंत दरिद्री नारायणच राहाणाऱ्या आणि एकंदर लोकसंख्येंत शेंकडा ७२ प्रमाणांत असलेल्या, शेतकरी वर्गाला, आह्मी मागेंच दिग्दर्शित केल्याप्रमाणें, स्वाभिमानपूर्वक ' वंदे मातरम् ' ह्मणतां आलें पाहिजे. आज मूठभर लँकेशायरवाल्यांची मिजास जशी हिंदुस्थान सांभाळीत आहे तद्वतच मूठभर हिंदी सावकार जमीनदारांच्या चैनीकरितां अफाट शेतकरी वर्गास किंवा हिंदुस्थानासच उपाशीं आणि अर्धपोटीं राहावें लागत आहे ! एवंच सावकार आणि जमीनदार डोईजड खंड आणि व्याज याकरितां शेतकरी वर्गास पिळून काढीत असल्यामुळें हिंदुस्थानच्या विराट शरीराचा तीनचतुर्थांश भाग किंवा उत्तमांग अगदीं निस्त्राण बनलें आहे. तेव्हां ही स्थिति, सावकार आणि कुळें असा भेद उत्पन्न होऊं नये ह्मणून, कायमच ठेवण्याचा प्रयत्न होईल तर हिंदुस्थानाला स्वराज्य पचणार तर नाहींच पण सहनहि होणार नाहीं ? आणि ह्मणून सबंध हिंदुस्थासानाठीं रक्त सांडण्यास बहुजनसमाज तयार आहे, हें चित्र परकीय सरकारच्या किंवा परचक्राच्या दृष्टीसमोर यावें,

अर्थ ज्यांना वाटत असेल त्यांनीं प्रथमतः भूदेवीचें बहिरंग तरी बहुसंख्य शेतकरी वर्गाच्या मालकी हक्काचें होईल, अशी परिस्थिति निर्माण केली पाहिजे. आज भूदेवीचें तीनचतुर्थांश बहिरंग—शेतजमीन सावकार जमीन-दारांच्या मुठींत आहे. ह्मणजे सबंध हिंदुस्थान इंग्रजांच्या हातांत आणि शेत-जमीन विवक्षित बुद्धिजीवि भांडवलवाल्यांच्या कबजांत अशा वस्तुस्थितींत कोणत्या पायावर वा अधिष्ठानावर स्वराज्यार्थ शिरकमळें अर्पण करण्यास शेतकरी वर्गानें स्वयंस्फूर्तीनें तयार व्हावें, हें सदसद्विवेक बुद्धीस स्मरून कोणास सांगतां येईल काय ?

सामान्यतः व्यवहारच असा आहे कीं, कंगाल कुटुंबांत पैशाला गांठ मारण्याची आणि हिशेबाची जरुरीच भासत नाहीं. तो आपला नेहमींच अन्ना-वस्त्रासाठीं खवखवलेला असतो. अर्थातच यामुळें या पलीकडच्या जगाच्या अस्तित्वाचें आणि कर्तव्याचें भान नसतें. परंतु तशी मनोवृत्ति धनवंताची नसते. तो नेहमीं हिशेबांत असतो आणि त्याची विशेष संग्रहाची तृष्णाहि कधीं शमत नसते. इंग्लंड केवढें तरी चिमुकलें. पण त्याची तृष्णा पृथ्वीच्या एकषष्ठांशावर सत्ता गाजवूनहि तृप्त होत नाहीं. परंतु आज कंगाल हिंदुस्थानांतील मोठमोठ्या गांधीजीसारख्या कर्तबगार पुढाऱ्यांनासुद्धां स्वातंत्र्य पचणार नाहीं अशीच भीति आहे. आणि आस्ट्रेलिया, कॅनडा-सारख्या लहानसान वसाहती मात्र स्वातंत्र्यासाठींच धडपडत आहेत. जी गोष्ट सबंध राष्ट्राची तीच राष्ट्रांतील विशिष्ट वर्गाची. ह्मणूनच आह्मी आग्रह धरीत आहों कीं, हिंदुस्थानची पारतंत्र्य शृंखला शेतकरी वर्गाच्या हातूनच तुटली पाहिजे. अशीच विधिघटना आहे, हें ज्यांना निश्चयपूर्वक वाटतें त्यांनीं शेतकरी वर्गातला कंगालपणा काढून टाकणें हा एक आवश्यक राष्ट्रीय कार्य-क्रमच मानावयास नको काय ? आणि कांग्रेसनें किंवा राष्ट्राच्या पुढाऱ्यांनीं खादीप्रसार, अस्पृश्यतानिवारण हिंदु मुसलमानांची एकी या कार्यक्रमा-बरोबर खंडकपातीच्या कार्यक्रमालाहि जर स्थान दिलें असतें तर त्यास अद्भुत

चमत्कार दृष्टीस पडला नसता काय? कारण उपरोक्त कार्यक्रमांत देशांतल्या बहुसंख्येला खंडकपातीचा कार्यक्रम विशेष जिव्हाळ्याचा वाटला असता. सोव्हिएट पक्षाला झारशाही नष्ट करतां आली ती रशियाचें राज्य शेतकरी व कामकरी वर्गाचेंच आहे, असें जाहीर करून व तशा कृतीला सुरुवात केल्या-मुळेंच होय. आतां एथेंहि करबंदीमुळें किंवा जंगल सत्याग्रहामुळें शेतकरी वर्गांत थोडा वेळ खळबळ माजून राहाते. परंतु हे कार्यक्रम अणुमात्रहि विधायक नव्हत, उलटपक्षीं ते शेतकरी वर्गाच्या हितालाच विध्वंसक स्वरूपाचे आहेत, तशी गोष्ट खंडकपातीच्या कार्यक्रमाची नव्हे. खंडकपातीच्या कार्यक्रमाला सुरु-वात होतांच त्याचें फळ सामान्य शेतकरी वर्गालाहि दृग्गोचर होऊं लागेल आणि अल्पावधीतच तें हातींहि येईल. राष्ट्राचे मालक आम्ही आहों आणि म्हणून राष्ट्राच्या पालनपोषणाची जबाबदारी आमच्यावर आहे, असें जें रशियांतील शेतकरीवर्ग आज अभिमानपूर्वक सांगत आहे, तें तो शेतजमिनीचा मालक बनल्यानंतरच होय. झारशाहींत सुमारें साडेआठकोटी शेतकऱ्यांच्या कबज्यांत जितकी शेतजमीन होती तिच्या निम्याच्या वर जमीन केवळ दीड लाख लोकसंख्येच्या उमरावांच्या हातीं होती. शिवाय शेतकऱ्यांना सुमारें ७० कोटी रुपये खंड जमीनदारांना द्यावा लागत होता. परंतु महात्मा लेनीन यांच्या कृपाप्रसादानें आज देशांतील ९६॥ टक्के जमीन शेतकऱ्यांच्याच मालकीची आहे. म्हणजे शेतजमिनीचे मालक शेतकऱ्यांखेरीज कोणीच नाहींत. अतएव सावकार जमीनदार नाहींत. बोल्शेविझमच्या तत्त्वामुळेंच अशी क्रांति घडली असें नाहीं तर याहि पूर्वी याच तत्त्वाची अमलबजावणी जपानमध्येंहि झाली. रशियांत न्याय्य पण सक्तीच्या तत्वावर जमीनदारांची साडेसदतीस कोटी एकर जमीन शेतकऱ्यांत वाटून देण्यांत आली. परंतु जपानांतील उमरावांच्या आणि सामुरायांच्या अडीचशें संस्थानांनीं एकजातीय कायदा आणि राष्ट्रीय ऐक्य याकरितां आपल्या जहागिऱ्यांवरच पाणी सोडिलें म्हणजे राष्ट्रीय एकीकरितां जपानी

सामुरायांनीं आपल्या जमीनदाऱ्या आपखुषीनें सोडिल्या. मग शेतकरीच शेतीचे मालक बनण्याचा सनदशीर मार्ग अवलंबल्यास राष्ट्रांत बेकी माजेल, असा प्रश्न उत्पन्न करणें कांगावखोरीचेंच ठरणार नाहीं काय ? असो, इतक्या विवेच-नानंतर तरी खंडकपातीनंतरची सहजगतीची खंडबंदी राष्ट्रैक्यविघातक नसून राष्ट्रैक्यमूलक आहे, हें लक्ष्यांत येईलच. परंतु खंडकपातीची सहजगतीनें खंडबंदींत कशी परिणति होते, हें सर्वांच्याच एकदम लक्ष्यांत येणार नाहीं, आणि त्यामुळें हें बोल्शेविझमचेंच तत्व असा आक्रोश करण्यास सावकार जमीनदारांना वाव मिळेल ह्मणून खंडबंदीचा आमचा नियोजित मार्ग कसा न्याय्य तत्वावरचा आणि सनदशीरपणाचा आहे, याविषयीं आतां स्पष्टीकरण होणें अगत्याचें झालें आहे.

सावकार जमीनदारांचा खंड अगदीं डोईजड असतो. प्रसंगीं ते कुळाकडून एकंदर उत्पन्नाचा तीनचतुर्थांश वाटा उचलीत असतात व यामुळें शेतकरी वर्ग वंशपरंपरा काबाडकष्ट वाहणारा बैलच बनला आहे ह्मणून कुळांना श्रमाचा मोबदला मिळेल अशा रीतीनें खंड कमी करण्यास जे सावकार जमीनदार तयार नसतील त्यांच्या जमिनी शेतकरी वर्गानें अर्थ-शास्त्र आणि व्यवहार सांभाळून पडीत टाकिल्या पाहिजेत किंवा चढाओढीनें पत्करूं नये हा आमचा खंडकपातीचा पहिला उपाय असल्याचें गेल्याच अंकीं नमूद झालें आहे. हा उपाय बोल्शेविझम तत्वावरचा नव्हे. तर व्यव-हारांतलाच अर्थशास्त्रानुगामी होय. याच तत्वाकारितां गिरण्यांतील मजुरांचा संप समर्थनीय ठरतो. एखादा सौदा एखाद्याला पटत नसल्यास त्यानें तो केलाच पाहिजे अशी कोणास सक्ती करतां येणार नाहीं. असो, हा उपक्रम यशस्वी होतांच त्यानंतर नवीन जमिनी खरेदी करण्यास सावकार वर्ग मुळींच धजणार नाहीं. अर्थात त्या जमिनी प्रत्यक्ष शेतींत कसणाऱ्या शेतकऱ्यांच्याच पदरांत पडतील. डोईजड खंड असतां महागाईतसुद्धां जमिनींत गुंतलेल्या भांडवलावर दोन तीन टक्के व्याज पडत नाहीं, अशी सावकार वर्गाची कुरकुर

होती. मग योग्य प्रमाणांत खंड उतरून तशांत पुनः सवंगाई राहिल्यास ' जमिनीचा पांढरा हत्ती ' पोसण्याचा बिनहिशेबी व्यवहार करणारे सावकार कितीसे बरें मिळतील ? एवंच खंडकपातीमुळें उद्भवलेल्या क्रांतीचा दुसरा एक परिणाम ह्मणजे सावकार नवीन जमिनी न घेवोत परंतु असलेल्याहि जमिनी वेळींच विकून ते मोकळे होतील ! आणि त्याहि पण शेतकऱ्यांखेरीज दुसरें कोणी घेणार नाहीं. ह्मणजे आठदहा वर्षांतच उपरी कुळेंच शेतजमिनीचे मालक असल्याचें सुंदर चित्र डोळ्यापुढें उभें राहील. मग कुळेंच नाहींशीं झाल्यावर खंड कोण कोणास देणार ? आणि अशा रीतीनें खंड देण्याचें कारण नाहींसें होणें यालाच आह्मी खंडबंदी असें ह्मणतों. नहून सावकाराची जमीन पत्करून त्याला खंड भरावयाचा नाहीं, अशी मात्र आमची खंडबंदीची व्याख्या केव्हांहि राहाणार नाहीं. मग अशाहि स्थितींत जर कोणी आमचा हा खंडकपातीचा उपाय खोडसाळपणाचा आहे, असें भासविण्याचा प्रयत्न करतील तर ' ते केन जानीमहे ' असें आह्मी उद्गार काढल्यास त्यांत अस्वाभाविक तें काय ? असो, खंडकपातीच्या ओघांतच खंडबंदीची निर्मिति होते व त्यांत कोट्यंशानेंहि अन्यायाचा संबंध येत नाहीं, हें आजच्या लिखाणावरून सरळपणेंच सिद्ध झालें आहे. अर्थात् खंडबंदी स्वराज्यप्राप्तीला कसें साधन होऊं शकतें, एवढाच प्रश्न सविस्तरपणें सोडावयाचें काम आता शिल्लक उरलें आहे,

ता. २३–१२–३०

# करबंदी आधीं कीं खंडबंदी?

१०

खंडकपातीची सहजगतीची वाढ किंवा तिचें फळ म्हणजेच खंडबंदी. ही स्वराज्यप्राप्तीला कशी साधन होऊं शकते हें विचारांत घ्यावयाचें आहे.

खंडबंदीचें वास्तविक स्वरूप म्हणजे शेतांत राबणारा तोच शेताचा मालक असणें हें होय. आणि पेरील तो खाईल व राखील तो चाखील अशा मालकी हक्क अबाधितपणें प्रस्थापित झाल्यानंतर अर्थातच शेतजमिनींतला वेठीचा आणि आळसाचा कारभार बंद पडून जमिनींचा कस वाढविण्यासाठीं जो तो प्रयत्न करील. व तशी अधिकाधिक फलप्राप्तीही होईल. खंडबंदीमुळें जमिनीच्या किंमती उतरतील, हें मागें सांगितलें आहेच. किंमती उतरणें म्हणजे शेतीच्या धंद्याला भांडवल कमी लागणें होय. अतएव कमी भांडवल आणि कसदार जमिनीचें सरळ फळ हीं जनतेच्या नजरेपुढें आल्यानंतर जंगली जमिनीहि लागवडीला आणण्याकडे शेतकऱ्यांची निसर्गतःच प्रवृत्ति होईल. आणि मग त्यामुळें निरक्षर 'गांवढळ' लोकांनींच शेतकरी–पेशा पत्करावा अशी जी हल्लीं आत्मघाताची साक्षर वर्गांतून समजूत नांदत आहे, ती कमी होऊन सदरहू वर्गहि शेतकरी होऊन आपलें नशीब उदयास आणण्याचा प्रयत्न केल्याविना राहाणार नाहीं.

हिंदुस्थानचें क्षेत्रफळ अफाट म्हणून कौतुक करूनच आज आम्ही स्वस्थ बसतों. परंतु वर ध्वनित केल्याप्रमाणें शेतीचा धंदा फायदेशीर ठरल्या.

नंतर अफाट क्षेत्रफळाचा उपयोग संपत्तिवर्धनाकडे झाल्याशिवाय राहाणार नाहीं. आणि मग अशा परिस्थितींत बेकारीलाहि आळा बसेल, हें क्रमानेंच सिद्ध होतें. एवंच शेतकरी वर्ग सुखी, श्रीमंत आणि सबळ होईल. अर्थात याचीच छटा हिंदुस्थानाच्या मुद्रेवरहि उमटल्याशिवाय राहाणार नाहीं. मग हा परिणाम इतक्यापुरतांच मर्यादित राहील काय? नाहीं. देशांत शेंकडा ७२ लोकसंख्या असलेल्या वर्गांत अशी प्रतिष्ठा वाढल्यानंतर ह्मणजे शेतकरी वर्ग श्रीमान् झाल्यानंतर शेतीखेरीज इतर धंद्यांना आणि हुन्नरांनाहि उत्तेजन मिळेल. आज परदेशी मालावर बहिष्कार आणि स्वदेशीला उत्तेजन यासाठीं केवढें तरी अकांडतांडव चाललें आहे. परंतु स्वस्ताईमुळें शेतकरी वर्गाच्या हातांत पैसे खेळत नसल्यामुळें स्वराज्यप्राप्तीच्या चळवळींत उजळ माथ्यानें पडलेल्यांची तोंडेंहि आज मलूल झ.लीं आहेत! सराफ, सुतार, सोनार, शिंपी, रंगारी, गवंडी, मजूर, वैद्य, वकील वगैरे लोक केविलवाण्या तोंडानें धंदा नाहीं ह्मणून एकसारखें कण्हत कुंथत आहेत! आणि आतांशाच त्यांना कोठें कळूं लागलें कीं, 'शेतकरी सुखी तर जग सुखी.' असो, शेतकरी मातब्बर झाल्यावर त्याला शेतीकरितां निरनिराळीं यंत्रें खरेदी करावीं लागतील, आरोग्यवर्धक घरें बांधण्याची गरज भासेल, घराच्या भिंतीवर सुंदर चित्रें काढून घेण्याची आवड उत्पन्न होईल, देशपर्यटणाची किंमत कळून येईल, एवंच जगाशीं संगत करण्यांत उन्नति आहे, हें त्यांच्या ध्यानांत आल्याशिवाय राहाणार नाहीं. अर्थात शेतकऱ्यांच्या मातब्बरींत इतर धंद्यांनाहि पुष्टि मिळेल. पूर्वीप्रमाणें शेतकरी जंगली स्थितींत राहून आपली संपत्ति मातीआड करून ठेवणार नाहीं! व यामुळें शेतकरी वर्गाच्या जागृतींत आपल्या हातची परंपरागत शेती गेली ह्मणून पांढरपेशा भांडवलवाल्यांनाहि दुःख करण्याचें कारण उरणार नाहीं. कित्येकांना टाऊक असेलच कीं, आपणास धंदा आणि फायदा मिळावा ह्मणून हिंदुस्थानचा शेतकरी वर्ग सुखी करण्यासाठीं इंग्लंडमधील भांडवलवाल्यांनी एक योजना

तयार आहे. व सध्या व्हाइसरॉय लॉर्ड आर्विन यांच्या शेती सुधारणेच्या प्रयत्नांत उक्त योजनाच आधारभूत आहे. ह्मणजे पांच हजार मैलांवरचे इंग्रज भांडवलवाले मुख्यतः हिंदुस्थानांतील शेती आपल्या कब्जांत कशी येईल या विवंचनेंत नाहींत तर हिंदी शेतकरी वर्गाच्या फायद्यांतील लोण्याचा गोळा आपणास उपटता यावा ह्मणून हिंदुस्थानच्या शेतीला कांहीं खुराक देण्यासाठीं ते हिंदुस्थान सरकारास भाग पाडीत आहेत. हें चित्र पांढरपेशे हिंदी भांडवलवाले आपल्या नजरेसमोर धरतील तर ते शेतजमिनीला पारखे झाल्याबद्दल कधी कां बरें होतील ? उलट सातासमुद्रापलीकडच्या इंग्रज भांडवलवाल्यांना जें करतां येईल तें आपणास कां बरें करतां येणार नाहीं, असा आपोआपच त्यांना प्रश्न पडेल. आणि आह्मी मागेंच दिग्दर्शित केल्याप्रमाणें जमिनी विकून आलेलें भांडवल इतर धंद्यांत गुंतविण्यास ते निरुपायामुळें किंवा जरुरीमुळें प्रवृत्त होतील. एवढेंच नव्हे तर बड्या भांडवलाच्या परदेशी कंपनीशीं स्पर्धा करण्यास आपल्याहि 'कंपन्याच' पाहिजेत, या तत्त्वाची त्यांना खात्री पटेल आणि यामुळें एकांडे शिलेदारीच्या जमीनदारींतील आळस, स्वच्छंदीपणा, अरेरावी वगैरे दुर्गुणांना आळा पडून 'कंपनी' बळकट राहाण्यासाठीं पाश्चात्य भांडवलवाल्यांना जी शिस्त आणि पत पाळावी लागते त्यांचाच हिंदी भांडवलवाल्यांनाहि अवलंब करावा लागेल आणि अशा रीतीनें हिंदी भांडवलवाल्यांच्या हाडीमासीं संघटना, शिस्त आणि पत या मुरून राहिल्या तर त्यांच्याशीं हिंदी शेतकऱ्यांचा कच्चा माल पांच हजार मैलांवर घेऊन जाऊन तेथून तो पक्का करून फायदा मिळविण्यासाठीं परदेशी भांडवलवाल्यांना स्पर्धा करतां येईल काय ? सारांश, शेतजमिनींत पडून राहिलेलें पांढरपेशाचें भांडवल इतर धंद्याकडे गुंतणें अपरिहार्य होऊन राहिलें कीं हिंदी भांडवलवालेही, बेकार न राहातां, सुखी होतील. ह्मणजे शेतकरी सुखी आणि इकडे व्यापारीहि सुखी एवढ्या या दोनच गोष्टी स्वराज्याची भूक प्रदीप्त करण्यास आमच्या मतें पुरेशा आहेत.

कंगाल मनुष्यांत किंवा समाजांत महत्त्वाकांक्षा उत्पन्न होत नाहीं, हें गेल्या लेखांकांतच आह्मी वाचकांच्या निदर्शनास आणिलें आहे. आणि आज शेंकडा ७२ अशा बहुसंख्येनें शेतकरीवर्ग कंगाल असतांनाच बुद्धिजीवि आणि भांडवलवाले वर्ग वैशिष्ट्य सांभाळून स्वराज्यासाठीं धडपडत आहेत. एवढेंच नव्हे तर कित्येक दीडशाहाणे, नामदार लोकधुरीण स्वार्थजन्य समजुतीमुळें कीं स्वाभाविक भ्रांतीमुळें जोंवर बहुजन समाज कंगाल आणि निरक्षर आहे तोंवरच स्वराज्य मिळणें शक्य आहे, सुशिक्षितता वाढल्यास मतभेद माजतील असें मानीत आहेत! परंतु बहुजन समाज निर्धन आणि निरक्षर ठेवणें हें सरकारला आणि राष्ट्रधुरीणांनाहि भयंकर धोक्याचें असतें. विद्यमान सरकारनें, कोणत्या कां धोरणामुळें असेना, बहुजन समाज साक्षर, सधन होण्यासाठीं प्रयत्न केला नाहीं. त्यांचीं कटु फळें आतां सरकारासच चाखावीं लागत आहेत. डेमॉन्स्ट्रेशन किंवा तमाशावरच सरकारास सतावून भेडावून किंवा भांबवून सोडण्यांतच ज्यांना इतिकर्तव्य वाटत आहे त्या लोकांनीं निर्धन, निरक्षर शेतकऱ्यांना कशीं कळसूत्रीं बाहुलीं बनवून सोडिलीं आहेत, हें सरकाच्या दृष्टोत्पत्तीस आलेंच आहे. आणि शेतकरीवर्ग हें हत्यार अखेरपर्यंत उपयोगी पडेल असा जाणत्या लोकनायकांनाहि आज विश्वास नाहीं. एवंच शेतकरीवर्ग हें निर्बुद्ध शस्त्र प्रसंगीं सावकारावर उलटत असतें तर प्रसंगीं राष्ट्रसेवकांनाहि दगा देतें. आणि ह्मणून बहुजन समाज सुबुद्ध आणि सधन असणें हेंच राष्ट्राला सर्वतोपरी इष्ट होय. आणि ही अपेक्षित सुबुद्धता आणि साक्षरता खंडबंदीखेरीज ह्मणजे शेतात राबणारा तोच शेताचा मालक असा हक्क प्रस्थापित झाल्याशिवाय निर्माण होणार नाहींत. आणि अशी एकदां शेतकरी वर्गांत साक्षरता आणि सधनता नांदूं लागल्यावर त्याला व्यापाप्रमाणें येणाऱ्या गरजा भागवून घेणें अगत्याचें होईल. आणि त्यांच्या आकांक्षाहि वाढत जातील. आज लोकलबोर्ड, कायदेमंडळ यांतील प्रतिनिधी शेतकरी वर्गानेंच निवडून दिलेले असतात, परंतु त्यांतून शेतकऱ्याच्या प्रगतीला परिपोषक होईल

असें कार्य होत नाहीं, याचें कारण सामान्यतः उक्त प्रतिनिधी आणि शेतकरी यांच्यांत जिव्हाळ्याचा संबंध नाहीं. परंतु खंडबंदीनंतर शेतकरी जमिनीचा मालक बनल्यानंतर वरच्यासारख्या प्रतिनिधींवर त्यांचें भागणार नाहीं, अर्थात आपल्या हितसंबंधाचें काळजीपूर्वक संरक्षण करणारे असेच तो प्रतिनिधी पाठविण्याची खबरदारी घेईल. आणि मग पुढें उपलब्ध प्रातिनिधिक संस्थांच्याद्वारें उन्नतीला जरूर तितका मोकळा मार्ग मिळत नाहीं, हें त्यांच्या लक्ष्यांत येऊं लागल्यानंतर स्वभावतःच आपला मार्ग निष्कंटक करण्यासाठीं तो संघटनेनें आणि नेटानें झगडल्याशिवाय राहाणार नाहीं.

श्रीशिवाजी महाराजांना, तोरणा किल्ला हातीं येईपर्यंत, हिंदवी स्वराज्याची आकांक्षा उत्पन्न झाली नाहीं. तद्वत कंगाल शेतकरी वर्गाच्या गांवींहि आज स्वराज्याची कल्पनासुद्धां येणार नाहीं; परंतु आज ज्या जमिनीबद्दल ३४।३५ कोटी रुपये शेतसारा भरण्यांत येत आहे, तितक्या जमिनीचा, रशियांतील शेतकरी वर्गाप्रमाणें, हिंदी शेतकरी वर्ग मालक बनल्यानंतर अवशिष्ट जमिनीवर तरी इतरांची किंवा परकीयांची मालकी कां असावी हा प्रश्न सधन, साक्षर शेतकरी वर्गाच्या अंतःकरणांत डाचल्याशिवाय राहाणार नाहीं. आणि तीवरहि आपण हिंदी म्हणुन आपला ताबा असला पाहिजे, अशी शेतकरी वर्गात इच्छा उत्पन्न झाल्यावर तिकडे दुर्लक्ष करण्याची ताकद अशा कोणत्या बरें सरकारच्या अंगांत राहाणार आहे ? आज शेतकरी वर्गांत जागृति आणि वर्गविशिष्ट स्वातंत्र्य नसल्यामुळेंच स्वराज्याला हिंदुस्थान पात्र नाहीं, असें ब्रिटिश मुत्सद्यांना म्हणतां येतें. परंतु खंडबंदीनंतर ज्या वेळीं शेतीचा मालक बनलेल्या वर्गानें प्रगतीप्रमाणें निर्माण होत असलेल्या आकांक्षा तृप्त करून घेण्यासाठीं उपलब्ध राजकीय सत्ता हस्तगत केल्याचें चित्र डोळ्यापुढें स्पष्टपणें येईल त्या वेळीं स्वायत्तता उपभोगण्यास हिंदुस्थान तयार नाहीं, असें म्हणण्यास ब्रिटिश मुत्सद्यांना धैर्य होईल काय ? आज स्वकपोलकल्पित व्याख्येच्या स्वराज्यासाठीं पुढारलेला पण अल्पसंख्य वर्ग

उत्कंठ आहे. परंतु वस्तुत: शेतकरी वर्गाची त्याविषयीं सहानुभूति नाहीं उलट शेतकरी वर्ग व पुढारलेले यांच्यांत जोंवर भक्ष्यभक्षक असा संबंध आहे तोंवर पुढारलेल्या वर्गाच्या कोणत्याहि चळवळीला शेतकरी वर्गाचा स्वयंप्रेरणेनें पाठिंबा मिळणें असंभवनीयच होय. आणि आर्थिक स्वातंत्र्याशिवाय हिंदुस्थानांतील उद्योगधंद्याची उन्नति होईल, अशी आशा करणें, हें जसें व्यर्थ होय, तद्वत खंडबंदीखेरीज लोकशाहीला अत्यंत वावडा असलेला समाजासमाजांतला भक्ष्यभक्षक संबंध नष्ट होणें हेंहि असंभवनीयच होय. यासाठींच म्हणजे भक्ष्याच्या सदरांत बहुसंख्य आणि भक्षकांच्या सदरांत अल्पसंख्य आहेत तोंवर पुढारलेल्यांच्या स्वराज्यविषयक प्रयत्नाला भक्ष्य वर्ग अनुकूल करून घेण्याकरितां केव्हांहि मायाळूपणा पुढारलेल्या वर्गाकडून पत्करण्यांत आला तरी त्याचा, यापूर्वी उपयोग झाला असला तरी, इतःपर मुळींच होणार नाहीं. स्वराज्य मिळाल्यावर आमच्या अमलदारीचें किंवा वर्चस्वाचें तुमच्या मानेवरील जूं आम्ही बाजूस काढूं, असें कितीहि कंठरवानें भक्षक वर्गानें सांगितलें तरी तें आतां व्यर्थ होय. स्वराज्यांत भक्षक वर्गाच्या दाढा मुळे आजच्याहूनहि तीक्ष्ण होतील, अशी अर्धवट जागृत झालेल्या शेतकऱ्यांना जी भीति आहे ती निराधार ठरविण्यासारखा आज तरी पुरावा उपलब्ध नाहीं. आणि म्हणून स्वराज्य मुख्यत: पाहिजे तें आर्थिक क्षेत्राच्या उन्नतीकरितां होय, ही गोष्ट जोंवर निर्विवाद सिद्ध आहे, तोंवर पुढारलेल्या वर्गानीं बहुजन समाजाला आपल्या जबड्यांतच राखून ठेवून स्वराज्यासाठीं धडपड करण्यांत काय बरें हंशील आहे? एवंच बहुसंख्येची शक्ति स्वराज्य मिळविण्याच्या बाबतींत उपयोगांत यावयाची असेल तर पुढारलेल्यांच्या जबड्यांतून बाहेर पडण्यास बहुसंख्येला खंडबंदी हाच एक मार्ग आहे. आणि अशा रीतीनें शेतकरी वर्गानें भक्ष्यभक्षक संबंध तोडून घेतल्यानंतर तो पुनः दुसऱ्या कोणाच्या भक्ष्यस्थानीं राहाण्यास केव्हांहि तयार होणार नाहीं. अर्थात् आर्थिक उन्नतीला आड येणारें पारतंत्र्य बाजूला

सांरण्यास तो केव्हांहि उद्युक्त होईल. आणि आज अल्पसंख्याकाची चळवळ शेतकऱ्याचा जरूर तितका आधार नसल्यामुळें जशी लंगडी पडली आहे. तद्वत् शेतकरी वर्ग आत्मोन्नतीकरितां स्वराज्य मिळविण्याच्या उद्योगांत असतांना मात्र त्यास इतर वर्गांच्या सहानुभूतिसाठीं अडून राहाण्याचें कांहींच कारण उरणार नाहीं.

आणखी शेतकरी शेतीचा मालक झाल्यानंतर त्याच्या उद्धारांतच आपलाहि उद्धार आहे, ही गोष्ट इतर उद्योगधंदेवाल्यांच्या लक्ष्यांत येण्यास उशीर लागणार नाहीं. शिवाय अल्पसंख्य, बहुसंख्य, धर्मपंथजाति इत्यादिकांचें विघ्नहि शेतकरी वर्ग स्वराज्य मिळवीत असतां उपस्थित होण्यासारखें नाहीं. कारण शेतकऱ्यांना ना पंथ, ना धर्म, ना संख्या, ना जात, धर्म व संख्या हा झगडा फक्त पुढारलेल्या वर्गांनींच आपल्या वैशिष्ट्याकरितां निर्माण केलेला असतो. राऊंडटेबल परिषदेंत आपण अल्पसंख्य म्हणून मुसलमानांनीं केवढा आग्रह धरिला आहे. हिंदुत्वाचे रक्षणार्थ डॉ. मुंजे हातावर शिर घेऊन लढत असल्याचा आव आणीत आहेत. परंतु उद्या खंडकपातीच्या कार्यक्रमाला सुरुवात होतांच हिंदु–मुसलमान जमिनदारांत शेंडीदाढीची गांठ पडल्याचा अद्भूत नमुना दृष्टीस पडेल. तात्पर्य काय, धर्म जात इत्यादिकाची पर्वा न ठेवतां स्वराज्यासाठीं शेतकरी झगडतील, अशा वेळीं त्यांच्या आड येण्यास कोण मायेचा पूत धाडस करील बरें? आणि म्हणूनच इतर कोणत्याहि साधनापेक्षा स्वराज्यप्राप्तीला खंडबंदी हेंच अनुपम साधन होय, असें आमचें प्रामाणिक मत आहे. आणि यासाठीं शेवटीं चालू लेखमाला संपवितांना करबंदी आधीं कीं खंडबंदी, या प्रश्नाला आम्ही बेधडक विश्वासपूर्वक उत्तर देतों कीं, खंडबंदी आधीं.

४३४० ता. ३०।१२।३०

समाप्त.

# श्रीशिवाजी प्रिंटिंग प्रेस,

## बेळगांव.

आमच्या छापखान्यांत इंग्रजी, मराठी व कानडी छपाईचीं कामें-बुक वर्क (पुस्तक छपाई), जॉबिंग वर्क (नमुने छपाई), लहान मोठ्या सर्व प्रकारच्या जाहिराती, लग्नपत्रिका, व्यापारी लोकांस लागणाऱ्या हुंड्या, नोटपेपर्स वगैरे दोन रंगीं कामें--सुबक व मोहक योग्य दरानें वेळेवर करून दिलीं जातील.

**म्यानेजर.**


REFBK-0004340

ब्राह्मणेतर पक्षाचें मुखपत्र

# राष्ट्रवीर.

( साप्ताहिक )

## ११ वें वर्ष सुरू झालें.

संपादकः-श्री. शामराव गोविंदराव देसाई

ब्राह्मण्यविध्वंसन ह्मणजे समाजसत्तासंस्थापन हें या पत्राचें मुख्य ध्येय असून यांत राजकीय, सामाजिक इत्यादिक विषयांवर मार्मिक, मुद्देसूद आणि भारदस्त असे लेख येत असतात.

वार्षिक वर्गणी मनीआर्डरीनें आगाऊ ३ रुपये व व्ही. पी नें ३।४ रुपये पत्र केव्हांहि सुरू करतां येतें.

पत्ताः—म्यानेजर,

राष्ट्रवीर, बेळगांव.